अकोला । मंगळवार
दि. २२ जुलै २०२५
वर्ष : १९ अंक : १४२
पाने : ८ + ४

दैनिक बातम्यांचा गतिमान पाठलाग
# अजिंक्य भारत

www.ajinkyabharat.com
स्वागत मूल्य ३ रुपये



१२ वर्षांनी पुन्हा सुरू होणार टी-२० लीग (पान ७ वर)

## महत्त्वाचे

### व्ही. एस. अच्युतानंदन यांचे निधन

**तिरुवनंतपुरम :** केरळचे माजी मुख्यमंत्री आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे (माकपा) ज्येष्ठ नेते व्ही.एस. अच्युतानंदन यांचे सोमवारी वयाच्या १०१ व्या वर्षी निधन झाले. गेल्या महिन्यापासून हृदयविकाराच्या झटक्यानंतर तिरुवनंतपुरम येथील खासगी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते. पक्षाने सोमवारी त्यांच्या निधनाची माहिती दिली. मुख्यमंत्री पिनाराई विजयन, अर्थमंत्री के.एन. बालगोपाल आणि माकपाचे अनेक नेते सोमवारी त्यांना भेटण्यासाठी रुग्णालयात गेले होते. व्ही.एस. अच्युतानंदन (वेल्लिकाकाथ शंकरन अच्युतानंदन) यांचा जन्म २० ऑक्टोबर १९२३ रोजी अलप्पुझा येथे झाला. आर्थिकदृष्ट्या कमकुवत कुटुंबातून आलेल्या अच्युतानंदन यांना शिक्षण अर्धवट सोडून मजुरी करावी लागली. यातूनच त्यांनी मजूर आणि गरीबांच्या हक्कांसाठी लढण्यास सुरुवात केली.

### आणखी किती पुरावे हवेत?- जितेंद्र आव्हाड

**मुंबई :** कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या विधिमंडळात ऑनलाइन रमी खेळण्याच्या वादग्रस्त प्रकरणाने आता नवे वळण घेतले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) आमदार जितेंद्र आव्हाड यांनी कोकाटे यांचे रमी खेळतानाचे दोन नवे व्हिडीओ समोर आणले आहेत. यामुळे कोकाटे यांच्या अडचणी वाढल्या असून, त्यांचे यापूर्वीचे स्पष्टीकरण खोटे ठरत असल्याचा दावा आव्हाड यांनी केला आहे. जितेंद्र आव्हाड यांनी एक्सवर पोस्ट करत म्हटले की, आता मी दोन नवे व्हिडीओ देत आहे.

# ७/११ मुंबई बॉम्बस्फोट : सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता!

## हायकोर्टाचा धक्कादायक निकाल : महाराष्ट्र एटीएस सर्वोच्च न्यायालयात जाणार!

**मुंबई, दि. २१ वृत्तसंस्था**

देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईला ११ जुलै २००६ रोजी हादरवून सोडणाऱ्या लोकल ट्रेनमधील साखळी बॉम्बस्फोट प्रकरणावर आज मुंबई उच्च न्यायालयाने एक अत्यंत धक्कादायक निकाल दिला आहे. या स्फोटांमध्ये २८४ जणांचा मृत्यू झाला होता, तर ८०० पेक्षा अधिक जखमी झाले होते. या प्रकरणात तपास यंत्रणांनी अटक केलेल्या १२ आरोपींपैकी सत्र न्यायालयाने ४ आरोपींना फाशीची, तर उर्वरित आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. मात्र, उच्च न्यायालयाने सत्र न्यायालयाचा हा निकाल पूर्णपणे फिरवत, सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली आहे.



उच्च न्यायालयाच्या या निकालानंतर अनेकांना धक्का बसला असून, सध्या पुण्यातील येरवडा कारागृहात असलेले बशीर खान आणि मुजम्मिल शेख हे दोन आरोपी लवकरच बाहेर येण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. या निकालावर सर्व स्तरांतून आश्चर्य व्यक्त होत असून, ज्येष्ठ विधिज्ञ आणि खासदार उज्ज्वल निकम यांनीही यावर प्रतिक्रिया दिली आहे. आता, या प्रकरणी महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेण्याचा निर्णय घेतला आहे. २००६ च्या पश्चिम रेल्वे साखळी बॉम्बस्फोट खटल्याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालानंतर महाराष्ट्र राज्य, दहशतवाद विरोधी पथकाने आपली भूमिका स्पष्ट केली आहे. ३० सप्टेंबर २०१५ रोजी मोक्का विशेष न्यायालयाने या प्रकरणात ५ आरोपींना मृत्युदंडाची शिक्षा आणि ७ आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती, तर एका आरोपीची निर्दोष (पान २ वर)

### एकाही साक्षीदाराची साक्ष विश्वसनीय नाही!

प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, घटनास्थळ व आरोपींकडून हस्तगत केलेले साहित्य आणि कबुलीजबाब या तीन आधारांवर हा खटला चालवण्यात आला होता. मात्र, या तिन्ही पातळीवर आरोपींविरुद्धचा एकही गुन्हा पोलिसांना सिद्ध करता आला नाही, असे नमूद करून न्यायमूर्ती अनिल किलोर आणि न्यायमूर्ती श्याम चांडक यांच्या विशेष खंडपीठाने सत्र न्यायालयाचा निर्णय रद्द केला आणि सगळ्या आरोपींची निर्दोष सुटका केली. पोलिसांच्या आरोपांना समर्थन करणाऱ्या एकाही साक्षीदाराची साक्ष विश्वसनीय नसल्याची टिप्पणीही विशेष खंडपीठाने केली. या साक्षीदारांची साक्ष नोंदवताना अनेक तांत्रिक चुका करण्यात आल्या किंवा घटनेनंतर अनेक वर्षांनी त्यांचे जबाब नोंदवण्यात आले किंवा त्यांना आरोपींची ओळख पटवण्यास सांगण्यात आले. चार वर्षांनंतर आरोपींची ओळख पटवण्यास झालेल्या विलंबाचे रास्त कारणही तपास यंत्रणेतर्फे देण्यात आलेले नाही. त्यामुळे, एवढ्या वर्षांनी साक्षीदारांनी आरोपींचे चेहरे लक्षात ठेवणे हे विश्वसनीय नाही, असे निरीक्षणही विशेष खंडपीठाने आरोपींची निर्दोष सुटका करताना नोंदवले. गेल्या १९ वर्षांपासून बंदिस्त असेलल्या प्रकरणातील सगळ्या आरोपींची जामिनावर तातडीने सुटका करण्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले. वास्तविक, सत्र न्यायालयाने या प्रकरणी १३ आरोपींना दोषी ठरवले होते. तथापि, एका आरोपीचा मृत्यू झाला. त्यालाही फाशीची शिक्षा सुनावण्यात आली होती.



## बांगलादेश : विमान शाळेवर कोसळून १९ ठार, १६४ जण जखमी

**ढाका, दि. २१ वृत्तसंस्था**

बांगलादेशच्या हवाई दलाचे प्रशिक्षणासाठीचे विमान कोसळून झालेल्या दुर्घटनेमध्ये किमान १९ जण ठार झाले आहेत. प्रशिक्षणासाठी वापरण्यात येणारे हे विमान राजधानी ढाक्यातील उत्तरा भागातल्या माईलस्टोन स्कूल अँन्ड कॉलेजच्या इमारतीवर कोसळले, असे आरोग्य मंत्रालयाचे मुख्य सल्लागार मुहम्मद युनूस यांचे विशेष सहाय्यक मोहम्मद सय्यदुर रहमान यांनी सांगितले. मृतांपैकी बहुतेक जण लहान मुले होती. या अपघातात अन्य डझनभर लोक जखमी झाले असल्याचेही त्यांनी सांगितले.

चिनी बनावटीचे एफ-७ बीजीआय या विमानाने दुपारी १ वाजण्याच्या सुमारास उड्डाण केले होते आणि अल्पावधीतच ते कोसळले. किमान १९ जण ठार झाले असून १६४ पेक्षा जास्त लोक जखमी झाले असल्याचे अग्निशामक सेवा आणि नागरी सुरक्षा विभागाचे महासंचालक ब्रिगेडीअर जनरल झ्यायेद कमाल यांनी पत्रकारांना सांगितले. बचाव पथकाला घटनास्थळी १९ मृतदेह आढळून आले आहेत. घटनास्थळी बचाव आणि (पान २ वर)

## मुख्यमंत्री आज गडचिरोलीत : एक कोटी वृक्ष लागवड मोहिमेचा करणार शुभारंभ

**गडचिरोली :** ''हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र'' अभियानांतर्गत, गडचिरोली जिल्ह्यात एक कोटी वृक्ष लागवड मोहिमेचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्या, मंगळवारी (दि. २२) होणार आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणूनही ते या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. येथील कृषी महाविद्यालयाच्या प्रांगणात दुपारी २ वाजता हा मुख्य कार्यक्रम होईल. या कार्यक्रमाला सहपालकमंत्री ॲडव्होकेट आशिष जयस्वाल, खासदार डॉक्टर नामदेव किरसान, आमदार सुधाकर अडबाले, आमदार डॉक्टर अभिजित वंजारी, आमदार धर्मरावबाबा आत्राम यांच्यासह जिल्ह्याचे पालक सचिव मिलिंद म्हैसकर, जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा आणि मुख्य वनसंरक्षक रमेशकुमार उपस्थित राहणार आहेत. या मोहिमेतून जिल्ह्याला अधिक हरित बनवण्याचा संकल्प प्रशासनाने केला असून, मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीमुळे या अभियानाला मोठे बळ मिळणार आहे. या कार्यक्रमाची जय्यत तयारी प्रशासनाकडून करण्यात आली आहे.



## ऑपरेशन सिंदूरवर संसदेत तुफान हंगामा!

### सरकारने मान्य केली चर्चेची मागणी

**नवी दिल्ली :** संसदेच्या पावसाळी अधिवेशनाला सोमवारी सुरुवात होताच विरोधकांनी 'ऑपरेशन सिंदूर'सह अनेक मुद्द्यांवर जोरदार हंगामा केला. यामुळे दोन्ही सभागृहांची कार्यवाही वारंवार स्थगित करावी लागली. अखेर सरकारने या मुद्द्यांवर चर्चेसाठी तयारी दर्शवली असून, लोकसभेत १६ तास आणि राज्यसभेत ९ तास अशी एकूण २५ तास 'ऑपरेशन सिंदूर'वर चर्चा होणार आहे.

अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विरोधी पक्षांनी 'ऑपरेशन सिंदूर', पहलगाम दहशतवादी हल्ला, अमेरिकी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या मध्यस्थीच्या दावे आणि बिहारमधील मतदार यादीच्या विशेष पुनरीक्षणासह विविध मुद्द्यांवर चर्चेची (पान २ वर)

## ईडीने सर्व मर्यादा ओलांडल्या : सरन्यायाधीश

**नवी दिल्ली, दि. २१ वृत्तसंस्था**

सक्तवसुली संचालनालयाने सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत, हे असं चालू देऊ शकत नाही, अशा कठोर शब्दांत आज सर्वोच्च न्यायालयाने ईडीला फटकारले. वकिलांनी त्यांच्या क्लायंटना दिलेल्या सल्ल्यांवरून त्यांना समन्स पाठवण्यात आल्याच्या प्रकरणावर सुनावणी करताना सरन्यायाधीश बी. आर. गवई यांनी हे तीव्र निरीक्षण नोंदवलं.



सरन्यायाधीशांनी सॉलिसिटर जनरल तुषार मेहता आणि ॲडिशनल सॉलिसिटर जनरल एस.व्ही. राजू यांना सुनावले आणि स्पष्टपणे सांगितले की, आपल्याला काही मार्गदर्शक तत्वांची गरज आहे, हे असं चालू राहू शकत नाही. ईडीच्या अधिकाऱ्यांनी सर्व सीमा ओलांडल्या आहेत. याआधी दोन प्रकरणांतही आम्ही ॲडिशनल सॉलिसिटर जनरल राजूंना सांगितलं होतं की त्यांनी तोंड उघडू नये, नाहीतर आम्हाला काही तीव्र टिपण्णी करावी लागेल. ईडीने काही ज्येष्ठ वकिलांना केवळ त्यांनी त्यांच्या क्लायंटना दिलेल्या सल्ल्यावरून समन्स पाठवले होते. बार असोसिएशन्सनी यावर तीव्र आक्षेप नोंदवून सरन्यायाधीशांना पत्र लिहिले होते. या समन्समुळे न्यायव्यवस्थेची स्वायत्तता आणि वकिलांचा स्वतंत्रपणे काम करण्याचा हक्क धोक्यात येतो, असं या पत्रात नमूद करण्यात आलं. वरिष्ठ वकिल अरविंद दातार आणि प्रताप वेणुगोपाल यांना अलीकडे ईडीने समन्स पाठवले होते. (पान २ वर)

## जुलैपासून महागाई भत्त्यात ४ टक्के वाढ

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांसाठी मोठी दिलासादायक बातमी आहे. महागाई निर्देशांकाच्या ताज्या आकड्यांच्या आधारे, जुलै २०२५ साठी महागाई भत्त्यात ४ टक्के वाढ होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. यामुळे सध्या ५५ टक्के असलेला महागाई भत्ता ५९ टक्क्यांपर्यंत पोहोचू शकतो. न्यूज १८ ने याबाबतचे वृत्त दिले आहे. महागाई भत्ता दरवर्षी दोनदा जानेवारी आणि जुलै महिन्यांपासून लागू होणाऱ्या फेब्रुवारी-मार्च आणि सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये जाहीर केला जातो.






# पान 1 वरून...

## ७/११ मुंबई बॉम्बस्फोट ...

मुक्तता केली होती. मात्र, मृत्युदंडाच्या संदर्भात आणि दोषी आरोपींच्या अपीलवर उच्च न्यायालयातील न्यायमूर्ती किलोर आणि न्यायमूर्ती चांदक यांच्या खंडपीठासमोर सुनावणी सुरू होती. या खटल्यात अतिरिक्त सॉलिसिटर जनरल राजा ठाकरे आणि विशेष सरकारी वकील चिमलकर यांनी राज्य सरकारची बाजू मांडली होती. जुलै २०२४ पासून या खंडपीठासमोर सुनावणी सुरू होती आणि २७ जानेवारी २०२५ रोजी अभियोग तसेच बचाव पक्षाचे युक्तिवाद पूर्ण झाले होते. आज, उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने निकाल दिला, ज्यामध्ये मृत्युदंडाचे संदर्भ नाकारण्यात आले आणि दोषी आरोपींचे अपील मान्य करण्यात आले. विशेष न्यायालयाचा निकालही रद्द करण्यात आला आहे. दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाने म्हटले आहे की, या खटल्याच्या विशेष अभियोक्तांशी सल्लामसलत करून आणि निकालाच्या सखोल विश्लेषणानंतर पुढील निर्णय घेण्यात येईल. महाराष्ट्र एटीएसने मुंबई उच्च न्यायालयाच्या या निकालाविरोधात सर्वोच्च न्यायालयात जाण्याची तयारी केली आहे. सर्वोच्च न्यायालयात जाण्यापूर्वी उच्च न्यायालयाच्या निकालाचे अवलोकन करून त्याचा सखोल अभ्यास केला जाईल आणि सरकारी वकिलांशी चर्चा करूनच ही प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे. न्यायमूर्ती किलोर आणि न्यायमूर्ती चांडक यांच्या विशेष खंडपीठासमोर या प्रकरणी पाच महिने नियमित सुनावणी सुरू होती. प्रदीर्घ सुनावणीनंतर गेल्या ३१ जानेवारी रोजी विशेष खंडपीठाने आपला निकाल राखून ठेवला होती. या प्रकरणी सोमवारी निकाल देताना विशेष खंडपीठाने उपरोक्त निकाल दिला. त्यावेळी, राज्यभरातील वेगवेगळ्या तुरुंगात बंदिस्त असलेल्या प्रकरणातील फाशीची शिक्षा झालेल्या दोषसिद्ध आरोपींना दूरचित्रसंवाद माध्यमप्रणालीद्वारे (व्हिसी) सुनावणीला हजर करण्यात आले. निकालानंतर या आरोपींना त्या सगळ्यांची न्यायालयाने निर्दोष सुटका केल्याचे सांगण्यात आले.

## बांगलादेश : विमान शाळेवर ...

मदत कार्य अजूनही सुरू आहे. तत्पूर्वी या अपघातात १६ जण ठार झाले आणि किमान ७२ जण जखमी झाले असल्याचे आरोग्य मंत्रालयाचे मुख्य सल्लागार मुहम्मद युनूस यांचे विशेष सहाय्यक मोहम्मद सय्यदुर रहमान म्हणाले होते. अपघातात जखमी झालेल्यांना कंबाईन्ड मिलिटरी हॉस्पिटल, ढाका मेडिकल हॉस्पिटल, नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ बर्न ॲन्ड प्लॅस्टिक सर्जरी या रुग्णालयामध्ये नेण्यात येत असल्याचे देखील रहमान यांनी सांगितले. जखमींपैकी ८ जणांची प्रकृती चिंताजनक असल्याचे रुग्णालयाच्या सूत्रांनी सांगितले. विमानाचे वैमानिक फ्लाईट लेफ्टनंट मोहम्मद तौकिर इस्लाम यांच्यावरही कंबाईन्ड मिलिटरी हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. ज्या शाळेवर हे विमान कोसळले, त्या शाळेत इयत्ता पहिली ते सातवी पर्यंतचे विद्यार्थी शिकत होते. विमान कोसळल्याने या इमारतीचे मोठे नुकसान झाले आहे. विमान कोसळल्यानंतर मोठा स्फोट झाला आणि विमाननाने पेट घेतला. विमान पडल्यानंतर पोलीस, रुग्णवाहिका, अग्निशामक दलाची वाहने घटनास्थळी रवाना झाली. मृतांची ओळख अद्याप पटलेली नाही. हे विमान कोळण्यामागील कारण तपासले जाते आहे.

**एक दिवसाचा राष्ट्रीय दुखवटा**

बांगलादेशमधील हंगामी सरकारने या विमान अपघातात मरण पावलेल्याप्रती सहवेदना म्हणून दिनांक २२ जुलै रोजी एक दिवसाचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर केला आहे. या कालावधीमध्ये देशभरातील सरकारी इमारती आणि परदेशातील बांगलादेशच्या दूतावासांवरील राष्ट्रीय ध्वज अर्ध्यावर फडकणार आहे. देशाचे मुख्य सल्लागार डॉ. मुहम्मद युनूस यांनी या अपघाताबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले आहे.

## ऑपरेशन सिंदूरवर ...

मागणी करत नारेबाजी केली. यामुळे कार्यवाही अवघ्या २० मिनिटांत दुपारी १२ वाजेपर्यंत आणि नंतर २ वाजेपर्यंत स्थगित झाली. दुपारी २ वाजता पुन्हा सुरू झालेल्या कार्यवाहीतही गोंधळ कायम राहिल्याने पीठासीन सभापती संध्या राय यांनी सरकार चर्चेस तयार असल्याचे स्पष्ट केले. सरकारने विविध विधेयकांवर चर्चेसाठी वेळ निश्चित केला आहे. यात भारतीय डाक विधेयकावर ३ तास, आयकर दुरुस्ती विधेयकावर १२ तास, राष्ट्रीय क्रीडा विधेयकावर ८ तास आणि मणिपूर बजटवर २ तास चर्चा होणार आहे. तेलुगु देसम पक्षाने १९७५ च्या आणीबाणीच्या ५०व्या वर्षगांठीवर चर्चेची मागणी केली, तर भाजप खासदार अनुराग ठाकूर यांनी हिमाचलमधील पूर आणि पावसाच्या समस्येवर चर्चेची मागणी केली. हे अधिवेशन २१ जुलै ते २१ ऑगस्टपर्यंत ३२ दिवस चालणार असून, २१ बैठका होणार आहेत. स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमांसाठी १२ ते १७ ऑगस्टदरम्यान सभागृहे स्थगित राहतील.

## ईडीने सर्व मर्यादा ओलांडल्या ...

नंतर ईडीने समन्स मागे घेतले आणि स्पष्टीकरण देत म्हटले की, पुढील वेळी वकीलांना समन्स पाठवायचा झाल्यास केवळ ईडी संचालकाच्या मंजुरीनंतरच तो पाठवला जाईल. या प्रकरणावरून सर्वोच्च न्यायालयाने स्वतः हून दखल घेतली. याआधी २५ जून रोजी गुजरातमधील एका प्रकरणात न्यायमूर्ती के.व्ही. विश्वनाथन आणि न्यायमूर्ती एन. कोटेश्वर सिंग यांच्या खंडपीठानेही या प्रकारावर चिंता व्यक्त केली होती. हा प्रश्न फक्त एका वकिलाचा नाही, तर संपूर्ण न्यायव्यवस्थेच्या प्रभावी कार्यपद्धतीचा आणि वकिलांच्या निर्भयपणे काम करण्याच्या अधिकाराचा आहे, असं कोर्टाने स्पष्ट केलं. सरन्यायाधीशांच्या टीकेला उत्तर देताना सॉलिसिटर जनरल तुषार मेहता म्हणाले, या संपूर्ण प्रकरणामागे एक नियोजित प्रचार आहे जो एका संस्थेविरुद्ध खोटी कहाणी उभी करण्याचा प्रयत्न करतोय. कृपया न्यूज आणि मुलाखतींकडे लक्ष देऊ नका. मात्र त्यांनी मान्य केलं की, वकिलांना त्यांच्या कायदेशीर सल्ल्यामुळे समन्स पाठवता येत नाही.

# न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्याविरुद्ध महाभियोग चालणार

**नवी दिल्ली, दि. २१ वृत्तसंस्था**





**२०७ खासदारांचा पाठिंबा**

घरात बेहिशेबी रोख रक्कम सापडल्याप्रकरणी चर्चेत आलेले उच्च न्यायालयाचे न्यायाधीश यशवंत वर्मा यांना त्यांच्या पदावरून हटविण्यासाठी संसदेत महाभियोगाची प्रक्रिया सुरू झाली आहे. सोमवारी, संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी, लोकसभेच्या १४५ खासदारांनी वर्मा यांच्याविरुद्ध आणलेल्या महाभियोग प्रस्तावावर स्वाक्षरी केली. तर, राज्यसभेतील ५४ खासदारांनी महाभियोग प्रस्तावाला पाठिंबा दिला. खासदारांनी स्वाक्षरी केलेले निवेदन लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला आणि राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांना सादर केल्यानंतर न्यायमूर्ती वर्मा यांच्याविरुद्ध महाभियोगाची पुढील कार्यवाही सुरू झाली आहे.

संविधानाच्या कलम १२४, २१७ आणि २१८ अंतर्गत दाखल केलेल्या या महाभियोग प्रस्तावाला भाजप, काँग्रेस, टीडीपी, जेडीयू, सीपीएम यासह विविध पक्षांच्या खासदारांचा पाठिंबा मिळाला आहे. या प्रस्तावावर अनुराग ठाकूर, रविशंकर प्रसाद, राहुल गांधी, प्रियंका गांधी, राजीव प्रताप रुडी, सुप्रिया सुळे, केसी वेणुगोपाल आणि पीपी चौधरी यांसारख्या खासदारांनी स्वाक्षरी केली. उच्च सभागृहात, सभापती जगदीप धनखड म्हणाले की, त्यांना न्यायमूर्ती वर्मा यांना हटविण्याची मागणी करणारा प्रस्ताव मिळाला आहे, ज्यावर ५० हून अधिक राज्यसभा खासदारांच्या स्वाक्षऱ्या आहेत. उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना पदावरून हटविण्याची प्रक्रिया सुरू करण्यासाठी आवश्यक संख्येपेक्षा ही जास्त आहे.

ते म्हणाले की, जर प्रस्ताव एका सभागृहात आला तर तो स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार पीठासीन अधिकाऱ्यांना आहे. परंतु जर प्रस्ताव दोन्ही सभागृहात एकाच दिवशी आला, तर तो सभागृहाची मालमत्ता बनतो. मुख्य न्यायाधीश, उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आणि एक सदस्य यांचा समावेश असलेली तीन सदस्यांची समिती स्थापन केली जाते. या समितीच्या अहवालानंतर, सभापती किंवा अध्यक्ष या प्रस्तावावर निर्णय घेऊ शकतात. अध्यक्ष जगदीप धनखड यांनी राज्यसभेच्या महासचिवांना हा प्रस्ताव लोकसभेतही आला आहे की नाही, याची पुष्टी करण्यास सांगितले. यावर कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल म्हणाले की, लोकसभेतही अध्यक्षांकडे प्रस्ताव सादर केला आहे.

याची पुष्टी झाल्यानंतर, राज्यसभेच्या अध्यक्षांनी महाभियोग प्रक्रिया पुढे नेण्यासाठी आवश्यक पावले उचलण्याचे निर्देश महासचिवांना दिले. धनखड यांनी असेही म्हटले की, त्यांना मिळालेल्या प्रस्तावावर ५५ स्वाक्षऱ्या आहेत, परंतु स्वाक्षरी करणाऱ्या सदस्यांची संख्या फक्त ५४ आहे. एका सदस्याने दोनदा स्वाक्षरी केली आहे. त्या सदस्याची दुसरी स्वाक्षरी अवैध ठरेल. संविधानानुसार, सर्वोच्च न्यायालय किंवा उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना काढून टाकण्याच्या राष्ट्रपतींच्या आदेशानंतर, किमान १०० लोकसभा किंवा ५० राज्यसभेच्या खासदारांनी स्वाक्षरी केलेला प्रस्ताव मंजूर करणे आवश्यक आहे. प्रस्ताव स्वीकारावा की नाही, हे सभापती किंवा अध्यक्ष ठरवतात.

## विदर्भ साहित्य संघ; शाखा अकोलातर्फे स्व. प्रा. पंढरीनाथ मांडवगणे यांना श्रद्धांजली

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. २१ :** विदर्भ साहित्य संघ; शाखा अकोलाचे संस्थापक सदस्य तथा मार्गदर्शक स्व. प्रा. पंढरीनाथ मांडवगणे यांचे नुकतेच निधन झाले. त्यांना कार्यकारिणीतर्फे श्रध्दांजली अर्पण करण्याचा कार्यक्रम विदर्भ साहित्य संघ; अकोला शाखेने रविवार, दि. २० जुलै रोजी तोष्णीवाल ले-आऊट स्थित प्रभात किड्स, अकोला येथील सभागृहात आयोजित केला होता.

या प्रसंगी विदर्भ साहित्य संघ, शखा अकोलाचे अध्यक्ष विजय कौसल, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य डॉ. गजानन नारे, ज्येष्ठ सदस्य बाजी वझे, प्रा.डॉ. किरण वाघमारे, सहसचिव मोहिनी मोडक यांनी स्व. प्रा. मांडवगणे यांच्या विदर्भ साहित्य संघ; शाखा अकोलातील महत्त्वपूर्ण योगदानाचा आणि त्यांनी आयोजित केलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आणि जिल्हास्तरीय, विभागीय साहित्य संमेलनाच्या यशस्वी आयोजनाच्या आठवणी सांगितल्या. तसेच त्यांचे इंग्रजी वाङ्‌मयाचे विद्यार्थी राहिलेले प्रा. डॉ. गजानन मालोकार यांनी आपल्या श्रध्दांजली मनोगतातून स्व. प्रा. पंढरीनाथ मांडवगणे यांच्या विविधांगी वैशिष्ट्यांवर प्रकाश टाकला. या श्रध्दांजली सभेला कार्यकारिणी मंडळातील उपाध्यक्ष सुरेश पाचकवडे, कार्याध्यक्ष डॉ. विनय दांदळे, सचिव प्रा. डॉ. सुहास उगले, सहसचिव सौरभ पोफळी, ज्येष्ठ नाटकर्मी अशोक ढेरे, अमोल गोंडचवर, प्रा. मोहन काळे, सौ. श्वेता चिटोमे, श्रीमती लता कराळे आदींनी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करुन स्व. प्रा. पंढरीनाथ मांडवगणे यांच्या प्रती शोकसंवेदना व्यक्त केल्यात.

## शशिकांत शिंदे यांचा आज सत्कार



**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**मुंबई, दि. २१ :** महाराष्ट्र राज्य माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियनचे कार्याध्यक्ष, माजी मंत्री व महाराष्ट्र विधान परिषदेचे आमदार शशिकांत जयवंतराव शिंदे यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) च्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष पदी निवड झाली आहे. शशिकांत शिंदे यांच्या या निवडीबद्दल त्यांचा तमाम माथाडी कामगारांच्यावतीने मंगळवार दि. २२ जुलै, २०२५ रोजी सायंकाळी ४-०० वाजता कै. शिवाजीराव पाटील सभागृह, पहिला मजला, माथाडी भवन, प्लॉट नं. १४/अ, सेक्टर नं.१९, तुर्भे, नवा मुंबई याठिकाणी भव्य सत्कार आयोजित केला आहे. या भव्य सत्कार समारंभास बहुसंख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन नरेंद्र अण्णासाहेब पाटील, सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन तसेच युनियनचे सर्व पदाधिकारी यांनी केले आहे.

## वक्फ कायदा संशोधनाविरोधात अकोल्यात संविधान अधिकार परिषद

### मुस्लिम नेत्यांचा निर्धार: शेवटच्या श्वासापर्यंत लढा देऊ

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. २१ :** वक्फ कायदा २०२५ मधील प्रस्तावित सुधारणा विरोधात मुस्लिम समाजात संतापाची लाट निर्माण झाली असून, अकोल्यात जमात ए इस्लामी हिंदच्या वतीने मोमिनपुरा मशिदीत संविधान अधिकार परिषदेचे आयोजन करण्यात आले. या परिषदेला मोठ्या प्रमाणावर नागरिकांनी उपस्थिती लावली.या परिषदेत ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाचे प्रवक्ते डॉ. कासिम रसूल इलियास व जमात ए इस्लामी हिंद महाराष्ट्रचे अध्यक्ष मौलाना इलियास खान फलाही यांनी प्रमुख मार्गदर्शन करत वक्फ कायद्यातील संशोधनाचा तीव्र निषेध नोंदवला.

डॉ. कासिम रसूल इलियास यांनी यावेळी म्हटले, ''सरकार या सुधारणांना समाजहिताचे स्वरूप देत असली तरी त्यामागे मुस्लीम समाजात फूट पाडण्याचा आणि वक्फ मालमत्तांवर हस्तक्षेप करण्याचा उद्देश आहे. बाबरी मशिदीसारखी परिस्थिती निर्माण करून धार्मिक आणि सामाजिक संपत्तीवर नियंत्रण मिळवण्याचा हा प्रयत्न आहे.मौलाना इलियास खान फलाही यांनी ''वक्फ म्हणजे मुस्लीम समाजाच्या श्रद्धेने आणि इस्लामच्या तत्वांवर आधारित दानधर्म ज्यावर कोणताही हस्तक्षेप धार्मिक स्वातंत्र्याचा भंग आहे'' असे सांगत नवीन सुधारणांमुळे ऐतिहासिक मशिदी, दर्गे आणि कब्रस्तानांचे अस्तित्व धोक्यात येईल, अशी भीती व्यक्त केली.

## सुमय्या अली यांना समाजरत्न पुरस्कार

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**अकोला, दि. २१ :** १९ जुलै २०२५ रोजी मराठवाडा नांदेड ज्येष्ठ विश्राम सभागृह येथे सुमय्या अली राष्ट्रीय अध्यक्षा नारी शक्ती सेवा फाउंडेशन यांना समाज रत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला हा पुरस्कार राष्ट्रीय भ्रष्टाचार विरोधी समिति के संस्थापक सय्यद साबीर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला सुमय्या अली गेल्या अनेक वर्षापासून सामाजिक कार्यात कार्यरत आहे आतापर्यंत यांनी एडस, लोकसंख्या वाढ, वृक्षरोपन, व्यसन मुक्ति, साफ सफाई अभियान, लहान गरीब मुलांना मोफत पुस्तकें, कपड़े यांचे वाटप, दिन दलित गरीब कष्ठ करी कामगार शोषित पीड़ित युवक महिला व शेतकरी यांना न्याय मिळून देणयाकरीता प्रयत्नशील आहेत ते नेहमी गरजू गरीब नागरिकांना अनेक वेळा रक्तदान करून त्यांचे जीवन वाचवीले आहे तसेच कोरोना काळात गरजू रुगनांना ऑक्सीजन उपलब्ध करुण देणया करीता खूप प्रयत्न केले आहे दुर्घटना घडल्यास जख्मी लोकांची सहायता करुण त्यांचे जीवन वाचविले आहे.

सर्व धर्म संभवयच्या दृष्ठि ने ईद मिलन, दिवाळी मिलन, दशहरा मिलन, गणेश उत्सव, दुर्गा उत्सव, पुलिस प्रशासनाचे सहकार्य करणे, मुलांना शिक्षण हेतू प्रोतसाहित करणे, महिला सशक्तिकरण करणे, युवा करना क्रीडा साठी प्रोत्साहित करणे सांस्कृतिक कार्यक्रम करणे अशे अनेक कार्य आपले नारी शक्ति सेवा फाउंडेशनच्या मार्फत केले आहे ज्यांची दखल घेऊण त्यांना महाराष्ट्र शासन पुरस्कार, राष्ट्रीय समाज भूषण पुरस्कार, राष्ट्रीय संघर्ष नायक पुरस्कार, राष्ट्रीय सेवा रत्न पुरस्कार, जीजामाता पुरस्कार, त्यागमूर्ति माता रमाई अंबेडकर गौरव पुरस्कार, महिला सम्मान पुरस्कार, विदर्भ स्तरीय मातृशक्ति सम्मान पुरस्कार,, स्वामी विवेकानंद पुरस्कार, बेस्ट सोशल वर्कर अवार्ड, राज्यस्तरीय गुण गौरव पुरस्कार, स्त्री शक्ति सम्मान पुरस्कार, महिला कार्य गौरव रत्न पुरस्कार, महाराष्ट्र रत्न पुरस्कार अशे अनेक पुरस्काराने सम्मानित करणयात आले या सर्व बाबीची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून मराठवाडा चे अध्यक्ष राजकुमार सूर्यवंशी, उपाध्यक्ष अब्दुल सोहेल, सचिव अखिल रामपुरी व जिल्हाध्यक्ष हसनत बलिख व आदी मान्यवर उपस्थित होते सुमय्या अली यांना हा पुरस्कार मिळाल्या बद्दल त्यांचा सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## श्री समर्थ पब्लिक स्कूलमध्ये विद्यार्थी संसदेची स्थापना व शपथविधी सोहळा

### तनिष्का धोरण हेड गर्ल तर श्लोक अग्रवाल हेड बॉय म्हणून निवड

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**अकोला, दि. २१ :** भारत देश हा लोकशाहीसंपन्न राष्ट्र आहे. शालेय जीवनापासूनच विद्यार्थ्यांना लोकशाहीचे महत्त्व कळावे, त्यांच्यात नेतृत्व गुणांची रुजवणूक व्हावी तसेच समाज सेवेबद्दल त्यांच्यात आवड निर्माण व्हावी, या हेतूने श्री समर्थ पब्लिक स्कूल,रिधोरा येथे विद्यार्थी प्रतिनिधी मंडळ निर्वाचित केले असून नवनियुक्त विद्यार्थी प्रतिनिधी मंडळाचा शपथविधी सोहळा श्री समर्थ पब्लिक स्कूलच्या भव्य प्रांगणात संपन्न झाला. यावेळी व्यासपीठावर सस्थेचे अध्यक्ष प्रा.नितीन बाठे,संस्थेच्या संचालक प्रा.जयश्री बाठे, श्री.राजेश बाठे,प्रा.किशोर कोरपे, प्रा.योगेश जोशी,डॉ.जी.सी.राव, प्राचार्य डॉ. उषालता वानखडे,उपप्राचार्य प्रेमेंद्र पळसपगार यांची प्रमुख उपस्थिती होती.समर्थच्या वतीने नवनिर्वाचित विद्यार्थी प्रतिनिधींना सामाजिक शास्त्र विभाग प्रमुख पुरुषोत्तम मुरकर यांनी पदांची शपथ दिली. दीपप्रज्वलन करुन संस्थाध्यक्ष प्रा.नितीन बाठे यांनी कार्यक्रमाला विधिवत सुरुवात केली.यावेळी पाहुण्यांची यथोचित भाषणे झाली.हेड गर्ल तनिष्का धोरण आणि हेडबॉय श्लोक अग्रवाल यांचीही भाषणे झाली.दोघांनीही वर्षभरातील उपक्रमांच्या नियोजनाची कल्पना त्यांनी दिली.पहिली ते नववीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी सुरेख नृत्य सादर करुन सर्वांची मने जिंकली.यावेळी संगीत विभागाच्या विद्यार्थीनींनी स्कूल साँग सादर केले. याप्रसंगी हेड बॉय श्लोक अग्रवाल,हेडगर्ल तनिष्का धोरण,व्हॉइस हेड बॉय गौरज भाकरे, वाईस हेड गर्ल संचिता राजनकर , स्पोर्ट कॅप्टन योगीराज माळी, स्पोर्ट व्हॉइस कॅप्टन स्नेहल लांडे, हेल्थ अँड हायजिन कॅप्टन वंश चौरपगार, हेल्थअँड हायजिन व्हाईस कॅप्टन पलक मांडोलकर , डिसिप्लिन कॅप्टन आदिती ठोसर, व्हाईस कॅप्टन अवनीश भांड या सर्व विद्यार्थ्यांची निवड करुन सन्मान करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रेयश लोखंडे आणि आस्था ढेंगे या विद्यार्थ्यानी केले. विद्यार्थी संसदेतील विजेत्यांना परेडच्या माध्यमातून सलामी देऊन कार्यक्रमाची शोभा वाढविली. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

## महापालिकेचा यू-टर्न; 'आप'च्या चार मागण्या मान्य, पाच मागण्यांबाबत सकारात्मक आश्वासन

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**अकोला, दि. २१ :** शहरातील मूलभूत नागरी समस्या आणि महापालिकेच्या उदासीन कारभाराविरोधात आम आदमी पक्षाच्या वतीने सुरू असलेल्या साखळी आणि आमरण उपोषणाला अखेर यश मिळाले. ७ जुलैपासून सुरू झालेल्या आंदोलनानंतर सातव्या दिवशी म्हणजेच २१ जुलै रोजी महापालिका प्रशासनाने झुकत चार मागण्यांवर लेखी आश्वासन व पाच मागण्यांचे आश्वासन दिले. त्यामुळे महानगराध्यक्ष अलहाज मसूद अहेमद खान यांनी आमरण उपोषण मागे घेतले.

१५ जुलैपासून मसूद अहेमद खान व अशोक शेगोकार यांनी उपोषण सुरु केले होते. सहा दिवसांपासून प्रकृती खालावलेली असूनही प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने संतापाची लाट उसळली होती. अखेर मनापा सहआयुक्त विठ्ठल देवकते,विजय पारतवार यांनी उपोषणकर्त्यांची भेट घेत सकारात्मक चर्चा करत या पाच मागण्यांवर लवकरात लवकर कार्यवाही करण्याचे आश्वासन देत उपोषणकर्त्यांना शरबत पाजून उपोषण मागे घेण्याची विनंती केली.

शाळांमध्ये एलईडी बोर्ड, पंखे, स्वच्छतागृह, वाढीव प्रभागांत सिमेंट रस्ते व नाले, दररोज/एक दिवसाआड पाणीपुरवठा, तसेच १० हजारांवरील घरटॅक्सवर इन्स्टॉलमेंट सवलत अशा पाच प्रमुख मागण्यांचा समावेश आहे. उर्वरित मागण्यांवरही लवकरच निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली असून एका महिन्यात तोडगा न निघाल्यास 'आप'कडून तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

यावेळी कैलास प्राणजाळे, श्रावण रंगारी, अरमान खान पठाण, गजानन ठोंबरे, शेख मोईन खान, आकीब भाई, रामदास साळगण, शफिक भाई, विलास देशमुख, अनिस भाई, आसिफ भाई, फारुख खान, प्रदीप कुमार गवई, सागर प्राणजाळे यांची उपस्थिती होती.

# जनसुरक्षा कायद्याच्या विरोधात अकोला महानगर काँग्रेसचा 'एल्गार'!

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**अकोला, दि. २१ :** अकोला महानगर काँग्रेस कमिटीच्या वतीने सोमवारी स्वराज्य भवनासमोर लोकशाही विरोधी जनसुरक्षा कायदा रद्द करण्यासाठी तीव्र निदर्शने करण्यात आली. या कायद्याच्या माध्यमातून सरकार जनतेच्या मुलभूत अधिकारांवर गदा आणत असून, सरकार विरोधाचा आवाज दडपण्याचा प्रयत्न करत आहे, असा आरोप काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी केला.

या निदर्शनात ''जनसुरक्षा नव्हे, ही जनदडपशाही आहे'' असा नारा देत या कायद्याची तुलना ब्रिटिश राजवटीतील रॉलेट कायद्याशी तुलना करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय नागरिकांना दिलेले मूलभूत अधिकार हिरावणारा हा कायदा तात्काळ रद्द करण्याची मागणी या आंदोलनातून करण्यात आली. तसेच, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थ्यांना कायमचा रोजगार द्यावा, या मागणीसह महायुती सरकारने दिलेल्या आश्वासनावर ठाम राहावे, असा इशाराही काँग्रेसने दिला.

### जिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन

या आंदोलनाचे नेतृत्व आमदार साजिद खान पठान व महानगर काँग्रेस अध्यक्ष डॉ. प्रशांत पाटील यांनी केले. या वेळी प्रदेश सचिव प्रकाश तायडे, माजी आमदार बबन चौधरी, अब्दुल जब्बार, महेंद्र गवई, युवक काँग्रेस अध्यक्ष आकाश कवडे, महानगर अल्पसंख्याक अध्यक्ष मो. इरफान, कपिल रावदेव, कपिल ढोके, मा. नगरसेवक पराग कांबळे, जमीर बर्तनवाले, मो. नौशाद, फजलू पहेलवान, अकोला पूर्व विधानसभा अध्यक्ष अंकुश तायडे, एनसीयूआय अध्यक्ष अभिजीत तंवर, दत्ता देशमुख, गणेश कळसकर, रब्बानी शाह, फिरोज गवळी, अब्दुल्ला भाई, सज्जुभाई, सखावत शाह, सुनील वानखडे, संदेश वानखडे, पंकज वाडवे, सचिन तिडके, तपस्सु मानकीकर, सचिन शेजव, तशवर पटेल, मनीष हिवराळे, रमेश समुद्रे, राहुल सारवान, महेंद्र सत्याल, सोहेल खान, निलकंठ पाचकोहे, रविंद्र तायडे, भगवान गोवित, शेख अर्शद, मंजूरभाई, समीर खान यांच्यासह अनेक काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते व मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या आंदोलनामुळे शहरात चांगलाच राजकीय ऊहापोह निर्माण झाला असून सरकारने या मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे.

**टीसी हरविली**

साक्षी सुनील यादव,गजानन नगर गली नंबर ७ डापकी रोड अकोला माझा शाळा सोडल्याचा दाखला (Leaving Certificate) १८/७/२५ रोजी डापकी रोड येथे हरवला आहे. हा दाखला [N. K Ghokle heiher sec school of science] शाळेचा असून, माझा रोल नंबर २८८३ आहे.
जर कोणाला हा दाखला सापडला, तर कृपया ९८५०४७०१८३ वर संपर्क साधावा.

धन्यवाद,
**साक्षी सुनील यादव**
९८५०४७०१८३

**जाहीर प्रसिद्धी**

मी हसरत बी मोहम्मद खाँ पठाण रा. टूनकी तालुका संग्रामपूर जिल्हा बुलढाणा असे जाहीर करतो की, माझे जुने पासपोर्ट (क्र. K १७३०५२७ ) मध्ये नाव HASARAT BEE MOHAMMAD KHAN PATHAN असे होते. आज रोजी माझे आधारकार्ड नुसार नाव HASRAT BEE MOHAMMAD KHA PATHAN असे आहे. यापुढे सर्व व्यवहार याच नावाने होतील. करिता प्रसिद्धी दिली आहे.

**- आपली विश्वासु**
- HASRAT BEE MOHAMMAD KHA PATHAN
At post - Tunki bk Taluka - sangrampur Dist - Buldana 444204

## थोडक्यात

### केरळच्या महिलेचा ‘युएई’मध्ये गूढ मृत्यू



**नवी दिल्ली:** केरळमधल्या महिलेचा युएईमध्ये गूढ मृत्यू झाला आहे. त्यानंतर या महिलेच्या कुटुंबाने आरोप केला आहे की महिलेचा मृत्यू नैसर्गिक नसून हुंडाबळी आहे. आमच्या मुलीला हुंड्यासाठी छळलं जात होतं असं या विवाहितेच्या कुटुंबाने म्हटलं आहे. अतुल्या असं मृत विवाहितेचं नाव आहे. अतुल्याच्या कुटुंबाने तिच्या सासरच्या लोकांविरोधात कोलम पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. अतुल्याच्या कुटुंबाने म्हटलं आहे की,''अतुल्याचा नवरा आणि त्याच्या घरातले तिला हुंड्यासाठी शारिरीकदृष्ट्या आणि मानसिक दृष्ट्या छळत होते. १९ जुलैला अतुल्याचा मृतदेह तिच्या युएईतल्या घरात मिळाला. आमच्या मुलीला मारहाण होत होती आणि तिचा मानसिक छळ होत होता.'' असा आरोप कुटुंबाने केला आहे. अतुल्याच्या आईने तक्रारीत म्हटलं आहे की, अतुल्याचा नवरा सतीश याला आम्ही लग्नाच्या वेळी हुंडा दिला होता. तरीही तो खुश नव्हता. २०१४ मध्ये त्या दोघांचं लग्न झालं होतं. अतुल्याच्या वडिलांनी सांगितलं की आम्ही सतीशला हुंडा म्हणून २०१४ मध्ये बाईकही दिली होती. सतीशही कोलमचा होता. त्याला लग्नात बाईक, सोनं आणि पैसे देण्यात आले होते.

### मुस्लीम पुरुषाचा हिंदू महिलेशी निकाह; दोघांना विभक्त करण्याचा पंचायतीचा निकाल

**नवी दिल्ली:** हरियाणातील चरखी दादरी जिल्ह्यातील पट्टुवास या गावात रविवारी (२० जुलै) पंचायत भरवण्यात आली होती. या पंचायतीने एका अंतरधर्मीय विवाहित जोडप्याला (मुस्लीम तरुण व हिंदू तरुणी) विभक्त करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच मुस्लीम तरुणाच्या कुटुंबावर तीन गावांमध्ये बहिष्कार घालण्याची घोषणा केली आहे. चरखी दादरी जिल्ह्यातील महाराणा, खेरी संवल व पटुवास या तीन गावातील रहिवासी या पंचायतीला म्हणजेच बैठकीला उपस्थित होते. शाहिद हा मुस्लीम तरुण व प्रीती नावाच्या हिंदू तरुणीच्या निकाहमुळेळ तिन्ही गावांमध्ये निर्माण झालेल्या तणावावर या बैठकीत सलग चार तास चर्चा झाली. या चर्चे अंती पंचायतीने सदर अंतरधर्मीय जोडप्याला विभक्त करण्याचे आदेश दिले.कपूरसिंग व धरमपाल हे पट्टुवास गावाचे प्रमुख (सरपंच) या पंचायतीच्या बैठकीचे अध्यक्ष होते. या बैठकीत आदेश देण्यात आला की शाहिदने आता त्याच्या गावी परत येऊ नये. यावर त्याचे आजोब सहमत असल्याची माहिती धरमपाल यांनी पंचायतीला दिली. दरम्यान, पंचायतीने शाहिदच्या कुटुंबाशी कोणतेही समाजिक संबंध न ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.दरम्यान, या प्रकरणाविषयी धरमपाल म्हणाले, ‘‘विभक्त होण्याची प्रक्रिया आधीच सुरू केली आहे. ३ जुलै रोजी शाहिद व प्रीती यांचा निकाह (इस्लामिक विवाह सोहळा) पार पडला होता.

### २० रुपयांसाठी जन्मदात्या आईची केली हत्या

**जयसिंगपूर :** वीस रुपये देण्यास नकार दिला म्हणून एका मुलानं आपल्या जन्मादात्या आईची डोक्यात कुऱ्हाड घालून हत्या केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. हरियाणाच्या नूह जिल्ह्यातील जयसिंगपूर गावात हा प्रकार घडला आहे. ही घटना उघड झाल्यानंतर आसपासच्या गावकऱ्यांना मोठा धक्का बसला असून हळहळ व्यक्त केली जात आहे. आरोपी मुलाला अंमली पदार्थांचे व्यसन होते, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. पोलिसांनी या प्रकरणात आरोपी मुलाला अटक केली आहे. सदर आरोपीविरोधात हरियाणा पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल केला असून पुढील तपास चालू आहे. जमशेद असं आरोपी मुलाचं नाव आहे. एनडीटीव्हीने पोलिसांच्या हवाल्याने दिलेल्या वृत्तानुसार, आरोपी जमशेद त्याची आई रजियासोबत गावातल्या त्यांच्या मालकीच्या घरात राहात होता. आरोपीच्या वडिलांचं फक्त चारच महिन्यांपूर्वी निधन झालं होतं. यानंतर घरची सर्व जबाबदारी आईने उचलली होती. जमशेदला अंमली पदार्थांचं व्यसन होतं. गेल्या अनेक महिन्यांपासून तो मोठ्या प्रमाणावर गांजा व अफूचं व्यसन करत होता. रविवारी संध्याकाळी जमशेद नशेत असताना त्याचं आई रजिया यांच्याशी भांडण झालं. जमशेदनं आईकडे २० रुपये देण्याची मागणी केली. पण रजिया यांनी जमशेदच्या व्यसनामुळे त्याला पैसे देण्यास नकार दिला. यावरून दोघांमध्ये कडाक्याचं भांडण झालं. जमशेदला संताप अनावर झाला. त्यानं रागाच्या भरात घरातली कुऱ्हाड आईच्या डोक्यात घातली. या हल्ल्यात रजिया यांचा जागीच मृत्यू झाला.

# ‘डिजिटल गव्हर्नन्स’ ही गरज नाही तर आवश्यकता

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन | माहिती-तंत्रज्ञान आणि ‘समग्र’ संस्थेसोबत सामंजस्य करार

**मुंबई, दि.२१ वृत्तसंस्था**



महाराष्ट्राने नेहमीच डिजिटल रेग्युलेशन आणि प्रणालीमध्ये नेहमीच आघाडी घेतली आहे. त्यामुळे डिजिटल गव्हर्नन्स ही गरज नाही तर आवश्यकता आहे. त्यामुळे आता सर्व शासकीय सेवा, शासकीय योजना ह्या ऑनलाईनच्या माध्यमातून लोकांपर्यत सहज पोहोचतील. सामान्य लोकांना एकाच ठिकाणी सर्व शासकीय सेवा मिळेल. ‘नो ऑफीस डे’ म्हणजे कोणत्याही व्यक्तींला कार्यालयात यावे लागणार नसल्याने ऑफलाईन प्रक्रिया संपेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आज ‘समग्र’ या संस्थेसोबत यासंदर्भात सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड आशिष शेलार, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तथा सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव इक्बालसिंग चहल, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, माहिती तंत्रज्ञान संचालनालयाचे व्यवस्थापकीय संचालक कान्हुराज बगाटे, विकास आयुक्त दिपेंद्रसिंग कुशवाह, समग्रचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव गोयल, मुख्य तंत्रज्ञ राहुल कुलकर्णी, व्यवस्थापक अनय गोगाटे, संचालक अल्केश वाढवाणी आदी उपस्थित होते.

सर्व शासकीय सेवा ऑनलाईन देण्यासाठी सर्व विभागाने समन्वयाने काम केल्याने शासकीय सेवा किती सक्षम आहे, हे लोकांसमोर येईल आणि यामुळे शासनाचे ब्रँडिंग होणार असल्याचे मुख्यमंत्री श्री.फडणवीस यावेळी म्हणाले. माहिती तंत्रज्ञान आणि समग्र या संस्थेसोबत झालेल्या करारामुळे होणाऱ्या मूलभूत परिवर्तनास मुख्यमंत्र्यांनी शुभेच्छा दिल्या.

या ऑनलाईन प्रक्रियेत सर्व व्यक्तींने सहभागी होणे आवश्यक असल्याचे सांगून मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, व्हॉट्सॲपसारख्या प्लॅटफॉर्मवर सर्व शासकीय सेवा आणल्या जात आहे. कारण सर्वसामान्य व्यक्तींना व्हॉट्सॲप वापर करणे सोपे आहे. या प्रक्रियेसाठी वेळापत्रक ठरवून काम करण्यात येईल तसेच यासाठी प्रत्येक विभागाकरिता उद्दिष्ट आणि कालमर्यादा देखील ठरविल्या जातील. त्यामुळे या सेवा लवकरात लवकर सामान्यांपर्यंत पोहोचणे साध्य होणार आहे.

# चीनची नवी खेळी, भारतीय इलेक्ट्रॉनिक्स उद्योगावर संकट

## चीनने भारतातील फॉक्सकॉन कंपनीत काम करणाऱ्या सर्व अभियंते व तंत्रज्ञांना परत मायदेशी येण्याचे निर्देश

**नवी दिल्ली, दि.२१ वृत्तसंस्था**



अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनवर मोठ्या प्रमाणावर टॅरिफ आकारले. त्यामुळे चीनमधील उत्पादन विश्वाला धक्का बसला. चीनमधील अनेक उद्योग भारतात उत्पादन वाढवून इथून अमेरिकेत माल निर्यात करू लागल्या होत्या. मात्र, आता अमेरिका व चीनमधील टॅरिफ वॉर शांत झालं आहे, पण चीननं भारताविरोधात उद्योग विश्वात खेळी खेळायला सुरुवात केली आहे. त्याचाच परिणाम म्हणून शेवटी इंडिया सेल्युलर अँड इलेक्ट्रॉनिक्स असोसिएशन अर्थात ला भारत सरकारकडे दाद मागावी लागली.

भारतातील इलेक्ट्रॉनिक्स उद्योग विश्वातून नुकतीच केंद्र सरकारकडे चीननं भारतावर लादलेल्या ‘अघोषित व्यापार निर्बंधां’बाबत तक्रार करण्यात आली. नं यासंदर्भात केंद्र सरकारला धोक्याचा इशारा देणारं पत्रच लिहिलं आहे. ॲपल, गुगल, मोटोरोला, फॉक्सकॉन, व्हिवो, ओप्पो, लाव्हा, डिक्सन, फ्लेक्स आणि टाटा इलेक्ट्रॉनिक्स अशा कंपन्या या संघटनेच्या सदस्य आहेत. ‘‘चीनच्या या निर्णयामुळे भारतातील पुरवठा यंत्रणेवर परिणाम होत असून जागतिक उत्पादन केंद्र बनण्याच्या भारताच्या वाटचालीला धक्का बसत आहे'', असं या पत्रात नमूद करण्यात आलं आहे.

चीननं भारतातील फॉक्सकॉन प्लँटवर कार्यरत असणाऱ्या सर्व चीनी अभियंते व तंत्रज्ञांना भारत सोडण्याचे निर्देश दिले आहेत. फॉक्सकॉन ही ॲपलची सर्वात मोठी उत्पादक कंपनी आहे. फॉक्सकॉननं भारतातील जवळपास ३०० चीनी अभियंते व तंत्रज्ञांना चीनमध्ये परतण्याचे निर्देश दिले आहेत. ॲपलच्या भारतातील उत्पादन केंद्रांमध्ये लवकरच १७ चं उत्पादन सुरू केलं जाणार होतं.

### भारत सरकारची यासंदर्भातील भूमिका

दरम्यान, केंद्र सरकारचं या परिस्थितीकडे लक्ष असून या कंपन्यांकडून निर्धारित लक्ष्य पूर्ण केली जातील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. तसेच, तंत्रज्ञांची कमतरता कशी भरून काढायची, यासाठी ॲपल कंपनीकडे पर्यायी व्यवस्था असल्याचा विश्वास केंद्र सरकारला आहे

# जम्मू-काश्मीरला राज्याचा दर्जा देण्याच्या मागणीसाठी आंदोलन

**जम्मू, दि.२१ वृत्तसंस्था**

जम्मू-काश्मीर केंद्रशासित प्रदेशाला राज्याचा दर्जा पुन्हा द्यावा, अशी मागणी करीत आंदोलन करणाऱ्या काँग्रेसच्या अनेक कार्यकर्त्यांना रविवारी पोलिसांनी ताब्यात घेतले. ‘हमारी रियासत, हमारा हक’ असा नारा देऊन काँग्रेसने आंदोलन केले. काँग्रेसला रॅली काढण्याची परवानगी न देण्याची पोलिसांची ही दुसरी वेळ होती. काँग्रेसचा मोर्चा शनिवारी श्रीनगर येथे पोलिसांनी रोखला. प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष तारिक हमीद कारा आणि पक्षाचे सरचिटणीस जी. ए. मिर यांच्या नेतृत्वाखाली मोर्चाचे नियोजन केले होते. जम्मूतील पक्षाच्या मुख्यालयात शेकडो कार्यकर्ते जमले होते. राज भवनपर्यंत मोर्चा काढून नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांना ते निवेदन देणार होते. पण पोलिसांनी त्यांना पुढे जाऊ दिले नाही. कारा आणि मिर यांनाही पोलिसांनी ताब्यात घेतले. कारा यांनी अधिकाऱ्यांचा निषेध करत म्हटले की, ‘‘या कृतीद्वारे त्यांची मानसिकता दर्शविते की ते लोकशाही व्यवस्थेवर विश्वास ठेवत नाहीत आणि जनतेच्या आवाजाचा आदर करत नाहीत. काँग्रेस कार्यकर्ते अशांतता पसरवण्यासाठी रस्त्यावर उतरले नव्हते. जनतेची राज्य निर्मितीची तळमळ नायब राज्यपालांमार्फत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यापर्यंत पोहोचवण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले.'' पोलिसांच्या कृतीमुळे काँग्रेस दबून जाणार नाही, परंतु आमच्या हक्कांसाठी लढण्याचा आमचा निर्धार आणखी मजबूत करेल, असे ते म्हणाले.

# ‘ऑपरेशन अस्मिता’तून उघडकीस आले धर्मांतर रॅकेट: आरोपींकडून आयसिसच्या शैलीचा वापर; १० जणांना अटक



**नवी दिल्ली, दि.२१ वृत्तसंस्था**

छंगूर बाबा उर्फ जलालुद्दीन रॅकेटनंतर, उत्तर प्रदेश पोलिसांनी बेकायदेशीर धर्मांतराचे एक मोठे नेटवर्क उघडकीस आणले आहे. यासाठी ‘‘ऑपरेशन अस्मिता'' अंतर्गत ६ राज्यांमधून १० जणांना अटक करण्यात आली आहे.

पोलिसांचे म्हणणे आहे की, या नेटवर्कमध्ये सहभागी असलेले लोक लव्ह जिहादद्वारे धर्मांतर करायचे, परदेशातून निधी मिळवायचे आणि धर्मांधता पसरवायचे, जी दहशतवादी संघटना आयसिसची सिग्नेचर शैली आहे. या नेटवर्कचे बंदी घातलेल्या संघटना पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया, सोशल डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया आणि पाकिस्तानच्या दहशतवादी संघटनांशी संबंध असल्याचेही संकेत मिळाले आहेत.

या वर्षी मार्चमध्ये आग्राच्या सदर बाजार पोलीस ठाण्यात दोन सख्ख्या बहिणी बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल करण्यात आली होती. त्यांचे वय ३३ वर्षे आणि १८ वर्षे असे आहे. त्यानंतर पोलिसांनी बेकायदेशीर धर्मांतर कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. पोलिसांनी तपास केला तेव्हा हे प्रकरण एका मोठ्या नेटवर्कशी संबंधित असल्याचे आढळले. त्यानंतर प्रकरण सायबर पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आले आणि सखोल तपास सुरू करण्यात आला.पोलीस सूत्रांच्या माहितीनुसार, या नेटवर्कने इस्लामिक उपदेश, यूट्यूब चॅनेल आणि गुप्त ऑनलाइन सत्रांच्या माध्यमातून हिंदू मुलींचे ब्रेनवॉश करण्यासाठी स्थानिक एजंट्सची नेमणूक केली होती. अधिकाऱ्यांनी सांगितले की, मुलींना विविध आमिषे दाखवून त्यांना कट्टरपंथी बनवण्यात आले आणि नंतर बनावट ओळखपत्रांचा वापर करून त्यांची वेगवेगळ्या राज्यांत तस्करी करण्यात आली.

या विशिष्ट प्रकरणात, मोठी बहीण प्राणीशास्त्रात एम.फिल करत असताना आग्रामध्ये कोचिंग क्लासेस दरम्यान सायमा नावाच्या एका काश्मिरी महिलेच्या संपर्कात आली. सायमाने तिला २०२१ मध्ये काश्मीरला येण्यास राजी केल्याचा आरोप आहे, ज्यामुळे तिचे धर्मांतर झाले.

# १० वर्षांच्या मुलाचे ऑपरेशन सिंदूरमध्ये योगदान; सैनिकांना चहा-लस्सी पुरविली

**नवी दिल्ली, दि.२१ वृत्तसंस्था**

### सैन्यदल संपूर्ण शिक्षणाचा खर्च उचलणार



भारतीय सैन्यदलाने दहशतवाद्यांना धडा शिकविण्यासाठी ऑपरेशन सिंदूर राबवले होते. तीन दिवसांच्या या मोहिमेत जम्मू-काश्मीरपासून राजस्थान, पंजाब आणि गुजरातच्या सीमेवर भारतीय सैनिक पहारा देण्यासाठी तैनात होते. याकाळात फिरोजपूरच्या सीमेवर १० वर्षांच्या स्वर्ण सिंग या मुलाने सैनिकांची सेवा केली. सैनिकांना दूध, लस्सी, चहा आणि बर्फ पुरविला. त्याच्या या योगदानाची दखल घेत आता भारतीय सैन्यदलाच्या पश्चिम विभागाने त्याचा सन्मान केला आहे.

भारतीय लष्कराच्या पश्चिम कमांडने स्वर्ण सिंगचा शिक्षणाचा पूर्ण खर्च उचलण्याची घोषणा केली आहे. फिरोजपूर कॅन्टोन्मेंटमध्ये झालेल्या एका समारंभात पश्चिम कमांडचे जनरल ऑफिसर कमांडिंग-इन-चीफ लेफ्टनंट जनरल मनोज कुमार कटियार यांनी स्वर्ण सिंगचा सत्कार केला. यावेळी त्यांनी पंजाबचे लोक आणि भारतीय सैन्यदल यांच्या नात्यावर प्रकाश टाकला. तसेच पंजाबच्या पुढच्या पिढ्यातही सैन्यदलाबाबत आत्मीयता असल्याबद्दल समाधान व्यक्त केले.ऑपरेशन सिंदूर दरम्यान पंजाबच्या भारत-पाकिस्तान सीमेजवळ असलेल्या तारा वाली गावात तणावपूर्ण वातावरण होते. मात्र तरीही स्वर्ण सिंगने न डगमगता सैनिकांना सेवा दिली आणि धैर्य व राष्ट्रभक्तीचे एक उदाहरण प्रस्थापित केले. तारा वाली गावातील शेतकरी सोना सिंग यांचा मुलगा असलेला स्वर्ण हा इयत्ता चौथीत शिकत आहे. सोना सिंग यांच्या शेतात तैनात असलेल्या सैनिकांची स्वर्ण सिंगने आस्थेवाईकपणे सेवा केली.२२ एप्रिल रोजी पाकिस्तानपुरस्कृत दहशतवाद्यांनी जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथे पर्यटकांवर भ्याड हल्ला केला. या हल्ल्यात २६ जण मारले गेले.

# जपानमध्ये ट्रम्प यांच्यासारखी भूमिका असलेल्या पक्षाला मतदारांचा पाठिंबा!

**नवी दिल्ली, दि.२१ वृत्तसंस्था**

## महत्त्वाच्या निवडणुकीत मिळविला मोठा विजय



जपानमध्ये सत्ताधारी लिबरल डेमॉक्रेटिक पार्टी ला रविवारी झालेल्या संसदीय निवडणुकीत मोठा पराभव पत्करावा लागला आहे. या निवडणुकीत नवीन उजव्या विचारसरणीच्या गटांना फायदा मिळाल्याचे पाहायला मिळाले. या निकालामुळे अनेक दशकांपासून स्थिर असलेली जपानमधील राजकारणात मोठ्या घडामोडी पाहायला मिळू शकतात.

वरिष्ठ सभागृहाच्या निवडणूक लढवण्यात आलेल्या एकूण १२४ जागांपैकी एक तृतियांश जागा या विरोधी पक्षांना मिळाल्या आहेत. पण महत्त्वाची बाब म्हणजे याचा फायदा हा प्रामुख्याने पारंपरिक लिबरल विरोधकांना झालेला नाही तर तो राष्ट्रवादाच्या मुद्द्यावर तरुणांना साद घालणाऱ्या नव्या पक्षांना मिळाला. यामध्ये माजी सुपरमार्केट मॅनेजर आणि इंग्रजी शिक्षक आणि सोहेई कामिया यांच्या नेतृत्वाखालील पॉप्युलिस्ट पार्टी सॅनसेइटो या पक्षाचा समावेश होता. विशेष बाब म्हणजे, निवडणुकीच्या आधीच कामिया यांनी आपण अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या ‘बोल्ड पॉलिटीकल स्टाईल’ने प्रभावित असल्याचे म्हटले होते. वरिष्ठ सभागृहातील २४८ पैकी अर्धे सदस्य फेर-निवडणूक लढवत होते. निवडणुकीत यश मिळवणाऱ्या प्रमुख पक्षांमध्ये डेमोक्रॅटिक पार्टी फॉर द पीपल () आणि सॅनसेइटो हे दोन होते. जपानच्या माध्यमांनी दिलेल्या वृत्तांनुसार, या निवडणुकीत डीपीपी पक्षाच्या जागा वाढून ४ वरून १७ झाल्या आणि सॅनसेइटो पक्षाच्या जागा १ वरून १४ इतक्या वाढल्या आहेत.

सानसेइटो या पक्षाची सुरूवात कोरोना माहामारीच्या काळात यूट्यूबवर झाली, येथे ते व्हॅक्सिन आणि ग्लोबल इलिट्स यांच्याबद्दल कॉन्स्पिरसी थेअरी पसरवायचे, असे वृत्त साऊथ चायना मॉर्निंग पोस्टने दिले आहे. त्यानंतर या पक्षाने ‘जापनीज फर्स्ट’ या मोहिमेसह देशातील मुख्य राजकीय प्रवाहात प्रवेश केला. ‘‘जापनीज फर्स्ट ही घोषणा जागतिकीकरणाला विरोध करून जपानी लोकांच्या दैनंदिन जीवनमान पुन्हा उभे करण्याची भावना व्यक्त करण्यासाठी होती. माझं असं म्हणणं नाही की सर्व परदेशी लोकांवर पूर्णपणे बंदी घालावी किंवा परदेशी नागरिकांनी जपानमधून निघून जावे.'' असे सोहेई कामिया यांनी निवडणुकीनंतर एका टीव्ही चॅनलला दिलेल्या मुलाखतीत म्हटले होते. याचे कारण म्हणजे जपानमध्ये सध्या वृद्धांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे, तर दुसरीकडे परदेशात जन्मलेल्या लोकाची संख्या वाढत आहे, जी गेल्या वर्षी विक्रमी ३.८ दशलक्ष पर्यंत पोहचली आहे. ही संख्या एकूण लोकसंख्येच्या ३ टक्के इतकी आहे.जपानचे पंतप्रधान शिगेरू इशिबा यांच्या नेतृत्वाखालील एसडीपी आणि त्यांचे सहकारी कोमेइटो यांना त्यांच्याकडे असलेल्या ७५ जागांसह बहुमत राखण्यासाठी अजून ५० जागांची आवश्यकता होती. त्यांनी ४७ जिंकल्या. म्हणजेच त्यांना बहुमत गाठण्यासाठी तीन जागा कमी पडल्या. त्यांच्याकडे निवडणुकीच्या आधीपेक्षा १९ जागा कमी आहेत. ऑक्टोबरमध्ये या युतीच्या कनिष्ठ सभागृहातील पराभवानंतर हा निकाल लागला आहे. त्यामुळे १९५५ मध्ये एलडीपीच्या स्थापनेपासून ते दोन्ही सभागृहात पहिल्यांदाच अल्प-मतात आले आहेत.

निकाल विरोधात लागला असला तरी इशिबा यांनी आपण सत्तेत राहाणार असल्याचे म्हटले आहे. अमेरिकेकडून टॅरिफ लावण्याची धमकी दिली जाणे, यासारख्या समस्यांचा जपान सामना करत असताना त्यांना राजकीय पोकळी निर्माण करायची नाही, असे त्यांनी म्हटले आहे. मात्र त्यांना राजीनामा देण्यासाठी किंवा नवीन राजकीय आघाडी स्थापन करण्यासाठी अंतर्गत राजकीय दबावाचा सामना करावा लागू शकतो.या पराभवामुळे लगेचच सरकार बदलणार नाही, कारण वरिष्ठ सभागृहात अविश्वास ठराव मंजूर होऊ शकत नाही. पण यामुळे इशिबा यांच्या नेतृत्वाबद्दल अस्थिरता निर्माण होऊ शकते.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून दै.अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.* **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

आपले पत्र या मेलवर पाठवावे, आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

# संपादकीय...

## शेतकऱ्यांना हवे संरक्षण

जगातील पहिला व्यवसाय म्हणून शेतीकडे पाहिले जाते. त्यानंतर शेतीवर अनेक व्यवसाय उभे राहिले; परंतु आता शेतकऱ्यांनाच शेती कशी करायची, असे सांगण्याकडे कल वाढला आहे. शेती कशी करायची, हे सांगण्याऐवजी शाश्वत शेती आणि फायद्याची शेती कशी होईल, हे सांगायला हवे. इतर सर्व उत्पादनांची किरकोळ विक्रीची किंमत ठरविण्याचा अधिकार उत्पादकांना आहे. शेतीसाठी लागणारी खते, वीज, बियाणे, औजारे, मनुष्यबळ याची किंमत ठरविण्याचा अधिकार जसा शेतकऱ्यांना नाही, तसेच त्याच्या उत्पादनाची किंमतही त्याला ठरविता येत नाही. जगातील बेभरवशाचा आणि पराधीन असलेला हा एकमेव व्यवसाय आहे. शाश्वत पाणी, शाश्वत वीज आणि शाश्वत भाव या तीन गोष्टी असतील, तर शेतकऱ्यांना कुणाच्या दारात भीकेचा कटोरा घेऊन उभे राहण्याची गरज राहणार नाही. 'घामाचे दाम हवे, भीक नको', अशी शेतकऱ्यांचीही भूमिका आहे. निसर्गाच्या, किडींच्या अधीन राहून शेतीमालाचे जे उत्पादन येईल, त्याचा भाव ठरविण्याचा अधिकारही शेतकऱ्यांना नाही. बाजारातील मालाची आवक, सरकारचे आयात-निर्यात धोरण आणि जागतिक उत्पादन या सर्व घटकांचा बाजारभावावर परिणाम होत असतो. अमेरिकेसह अन्य देश त्यांच्या शेतकऱ्यांना ग्रीन बॉक्स, ब्ल्यू बॉक्स अशी वेगवेगळी अनुदाने देत असताना भारतात मात्र शेतकऱ्यांवर उपकार केल्याच्या भावनेतून काही तुकडे फेकले जात आहेत. शेतकऱ्यांच्या जखमांवर कृषिमंत्रीच मीठ चोळत आहेत. केंद्र आणि राज्याचे शेतीविषयक कायदे आहेत. त्यातही महसूल, नोंदणी व अभिलेख, मुद्रांक, ग्रामविकास, सहकार, अर्थ अशा अनेक खात्यांचे कितीही कायदे असले, तरी त्यांच्या एकत्रित परिणामांचा विचार केला, तर भारतीय शेतकऱ्यांना संरक्षण आहे, असे म्हणण्याचे धाडस कुणीही करू शकत नाही. केंद्र सरकार असो, की राज्य; त्यांना पिकविणाऱ्यांपेक्षा शहरी आणि खाणाऱ्या घटकांचीच जास्त चिंता असते. महागाई नियंत्रणात ठेवायचा मक्ता फक्त शेतकऱ्यांनीच घेतला आहे, असे वातावरण तयार केले जात आहे. बहुतांश माध्यमेही भांडवलदाराच्या हाती असून त्यांच्यावर शहरी वर्चस्व आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांकडे गुन्हेगारी आणि मानसिक व्याधी म्हणून पाहण्याचा हा जमाना आहे. शेतीची आणि ग्रामीण भागाशी नाळ तुटल्याने पोशिंदा म्हणविल्या जाणाऱ्या शेतकऱ्यांसाठी कुणीच वाली राहिला नाही. कृषी विद्यापीठात शिक्षण घेणारे नोकऱ्यांना प्राधान्य देताना माती आणि माणसांना विसरले आहेत. या पार्श्वभूमीवर आपल्या देशामध्ये शेतकरी वाचविण्यासाठी अधिकृत शेतकरी संरक्षण कायदा आला पाहिजे. त्यासाठी भारतीय जनसंसदेमार्फत शेतकरी संरक्षण कायद्याचा मसुदा तयार करण्यासाठी कृषी वैज्ञानिक व कायदेतज्ज्ञ डॉ. मुकुंदराव गायकवाड, प्रा. अशोक ढगे, ॲड. अजित काळे, भारतीय जनसंसदेचे राज्य अध्यक्ष अशोक सब्बन यांच्या मार्गदर्शनाखाली काम सुरू आहे. भारतीय जनसंसदच्या पदाधिकाऱ्यांची नगर येथे बैठक झाली. या बैठकीत शेतकरी संरक्षण कायद्यावर चर्चा करण्यात आली. भारतात शेतकऱ्यांना अत्यंत तुच्छ वागणूक मिळत आहे, याबद्दल नाराजी व्यक्त करण्यात आली. शेतकऱ्यांच्या पुणतांबे येथील आंदोलनातून शेतीमालाच्या भावाचा आणि शेतकऱ्यांच्या हक्कांची चर्चा सुरू झाली. आता तिला कायदेविषयक रुप यायला हवे. अनिल घनवट यांच्यासारखे शेतीप्रश्नाचे अभ्यासक आता त्यावर वैचारिक मंथन घडवून आणीत आहेत. जागतिक संघटनाही आता शेती आणि शेतकऱ्यांविषयी भाष्य करीत असताना आणि संरक्षणाचे मुद्दे मांडत असताना भारतात शेतीमालाच्या हमी भावासह अन्य कायदे करण्यासाठी व्यापक चळवळ उभी राहायला हवी. अमेरिकेतील सर्व पन्नास राज्यांनी शेतीच्या कामांना उपद्रवी खटल्यांपासून संरक्षण देण्यासाठी 'राईट टू फार्म' कायदे लागू केले आहेत. १९७० आणि १९८० च्या दशकात शेतजमिनीची कमी उपलब्धता आणि खासगी आणि सार्वजनिक उपद्रव कारवाईमुळे उद्भवणाऱ्या कायदेशीर आव्हानांना प्रतिसाद म्हणून हे कायदे लागू करण्यात आले. 'राईट टू फार्म'चा हेतू मानक शेती पद्धतींमध्ये कायद्याच्या व्यत्ययाचा धोका कमी करणे आहे. राज्य आणि स्थानिक सरकारे आता शेतीविषयक कामकाज नियंत्रित करणाऱ्या कायदेशीर संहितेचे नियमन करतात. स्थानिक कायदे बहुतेकदा अधिक विशिष्ट आणि स्पष्टपणे परिभाषित केले जातात, जे शेतीला पाठिंबा देण्यासाठी समुदायाची वचनबद्धता प्रतिबिंबित करतात. दोन्ही प्रकरणांमध्ये, हे कायदे शेतकऱ्यांना उपद्रव खटले आणि नियमांपासून संरक्षण देण्याची व्याप्ती स्पष्ट करतात. संपूर्ण अमेरिकेत शेतीचे अधिकार कायदे वेगवेगळे आहेत; परंतु मुख्य उद्देश शेतीच्या कामकाजाची वैधता मजबूत करणे, शेतकऱ्यांना अनावश्यक बाह्य हस्तक्षेपापासून संरक्षण देणे आणि सार्वजनिक आणि खासगी जमीन वापर संघर्ष सोडविणे हा आहे. चीनमध्येही आता शेतकरी संरक्षण कायदा झाला आहे. भारतात मात्र शेतीमालाला भाव नाही आणि शेतकऱ्यांना जगण्याचा सन्मानही नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या मोठ्या प्रमाणात होत आहेत. देश स्वतंत्र झाला, तेव्हाच शेतकऱ्यांना सुरक्षा व संरक्षण देण्यासाठी कायदा करणे गरजेचे होते; मात्र दुर्दैवाने तसेच झाले नाही. ग्राहक संरक्षण कायदा, पत्रवार संरक्षण कायदा तसेच डॉक्टरांना संरक्षण कायदा केला गेला आहे; परंतु राज्यात बहुसंख्य असलेल्या शेतकऱ्यांच्या संरक्षणाचा कायदा करावा, त्याची लूटमार थांबवावी, त्याच्या जीवनात आर्थिक स्थैर्य आणावे, असे दुर्दैवाने कुणालाही वाटले नाही. इसराइलमध्ये 'ॲग्रोस्को' व न्यूझीलंड आणि अमेरिकेसारख्या देशात शेतकऱ्यांना संरक्षण देणारे कायदे आहेत. शेतकरी हेलिकॉप्टरने फिरतात, तरीसुद्धा त्यांना संरक्षण देण्यासाठी जोखीम व्यवस्थापन व नुकसान भरपाई कायदा 'इर्मा' नावाने अस्तित्वात आहे. वाढत्या कर्जामुळे शेतकऱ्यांना आत्महत्येचा मार्ग पत्करावा लागत आहे. कर्ज मग ते खासगी सावकार असो वा बँकेचे; खराब पीक, दुष्काळ, अवकाळी पाऊस किंवा गारपीटीने ते फेडता आले नाही, की शेतकरी कोलमडतो. मानहानी सहन होत नाही आणि तो काळोखाचा मार्ग धरतो. त्याच्या आत्महत्या थांबविण्यासाठी सर्वंकष योजना, संवेदना आणि माणुसकी अशा त्रिसूत्रीची गरज आहे.



## लक्ष्यभेद

जयदीप सोनखासकर
9890508017

### जंगली रमी



जंगलातून आली रमा
शहरात झाली ती रमी
येई का आमच्या कामा
कोणी देईना तिची हमी

जुगारामुळे ते महाभारत
इतिहासात आहे घडलेले
ते ऑनलाईन सभागृहात
पुन्हा एकदा घडता पाहिले

दस्तुरखुद्द कृषीमंत्री रमती
जंगलापेक्षा या मायानगरात
केव्हा कष्टकऱ्यांची उपरती
सरकारी त्या अधिवेशनात

## ।। अभंगवाणी ।।

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१

कडू असो गोड
ती अवीट असावी ।
घातकी नसावी
भाषा कधी ।।

तुझी माझी भाषा
अभंग असावी ।
मलिन नसावी
कणभर ।।

भाषेतून व्हावे
प्रबोधन नित्य ।
बोलावीत सत्य
सुभाषिते ।।

भाषा करीतसे
अपुले नेतृत्व ।
व्हावेत विस्तृत
त्यामधूनी ।।

# महाराष्ट्राची कौशल्यातून आत्मनिर्भरतेकडे वाटचाल

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्ताने



प्रासंगिक

रवींद्र दांडगे
अंजनगाव (सुर्जी)

२२ जुलै हा दिवस महाराष्ट्रासाठी एक महत्त्वाचा दिवस. कारण या दिवशी राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री मा.ना. देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस.त्यांनी आपल्या २०१४ ते २०२५ च्या मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि पुन्हा मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात महाराष्ट्राच्या विकासाला नवी दिशा दिली. विशेषतः युवकांच्या भविष्यासाठी त्यांनी जे कार्य केले ते डोळे दिपवणारे आहे.त्यांच्या नेतृत्वात राज्याचे कौशल्य विकास मंत्री मा. ना. मंगलप्रभातजी लोढा यांच्या सहकार्याने कौशल्य विकासाच्या माध्यमातून लाखो युवकांना केवळ प्रशिक्षण नव्हे, तर आत्मनिर्भरतेचा आत्मविश्वास मिळवून दिला.

महाराष्ट्र राज्य हे देशाच्या विकासाचे इंजिन म्हणून ओळखले जाते. इंजिनाला गती द्यायची असल्यास उद्योग वाढीला प्रोत्साहन देण्याची गरज ओळखून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मेक इन इंडिया ही अभिनव योजना महाराष्ट्रात सन २०१५-१६ पासून प्रभावीपणे राबवली. उद्योग आले तर त्यासाठी लागणारे कौशल्यप्राप्त मनुष्यबळ हे महत्त्वाचे. तेव्हा त्यांनी त्या दिशेने आवश्यक ती सर्व पावले उचलली त्याचे चांगले परिणाम आता सध्या आपल्या महाराष्ट्रात दिसत आहे. आज संपूर्ण देशात महाराष्ट्र हा परकीय गुंतवणुकीच्या क्षेत्रामध्ये प्रथम क्रमांकावर आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जेंव्हा दहा वर्षांपूर्वी राज्याची सूत्रे हाती घेतली होती तेव्हा राज्यातील उद्योग क्षेत्रात प्रचंड नाराजी होती. लालफीतीच्या कारभारामुळे अनेक उद्योगांनी गुजरात सारख्या राज्यात स्थलांतर व विस्ताराची योजना आखली होती एका बाजूला राज्यातील सलग दुष्काळाची झळ आणि दुसऱ्या बाजूला उद्योगाची खुंटलेली वाढ यामुळे रोजगाराच्या संधी कमी निर्माण होत होत्या. देशाच्या विकासाचे इंजिन असलेल्या महाराष्ट्राची स्थिती अशी असल्याने त्याचा एकूणच सकल उत्पादन दरावर परिणाम झाला. या संकटातून राज्याला बाहेर काढण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठोस उपाययोजना आखली आणि त्यावर अंमलीजामा चढवीला. आपल्या राजकीय कौशल्या सोबतच देवेंद्र फडणवीस यांनी 'माझा महाराष्ट्र कुशल महाराष्ट्र' हा संदेश देत २०१४ पासून कौशल्य विकासावर भक्कम भर दिला. , कौशल्य विद्यापीठ, यासारख्या उपक्रमांना बळकटी देत तरुणांसाठी आधुनिक प्रशिक्षण केंद्रे राज्यात उभी केली. राज्यातील



शासकीय आय टी आय चे परिवर्तन पी पी पी व स्ट्राईव्ह मॉडेलसच्या साह्याने घडवून आणले. आय टी आय मध्ये रोबोटीक्स, ड्रोन तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, नवीन आधुनिक व्यवसाय सुरु करून प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर प्रशिक्षणातून उत्पादनाकडे विद्यार्थ्यांना कसे वळविता येईल यासाठी प्रयत्न सुरु केले. त्याच बरोबर राज्यातील आय टी आय चे रूपांतर एक प्रशिक्षण संस्थां म्हणूनच नाही तर कौशल्य उत्पादन केंद्रांमध्ये करण्यात आले. यांसारख्या आघाडीच्या उद्योगांबरोबर सामंजस्य करार () करून प्रशिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. आज ह्या संस्थामधून प्रशिक्षणार्थी म्हणून काम करणाऱ्या युवा युवतीना जागतिक दर्जाचे प्रशिक्षण मिळू लागले आहे.

नुकतेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, खात्याचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी लॉजिस्टिक उद्योगासाठी वाढवण बंदर व इतर प्रकल्पांसाठी कौशल्य प्रशिक्षण सामंजस्य करार केले.वाढवण बंदर प्रकल्पासाठी स्थानिक युवकांना प्रशिक्षण देण्यासाठी विशेष कौशल्य अभ्यासक्रम सुरू करण्यात आले. यासाठी उद्योगसंपर्कातील, भागीदारीच्या माध्यमातून कौशल्य शिबिरे आयोजित करण्यात आली. फक्त प्रशिक्षण नव्हे, तर प्रत्यक्ष रोजगार उपलब्ध करून देणे, हे या उपक्रमांचे वैशिष्ट्य ठरत आहे.

सन २०२२ नंतर देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री झाल्यावर त्यांच्या विकास कामांची आगेकूच आत्मनिर्भर महाराष्ट्रासाठी सुरूच राहली. त्यांनी कौशल्य विकासास प्रथम प्राधान्य दिले. ''मिशन महाराष्ट्र २०२५'' अंतर्गत लाखांहून अधिक युवकांना प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले. स्किल हब्स, महिला व ग्रामीण कौशल्य केंद्रे, मोबाईल ट्रेनिंग युनिट्स, डिजिटल स्किलिंग यांच्या माध्यमातून राज्यात प्रत्येक खेड्यापर्यंत ही चळवळ पोहोचविण्यातआली. महाराष्ट्रातील युवक हे देशाचे भविष्य आहेत, आणि हे भविष्य कौशल्य विकासाच्या माध्यमातून सक्षम करण्याचे श्रेय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीला जाते.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र शासनाने आय टी आय च्या क्षेत्रात नवचैतन्य आणले आहे. दोनशे पेक्षा अधिक आय टी आय मधून प्रशिक्षणार्थ्यांना पी पी पी च्या माध्यमातून जागतिक दर्जाचे प्रशिक्षण, १२०० कोटी रुपयांची आर्थिक तरतूद, दिव्यांग व उच्च गुणांकन प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांसाठी विशेष संधी हें सर्व उपक्रम एक समृद्ध, समावेशक आणि कौशल्य प्रधान महाराष्ट्र उभारणीच्या दिशेने मोलाची वाटचाल ठरत आहे. मुख्यमंत्री मा. ना. देवेंद्र फडणवीस त्यांच्या वाढदिवसानिमित्ताने हार्दिक शुभकामना.

# डोळ्यांच्या नि:शब्द संवादात...



सप्तरंग

डॉ . विनय व. दांदळे
९८२२२ ३१७६९

**नजरेत दडलेलं मौन सांगतं किती काही, शब्दांनाही उमजणारं, अनभिज्ञ व्यथाचं ठायी ठायी... डोळे मूक तरीही प्रखर भाष्य करतात, हृदयाच्या गाभ्याशी थेट संवाद साधतात...**



माणसाला देवानं वाचा दिली आणि जिव्हापण दिली सोबतीला शब्दही दिलेत, आणि विचार मांडायला मुखही दिलं. पण ह्या साऱ्या गोष्टींना मागे टाकून, कधी कधी माणसाच्या डोळ्यातूनच सगळं निः शब्दपणे बोललं जातं. कारण शब्द जरी समजून घेण्याची गोष्ट असली, तरी डोळे म्हणजे थेट आत्म्याशी बोलणारा आरसा असतो. डोळेहे शरीरातलं असं एकमात्र दार आहे, जे उघडं असूनही अंत:र्मनाच्या खोल कप्प्यांची झलक दाखवतं. कुणाच्या डोळ्यांत जरासा खोटेपणा दिसतो, तर कुणाच्या डोळ्यात पारदर्शक प्रेमाचा झरा वाहत असतो. कुणी बोलतं नसलं तरी त्यांच्या डोळ्यांमधून त्यांच्या मनाचं आर्त संगीत सतत ऐकू येत असतं.

माणूस जेव्हा खूप सुखी असतो, तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर हसू असतं, पण ते हसू कधी डोळ्यांपर्यंत पोचत नाही. पण जेव्हा दुःख आत खोलवर घर करतं, तेव्हा डोळे ओले होतात अगदी काही न बोलताही ते सगळं सांगून जातात. कारण दुःखाची भाषा ही डोळ्यांशी जास्त समरस असते. डोळे हे केवळ पाहण्यासाठी नाही, ते अनुभवण्यासाठी असतात. एका आईच्या डोळ्यांतून वाहणारा मूक अश्रू, तिच्या लेकराच्या वेदनेचा नि:शब्द साक्षीदार असतो. एका प्रेमिकेच्या डोळ्यांतून ओघळलेले मौन अश्रू, तिच्या अपूर्ण स्वप्नांचं असख्यपण मांडतो. वृद्ध पित्याच्या डोळ्यांत भरलेलं पाणी, मुलाने दिलेल्या उपेक्षेचं कडवट ताशीर सांगतं. ज्यावेळी माणसाचं मन खचतं, तेंव्हा त्याला कुणीतरी पाहिजे असतंबोलण्यासाठी नव्हे, तर फक्त जवळ बसण्यासाठी. एक हात हातात घ्यायला, एक मौन अश्रू पुसायला, आणि फक्त ''मी आहे तुझ्यासोबत'' असं सांगण्यासाठी. या वेळी शब्द गौण ठरतात, आणि डोळ्यांतील भावनाच निःशब्द बोलून जातात. सुखाच्या क्षणी माणूस गर्दीत असतो, पण दुःखाच्या क्षणी त्याला आपल्या माणसांची खरी ओळख होते. जेव्हा तो कोसळतो, तेव्हा त्याला सावरायला येणारी माणसं आयुष्यातली खरी संपत्ती असतात. दुःख हे दुःखाला ओढतं कारण वेदना ओळखण्याची शक्ती फक्त वेदनेलाच दिलेली असते.

म्हणूनच डोळ्यांची भाषा म्हणजे आत्म्याची कविताच असते. कधी कधी आपण एखाद्याकडे पाहतो आणि जाणवतं की, त्याचं मन खूप बोलू पाहतंय... पण त्याच्या ओठांनी नाही, तर त्याच्या डोळ्यांनी. डोळ्यात पाणी साचलेलं असतं. ते अश्रू केवळ पाण्याचे थेंब नसतात, त्या भावना, आठवणी, वेदना आणि मूक ओरड यांचं एक संमिश्र भावविश्व असतं. एकदा एक वृद्ध आजोबा एका बसस्टॉपवर बसलेले होते. शांत, निवांत. कोणीही त्यांच्याशी बोलत नव्हतं. पण त्यांच्या डोळ्यांत मात्र काळीज चिरणारी शांतता होती. त्या डोळ्यांत काळाची ठेव होती अपूर्ण स्वप्नं, हरवलेली माणसं, आठवणींनी भरलेली संध्याकाळ, आणि एकाकीपणाची गडद छाया. मी काही विचारलं नाही, फक्त त्यांच्या डोळ्यांत बघितलं आणि एक दीर्घ संवाद तिथेच घडून गेला.

मनाचं अंतरंग हे डोळ्यांतून व्यक्त होणारं वलय असतं . माणसाचं मन म्हणजे एक असं बंद दालन आहे, जिथं प्रकाश झिरपतो तो फक्त डोळ्यांतून. जीव्हा फसवू शकते, चेहरा खोटं हसू शकतो, पण डोळ्यांत खोटं नाटक होत नाही. जे काही आहे ते अस्सल असतं. आपण कितीही शब्द वापरले, तरी कधी कधी एखाद्या नजरेतून मिळालेली समजूत, एक हलकी स्मितरेषा, किंवा मूक अश्रूची साथहे सगळं त्या शब्दांपेक्षा खूप जास्त सांगून जातं. कारण माणसाच्या भावनांचं मुख्य ठिकाण हे त्याचं मन आणि डोळे आहेत, ओठ नव्हेत. नाती केवळ बोलण्याने जपल्या जात नाहीत तर ती एकमेकांना समजून घेण्यातून टिकतात. आणि समजणं हे ऐकण्यात नाही, तर बघण्यात, अनुभवण्यात असतं. डोळ्यांतून जेव्हा अश्रू ओघळतात, तेव्हा ते फक्त दुःखाचे नसतात. ते प्रेमाचे, आपुलकीचे, आणि कधी कधी शब्दांत न मावणाऱ्या भावना व्यक्त करणारे असतात. कधीकधी एखादा आपुलकीने भरलेला कटाक्ष, तुमच्या पाठीवर पडलेला मूक हात, आणि डोळ्यांत उमटलेली ''मी समजतो'' ही भावना, हे सगळं शब्दांशिवाय नात्यांची दुरावलेली वीण परत बांधतं. म्हणूनच जेव्हा शब्द अपुरे पडतात, तेव्हा डोळे बोलू लागतात... आणि त्या निःशब्द संवादात खरं माणूसपण उमलतं.

शब्द हरवले की नजरा सावरतात,
मनाचे भार डोळेच ओढतात...
नजरेतील मौन जरी नसे उच्चारांत,
तरी त्यातच माणूसपण उमगतात...!



कथा

प्रा. मोहन काळे
७०३८२७६५५८




भाग-२

अध्यक्षीय भाषणाआधी सत्काराला उत्तर देण्यासाठी राजेशचे नाव सूत्रसंचालनकर्त्याने पुकारले. राजेश डायसजवळ न जाता जागेवरच उभा राहिला. त्याने लांब वायर असलेला माईक हातात घेतला आणि बोलायला सुरुवात केली, ''आपल्या सर्वांच्या स्वाभिमानाचं प्रतीक असलेले छत्रपती शिवाजी महाराज, त्यांना घडवणाऱ्या राष्ट्रमाता मां जिजाऊ, सर्वसामान्यांसाठी विविध कल्याणकारी योजना राबवणारे राजर्षी शाहू महाराज, शिक्षणाची गंगा घरोघरी पोहोचवण्याचं महान कार्य करणारे महात्मा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फ ुले, शिक्षणमहर्षी पंजाबराव देशमुख व राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, कर्मयोगी गाडगेबाबा यांना वंदन करतो. व्यासपीठावरील सर्व उपस्थित मान्यवर मंडळींचे आभार व्यक्त करतो. माझा इतका मोठा भव्य स्वरूपात सत्कार आपण गावकऱ्यांनी आदरणीय सरपंचाच्या नेतृत्वात घडवून आणला त्याबद्दल मी आपला मनापासून ऋणी आहे. आपल्या छोट्याशा खेड्यातून माझ्यासारख्या एका मजुराचा मुलगा कलेक्टरच्या दर्जाचा अधिकारी बनतो व आपण सर्व मोठे लोक त्या गरीब मुलाचा सत्कार घडवून आणता यापेक्षा मोठी भाग्याची गोष्ट माझ्यासाठी दुसरी नाही. आपल्या गावातूनच नाही तर सर्वच गावांतून मोठमोठे अधिकारी झाले पाहिजे अशी माझी इच्छा आहे. आपण सर्वांनी माझे भरभरून कौतुक केले. कौतुक कुणाला आवडत नाही? परंतु आजच्या या कार्यक्रमाच्या निमित्ताने मी माझ्या मनातील काही गोष्टी आपणांसमोर बोलू इच्छितो. चार पाच दिवसांपूर्वी मी मला शुभेच्छा म्हणून अनेक लोकांनी, नातेवाईकांनी, मित्रांनी आणलेले गुलदस्ते पाहत होतो. आजही मला समोर बसलेल्या काही व्यक्तींजवळ गुलदस्ते दिसत आहेत जे ते मला कार्यक्रम संपल्यानंतर देणार आहेत. आपले माझ्याप्रती असलेले प्रेम, जिव्हाळा पाहून मी कृतकृत्य झालो आहे. परंतु नेमकी गोष्ट जी मला सांगायची आहे ती ही आहे की आपण माझ्यासाठी पैसे खर्च करून गुलदस्ते आणले, हार आणले, पेढे आणले, मला शाली चढवल्या, हे सर्व चांगलं असलं तरी मी याचा आस्वाद पूर्णांशाने घेऊ शकत नाही. कारण माझ्या मनात मागील काही वर्षांतील घटना, अनुभव व प्रसंग आठवले व मला या गुलदस्त्यांकडे पाहून पाहिजे तितका आनंद झाला नाही. त्याचे कारण असे की मी सतत चार पाच वर्षांपासून यासाठी प्रयत्न करीत होतो. सुरुवातीला मी अपयशी झालो. दुसऱ्या प्रयत्नात सुद्धा अपयशी झालो. तिसरा प्रयत्नही अयशस्वी ठरला. तेव्हा मला खरी गरज होती ती भक्कम मानसिक आधाराची. हिंमत देणाऱ्यांची. लढ म्हणणाऱ्यांची. थोडीशी आर्थिक मदतही हवी होती. पण आर्थिक मदत मला तितकीशी महत्त्वाची वाटली नाही. पण मी अपयशी होत असताना मला अनेक लोकांनी टोमणे मारले. वर्षे वाया घालवत आहे, वडिलांना कष्ट करायला लावून स्वतः अजून काहीच कमावत नाही, युपीएससीच्या मागे लागून तारुण्याची उमेदीची वर्षे फुकट घालवत आहे, ही तुझ्या बसची गोष्ट नाही, सायन्स घेऊन मस्त डॉक्टर , इंजिनिअर झाला असता, अशांसारख्या अनेक टोमण्यांनी मी दुःखी होत होतो. जवळचे, दूरचेच नाही तर कुटुंबातील व्यक्ती सुद्धा मी आयतं खातो म्हणून घालून पाडून बोलत होते. मला खांद्यावर हात ठेवून विश्वास देणं तर दूरच राहिलं. मला प्रोत्साहन देण्याऐवजी निरुत्साही करण्यात आलं. माझ्या पाठीशी खंबीरपणे फक्त माझे गरीब आईवडील व माझा रोहित काळे नावाचा मित्र व मला मार्गदर्शन करणारे, प्रेरणा देणारे, धैर्य, सहनशीलता शिकविणारे पाटील सर व जोशी सर होते. त्यांच्यामुळेच मी ही लढाई जिंकू शकलो. मनात पक्का विश्वास असूनही आपण कधी कधी वैफल्यग्रस्त होऊ शकतो, सर्व प्रयत्न सोडून द्यावे असे वाटतात, लोकांचे टोमणे सहन होत नाहीत, कधी पैसे नसतात, कधी मनात एकटेपणाची भावना निर्माण होते, कधी तर आपण कोसळून पडतो व अशा मानसिक व भावनिक अस्वस्थतेत आत्महत्येसारखं घातक पाऊल पण उचलल्या जाऊ शकते. अशावेळी कुणीतरी चौकशी करणारं, धीर देणारं, प्रोत्साहन देणारं, अपयश आल्यावर सुरुवातीला अपयश मोठमोठ्या लोकांना अपयश आलेलं आहे. पण प्रयत्न सोडू नये. एक दिवस यश हमखास मिळतेच असा विश्वास देणारं, पाठीवर हात ठेवणारं कुणीतरी भेटलं किंवा मोबाइलवर किंवा प्रत्यक्ष भेटून संवाद साधला तर आपल्या मनातली निराशा, वैफल्य, एकाकीपणा निघून जातो व अधिक प्रयत्न करण्यासाठी नवी ऊर्जा मिळते. अधिक जोमाने माणूस यशाकडे नेणाऱ्या मार्गाला लागतो. ही ऊर्जा त्याला थकू देत नाही, निराश होऊ देत नाही, मनात नकारात्मक विचार आणू देत नाही. प्रयत्नांती परमेश्वर, वाळूचे कण रगडिता तेलही गळे अशा म्हणी फक्त कागदावर नको तर त्या प्रेरणा, प्रोत्साहन व धीर देण्यासाठी वापरण्याची गरज आहे. यशस्वी माणसाचं कौतुक कुणीही करतं. यशस्वी झाल्यानंतर माणसाला कौतुकाची जास्त गरज उरत नाही. यशाचे वाटेकरी सर्व होऊ इच्छितात पण अपयशाचा सोबती कुणीच नसतो. एक गोष्ट लक्षात ठेवा की सुरुवातीला अपयश आलेल्यांनीच इतिहास घडवलेला आहे. आपला कुणी गरीब, गरजू कुटुंबातील व्यक्ती असेल,नातेवाईक असेल, मित्र असेल, ओळखीचा असेल त्याला अपयशाच्या वेळी, अडचणीच्या वेळी, पक्के उभे राहण्याची हिंमत देण्याचे कार्य करा. त्यामुळे अपयशी म्हणून शिक्का बसलेले, ते दहावीतील असो, बारावीतील असो, प्रवेश परीक्षा किंवा स्पर्धा परीक्षा असो किंवा जीवनातील कोणतीही परीक्षा असो तुम्ही त्या व्यक्तीच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहा. तुम्ही त्याच्यासोबत आहात ही त्याला जाणीव करून द्या अशी माझी आपल्याला हात जोडून विनंती आहे. एकदा का त्याला जाणवले की तो एकटा नाही तेव्हा त्याच्या मनात आत्मघात करणारे विचार येणार नाहीत व त्याच्यामध्ये सकारात्मक गुणांचा परिपोष होईल व चांगला समाज घडविण्यासाठी त्याचे योगदान निश्चितच उल्लेखनीय राहील.'' राजेशचे भाषण संपल्यानंतर जवळपास पंधरा ते वीस मिनिटे टाळ्यांचा कडकडाट सुरू होता. **(समाप्त)**

# मेडिमिक्स आयुर्वेदिकची अमृता खानविलकर सोबत काम करण्यास सुरुवात



**मुंबई:** मेडिमिक्स भारतातील एक अग्रगण्य आयुर्वेदिक पर्सनल केअर ब्रँड असून आपला मुख्य भौगोलिक क्षेत्रांमधील प्रादेशिक नाते बळकट करण्यासाठी आपली खेळी बदलताना अमृता खानविलकर आपली नवीन ब्रँड ऍम्बेसेडर असेल, असे अभिमानाने जाहीर करत आहे.मेडिमिक्स बऱ्याच काळापासून त्याच्या आयुर्वेदिक परंपरेत रुजलेल्या प्रभावी, औषधी वनस्पतींवर आधारित उत्पादनांशी समर्पक आहे. ब्रँडच्या केंद्रस्थानी त्याच्या १८ औषधी वनस्पतींच्या शक्तीचे सत्त्व आहे. हे सामग्रीचे एक अद्वितीय मिश्रण आहे जे वेळोवेळी परिपूर्ण केले गेले आहे आणि कौटुंबिक रहस्य म्हणून पिढ्यानपिढ्या पुढे सांगितले गेले आहे. प्रत्येक मेडिमिक्स साबणाचा मूलाधार तयार करते. मेडिमिक्सने तरल पदार्थांमध्ये पोर्टफोलिओमध्ये अधिक भर घातली असून बॉडीवॉश, हँडवॉश आणि फेसवॉश श्रेणींमध्ये प्रवेश करताना आपल्या उत्पादन पोर्टफोलिओचा विस्तार करत आहे. असे करून मुख्य भौगोलिक क्षेत्रांमधील ब्रँडचा शिरकाव आणखी वाढवित आहे.मेडिमिक्स आणि अमृता हे दोघे स्वस्थ त्वचेसाठी नैसर्गिक सौंदर्य, सांस्कृतिक नाते आणि आयुर्वेदाचे गुण, म्हणजे संपूर्ण मेडिमिक्स पोर्टफोलिओ श्रेणीसाठी स्किनफिटला आधार देण्याकरिता एकत्र आले आहेत आणि म्हणून या दोघांसाठी हा सहयोग एक महत्त्वाचा टप्पा आहे.अनुपम कठेरिया, चीफ ऑपरेटिंग ऑफिसर, चोल्याइल प्रायव्हेट लिमिटेड, हे उत्पादन, ठिकाण आणि प्रसार धोरणे नव्याने परिभाषित करताना वाढीसाठी निश्चित केलेल्या नवीन क्षितिजाबद्दल बोलले. चोल्याइल येथे ग्राहकांच्या अपेक्षांना पार करणारी दर्जेदार उत्पादने प्रदान करण्याची आमची बांधिलकी आमच्या सुसंगत वाढीतून दर्शविली गेली आहे आणि घरगुती पॅनल डेटामध्ये दिसून आल्यानुसार घरगुती वापरात वाढीमुळे आणि खपचे प्रमाण वाढण्यामुळे यास चालना मिळाली आहे. आमच्या मुख्य बाजारपेठा आणि ब्रँड्स बळकट करण्याच्या धोरणास अनुसरून आम्ही अतिस्थानिक अभियान सुरु करत आहोत जेणेकरून हँडवॉश, बॉडीवॉश आणि फेसवॉश या तरल पदार्थांच्या श्रेणीत खोलवर लक्ष घालता येईल. हे उपक्रम आयुर्वेदाच्या शक्तीच्या माध्यमातून आपणास स्किनफिट बनवण्याची आपली बांधिलकी प्रबळ करत आहेत.

# संजीव कुमार माझा ऑटोग्राफ घ्यायला घरी आले होते - सचिन पिळगावकर




ज्येष्ठ अभिनेते सचिन पिळगांवकर यांनी मराठीसह हिंदी चित्रपटांमध्ये आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला आहे. त्यांनी हिंदी सिनेसृष्टीतील अनेक दिग्गजांबरोबर काम केलं आहे. बरेचदा सचिन पिळगांवकर काही कलाकारांबरोबरच्या त्यांच्या जुन्या आठवणी सांगत असतात. आता त्यांनी संजीव कुमार यांच्याबरोबरचा एक किस्सा सांगितला आहे.

सचिन पिळगांवकर यांचा पहिला ऑटोग्राफ एका दिग्गज अभिनेत्याने घेतला होता, ते म्हणजे संजीव कुमार. ''माझा पहिला ऑटोग्राफ एका माणसाने घेतला होता, ते मी कधीच विसरू शकत नाही. विशू राजे हे माझ्या वडिलांचे मित्र होते. त्यांना 'हा माझा मार्ग एकला' हा चित्रपट हिंदीमध्ये करायचा होता. तेव्हा मी १४-१५ वर्षांचा असेन. त्यांना तो चित्रपट हरीभाईंबरोबर म्हणजेच संजीव कुमार यांच्याबरोबर बनवायचा होता. त्यासाठी त्यांना एक ट्रायल ठेवली होती,'' असं सचिन पिळगांवकर यांनी रेडिओ सिटीला दिलेल्या मुलाखतीत सांगितलं.

पुढे ते म्हणाले, ''हरीभाईंनी ट्रायलमध्ये पूर्ण सिनेमा पाहिला. सिनेमा पाहून बाहेर आले. सायंकाळचे सात वाजले होते. त्यांनी विशूराजेला विचारलं सचिन कुठे राहतो माहीत आहे का? ते म्हणाले 'मला माहिती आहे'. मग ते म्हणाले, 'मला घेऊन जाता का त्याच्याकडे' ते लगेच म्हणाले, 'हो चला.' ते गाडीत बसले. जाताना सांताक्रुझमध्ये एका स्टेशनरी शॉपजवळ हरीभाईंनी गाडी थांबवली. एक ऑटोग्राफ बुक घेतलं. एक पेन विकत घेतला आणि ते घरी आले.

दार वाजवलं, वडिलांनी दरवाजा उघडला तर समोर संजीव कुमार उभे होते. ते म्हणाले, 'हरीभाई आतमध्ये या'. त्यांनी विचारलं 'सचिन आहे का? बोलवा त्याला'. ते हॉलमध्ये बसले. मी आलो त्यांनी सांगितलं 'मी आताच हा माझा मार्ग एकला चित्रपट पाहून आलोय. मी आयुष्यात कोणाचा ऑटोग्राफ घेतला नाही.

## आपणच तयार करा हे महाशब्दकोडे 108

### हे कोडे कसे सोडवाल

संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दव योग्यप्रकारे या चौकटीत लिहून हे महाशब्दकोडे आपणच तयार करा. मदतीकरिता काही शब्द चौकटीत दिलेले आहे.

**संकेत शब्द:—**

**दोन अक्षरी**
कल, कढी, कोप, खाणे, घडा, चीन, जर, टर, दगा, दल, दैना, दुम, धन, धंदा, धूप, नस, नफा, नौका, पक्ष, पित्त, फुगा, बर, मोर, रण, रव, रस, रमी, वज, वाडा

**तीन अक्षरी**
कनात, कलम, कळशी, गमन, गरभा, जतन, डवरा, तराफा, नवस, पखाल, भिकारी, रसम, लकडा, लकब, वारसा, सनई, संगम

**चार अक्षरी**
आरक्षण, आभूषण, कटकट, दणकट, मलमल, राजवाडा, रुजुवात, लालसर, सवलत, समतोल, सांजवात, संधीसाधू, हावभाव

**पाच अक्षरी**
जनानखाना, डाकबंगला, तरुणपिढी, पदरमोड, परसदार, बावनकशी, भिरकावणे, रतनबाव, विनाकारण, संग्रहालय

**सहा अक्षरी**
दुर्मीळ संधी, मरू जल भुमी, यम यातना

**अन्य अक्षरी**
कर्म धर्म संयोग, दगडावरची रेघ

### मागील महाशब्दकोडेचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आ | र्ज | व | | आ | | प | त्रि | का | | गा | ल | गुं | ड |
| त्म | | सु | वि | ख्या | त | | वा | य | फ | ळ | | ता | |
| वि | मा | | | यि | | शा | र | दा | | णी | | गुं | जा |
| श्वा | स | न | लि | का | | दू | | | | | सा | त | |
| स | | त | प | | ब | ल | वा | न | | ता | क | | क |
| | क | | स्टि | | क | वि | | | क | बा | ड | | ला |
| आ | रा | | क | सा | | क्री | डां | ग | ण | | | प | ट |
| प | र | शु | | व | | डी | | ळ | | फ | वा | र | णी |
| | ना | | अं | ध | | त | न | | सा | ळ | | म | |
| अ | मा | न्य | | गि | नी | | | दा | न | | वि | पु | ल |
| भ | | | श | री | र | सं | प | दा | | | | रु | |
| य | | त | र | | | ख्या | ति | | दा | | वि | ष | य |
| | अ | नु | सं | धा | न | | त | | ह | व्या | स | | म |
| स्व | स्थ | | धा | ड | स | | पा | ल | | ज | र्ज | र | |
| | मा | प | न | | | आ | व | त | न | | न | वा | ड |

Uday Munde - 8446302691

## महाशब्दकोडे 489

**—: आडवी विधाने :—**

1) ज्याला कुणीच शत्रु नाही असा
3) उत्सवाकरिता आणून ठेवलेली मूर्ती, समारोहातील मुख्य व्यक्ति
5) इशाऱ्याचे
7) हरीण
8) चक्रवर्ती राजाचे सम्राटपद
12) एखाद्याला अनुकूल करण्याचे चार उपाय
16) खडसून बोलणे
18) विश्व
19) राखण करणारा
21) वाळू
22) लांबट सूर
23) एक द्विदल धान्य
24) शोध, मागोवा
25) अतिशय उत्सुकता
27) 24 तसूंचे परिमाण,या लांबीची काठी
28) गरिबांचा फ्रीज
29) प्रजा, जनता
31) शिजविणे
35) दिवसा झोप काढून रात्री भटकणारा एक पक्षी
36) कठीण प्रसंगी धीराने राहणारा
38) लहान लहान बालकांना दिवसभर सांभाळण्याचे ठिकाण
40) चिखलात उमलणारे फुल
41) सांत्वन
43) किंचित गरम
44) खूप जास्त
45) चलाख
46) दानी
47) फसवणूक
49) लाक्षणिक अर्थाने सूर्यचंद्राचे पूर्ण ग्रहण
50) वाणी, बोलणे
51) भेग, फट
52) वियोगजन्य दुःख
53) वनात उत्पन्न झालेले
54) मौज, गंमत
56) सिंह
57) याला धर त्याला पकड अशी धामधूम
59) निर्जीव वस्तू स्वयंप्रेरणेने चलनवलन करतात असे भासविण्याची युक्ती
61) उपासना करणारा
62) ताठा, गुर्मी
65) स्मरण, आठवण
67) काळया पाठीचा हरीण
69) समान, सारखे
70) एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे
71) मोडके तोडके घर, अतिशय दारिद्र्य
72) आयात होणाऱ्या मालावरील कर

**—: उभी विधाने :—**

1) मोठा आव आणून मात्र वेळ आली की हात पाय गाळणारा
2) लाज,लज्जा (हिं.)
3) गरम
4) ओशाळणे, लाजणे
5) जोड, एकत्र संबंध मेळ
6) शरीरातील त्रिदोषांपैकी एक
7) तबला, पखवाज
9) मंगळवारचे जुने प्रचलीत नाव
10) फेटा, निशाण
11) किंमत
12) प्रामाणिक व पतदार मनुष्य
13) टप्पा, एका दमात केलेला प्रवास
14) तिरळ्या नजरेचा
15) सावध
17) बंदुकीतील गोळी
20) स्नान संध्याशील, धर्मिष्ठ
23) मला
26) धांदल, धावपळ
27) गणपती, गणनायक
30) केव्हाही तयार असणे
32) डोके नसलेले शरीर
33) आपल्याजवळील अतिरिक्त जमिनीचे दान करा असे आचार्य विनोबा भावेंनी केलेले आव्हान
34) एखादी गोष्ट सहजरीत्या पार पडणे
35) कळसाखाली असलेली डेऱ्याच्या आकाराची बंदिस्त जागा
37) इटली देशाची राजधानी
39) लाकडाची उंच बैठक
40) कमी (हिं)
41) स्वीकार करणारा
42) बाणांचा पिंजरा
43) कोपऱ्याचा घडीव दगड
44) ग्रामीण बोलीभाषेत अक्षयतृतीया
46) न्यायालयात दाखल केलेली तक्रार
48) एक मादक द्रव्य प्रकार
52) रसभंग, मनोभंग
55) गुप्तहेर
57) पाठीत मारलेला रट्टा
58) सिंहाची गर्जना
59) शिखर, पराकाष्ठा
60) तिसरी व्यक्ती
63) आर्जव
64) प्रहार, एक प्रकारचे आवेशयुक्त गाणे
66) शिजविलेले तांदुळ
68) सौदामिनी

(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| गे | ट | वे | ऑ | फ | इं | डि | या | | प्रा | | प | क्ष | पा | त | |
| स्ट | | ध | | ला | | | च | | यो | | द | | | वा | णी |
| हा | | शा | का | हा | री | | क | ल | प | | र | स | ना | | |
| ऊ | मा | ळा | | र | त | न | | | वे | ळा | प | त्र | क | | ख |
| स | ह | | अ | | स | र | फ | रो | श | | स | | दु | र्वा | स |
| | वा | | वि | चा | र | क | | | न | | र | डा | र | | |
| ग | र | | र | वा | | पा | दु | का | | उ | णे | | ई | शा | न्य |
| नि | | पा | त | | सु | ल | भ | | कि | | | को | | स | |
| मी | ल | न | | अ | | | ती | ळ | मा | त्र | | प | थ | क | र |
| का | य | दा | | वै | न | गं | गा | | न | य | न | | | | मा |
| वा | | न | | द्य | | गा | य | क | | स्थ | ल | च | र | | |
| | मु | | | | म | | | पा | र्थ | | गे | य | | पं | चा |
| का | र्ति | क | | क | र्द | न | का | ळ | | मो | | न | रा | ध | म |
| | मं | डू | क | | न | | ना | मो | ह | र | म | | ख | र | |
| आ | त | | बं | का | | म | | क्ष | मा | या | च | ना | | व | र्षा |
| इ | | सा | ध | क | बा | ध | क | | ल | | | द | रो | डा | |

Uday Munde - 8446302691

## राशी-भविष्य

**मेष :** आज तुमच्यासाठी आनंदी आणि अद्भुत दिवस आहे. आरोग्य आणि प्रतिष्ठेची काळजी घ्या. हुशारीने काम करा आणि संभाषणाद्वारे समस्या सोडवा.

**वृषभ:** आज नशीब तुमच्या सोबत आहे. तुम्हाला कुटुंबाकडून पूर्ण पाठिंबा मिळेल. पालकांचे आरोग्य चिंतेचे कारण असू शकते.

**मिथून :** आज तुम्हाला कठोर परिश्रम करण्याची आवश्यकता आहे. प्रेमासाठी वेळ उत्तम आहे. आज तुम्हाला अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या आजारापासून आराम मिळेल.

**कर्क :** आज तुमचे कुटुंबातील सदस्य तुमच्यावर आनंदी असतील आणि घरात शांतता असेल. स्वतःवर नियंत्रण ठेवा. जास्त रागावू नका अन्यथा काम बिघडू शकते.

**सिंह :** आज दीर्घकाळापासून सुरू असलेल्या समस्या संपतील. तुम्हाला वरिष्ठ अधिकाऱ्याचा पाठिंबा मिळेल. घरी शुभ कार्य होण्याची शक्यता आहे.

**कन्या :** आज तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका. आज तुमच्या जोडीदाराला तुमचा मौल्यवान वेळ द्या, तुमच्या जोडीदाराला तुमची गरज आहे.

**तुळ :** आजचा दिवस तुमच्यासाठी गुंतवणूक करण्यासाठी चांगला ठरू शकतो. काही तणाव आणि मतभेद तुम्हाला चिडचिडे आणि अस्वस्थ करू शकतात.

**वृश्चिक :** आज तुम्हाला खूप धावपळ करावी लागेल आणि दिवसभर व्यस्त राहावे लागेल. तुम्ही मंदिरात जाण्याची किंवा धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्याची योजना आखू शकता.

**धनु :** व्यवसायाच्या दृष्टीने आज तुमच्यासाठी एक उत्तम दिवस आहे. जोपर्यंत तुम्ही ते पूर्ण करण्यास पूर्णपणे सक्षम नसाल तोपर्यंत कोणतेही वचन देऊ नका.

**मकर :** आज तुमचा दिवस आरोग्याच्या बाबतीत सामान्य राहील. सरकारी अधिकाऱ्यांशी तुमचा संपर्क होईल. कोणावरही आंधळेपणाने विश्वास ठेवू नका.

**कुंभ :** आज तुम्ही तुमच्या करिअरबाबत मोठा निर्णय घेऊ शकता. कोणताही निर्णय घेण्यापूर्वी थंड मनाने विचार करा. तुम्हाला इकडे तिकडे धावण्याचा फायदा होईल.

**मीन:** आज तुम्हाला एकटे वाटू शकते, हे टाळण्यासाठी कुठेतरी बाहेर जा आणि मित्रांसोबत थोडा वेळ घालवा.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

## थोडक्यात

### साहेब! मानधन मिळणार तरी कधी?

**मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थ्यांचा संतप्त सवाल; उपासमारीची वेळ**

**पारशिवनी** : मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेला पाच महिने उलटूनही यात सहभागी बेरोजगार तरुणांना अद्याप मानधन मिळालेले नाही. निवडणुकीपूर्वी तरुणांसाठी सुरू केलेली ही योजना फेब्रुवारीनंतर थांबली असून १५ दिवसांचे मानधन अद्याप शिल्लक आहे. वाढीव मुदतीवर काम करणाऱ्या तरुणांना एप्रिलपासूनही मानधन मिळालेले नाही. या विरोधात तरुणांनी राज्यस्तरावर निवेदन देऊन लवकरच ठिय्या आंदोलनाचा इशारा दिला आहे. शासनाच्या या योजनेत बारावी उत्तीर्ण युवकांना ६ हजार, आयटीआय व पदविकाधारकांना ८ हजार, तर पदवीधर व पदव्युत्तरांना १० हजार रुपये दरमहा देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र शासनाकडून निधी मिळत नसल्याने युवक त्रस्त झाले आहेत. ''दिवसेंदिवस सरकारी काम करत असलो तरी मानधन मिळत नाही. प्रवास, मोबाईल रिचार्ज स्वतःच्या पैशातून करत आहोत. आता सहनशक्ती संपत आली आहे,'' अशी वेदना एका प्रशिक्षणार्थ्याने व्यक्त केली.महिला प्रशिक्षणार्थ्यांचीही अवस्था गंभीर आहे. घरगुती जबाबदाऱ्या आणि कामाचा भार सांभाळताना पगार मिळत नसल्याने मानसिक तणाव वाढला आहे. ''लहान मूल घरी आहे, तरीही रोज कामावर हजेरी लावते. पाच महिने झाले, एक रुपयाही मिळालेला नाही,'' असे एका महिला प्रशिक्षणार्थीचे सांगणे आहे. दरम्यान, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या योजनेतील व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. ''हे संपूर्ण कार्यच बोगस असल्याचे दिसते. कागदोपत्री योजना दाखवली जात असली तरी प्रत्यक्षात कामाचे ठोस स्वरूप नाही,'' असा आरोपही पुढे आला आहे. युवकांचे म्हणणे आहे की, शासनाने तातडीने थकित मानधन द्यावे, अन्यथा राज्यभर ठिय्या आंदोलन केले जाईल.

### पीक विमा योजनेत शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे: जिल्हाधिकारी

**अकोला** : जिल्ह्यात सुधारित प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप हंगाम २०२५-२६ मध्ये राबविण्यात येत असून, दि. ३१ जुलैपूर्वी जिल्ह्यातील अधिकाधिक शेतकरी बांधवांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी केले आहे. ही योजना खरीप व रब्बी २०२५-२६ हंगामाकरिता अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी विमा क्षेत्र घटक धरून राबविण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. त्यानुसार कृषि विमा कंपनीची अंमलबजावणी यंत्रणा म्हणून १ वर्षासाठी निवड करण्यात आली आहे. सदर योजना अधिसूचित पिकांसाठी केवळ अधिसूचित क्षेत्रासाठी लागू असेल, सदर योजना कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतक-यांना ऐच्छिक आहे. अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकासाठी खातेदारांचे वैयक्तिक कुळाने अगर भाडेपट्टीने शेती करणारे शेतकरी या योजनेत भाग घेण्यास पात्र आहेत. मात्र भाडेपट्टीने शेती करणा-यास नोंदणीकृत भाडेकरार पिक विमा संकेत स्थळावर अपलोड करणे बंधनकारक आहे. या योजनेंतर्गत शेतकऱ्यांनी भरावयाचा विमा हप्ता हा खरीप हंगामासाठी २ टक्के, रब्बी हंगामासाठी १.५० टक्के व नगदी पिकासाठी ५ टक्के असा मर्यादित ठेवण्यात आला आहे. या योजनेंतर्गत खरीप २०२५ व रब्बी २०२५-२६ हंगामाकरिता १ वर्षासाठी सर्व अधिसूचित पिकांसाठी जोखीम स्तर ७० टक्के असा निश्चित करण्यात आला आहे.

### गरजूंना उपचार व मदतीसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी

**अकोला** : मुख्यमंत्री सहायता निधीतून गरजूंना वैद्यकीय मदतीसाठी ३० लक्ष रू. हून अधिक रकमेतून विविध रूग्णांना उपचार मिळवून देण्यात आले आहेत. ही योजना गरीब व गरजू रूग्णांसाठी महत्वाचा आधार ठरली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून व रामेश्वर नाईक यांच्या मार्गदर्शनात प्रत्येक जिल्ह्यात मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष स्थापन करण्यात आला आहे. अकोला येथे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नूतन इमारतीत पहिल्या मजल्यावर हे कार्यालय सुरू आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री आकाश फुंडकर यांच्या हस्ते या कार्यालयाचा शुभारंभ झाला. जिल्हाधिकारी अजित कुंभार, निवासी उपजिल्हाधिकारी विजय पाटील यांच्या मार्गदर्शनात कक्षातर्फे गुणवत्तापूर्ण कार्यवाही होत आहे. जिल्ह्यातील गरजू रूग्णांसाठी मुख्यमंत्री सहायता कक्ष आधार ठरत आहे. धर्मादाय आयुक्त कार्यालयाअंतर्गत मुख्यमंत्री सहायता निधीसाठी रक्तपेढीसह प्रमाणित रूग्णालये १२ आहेत. इतर प्रमाणित रूग्णालयांची संख्या ४४ आहे. जिल्ह्यात वैद्यकीय मदतीचे ३७ हून अधिक प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहेत. महाराष्ट्रातील गरजू व पात्र रूग्णांना वैद्यकीय उपचाराकरिता आर्थिक मदतीचा हातभार लावण्याकरिता राज्याच्या मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने सुरू केलेला हा लोकोपयोगी व महत्वाकांक्षी उपक्रम आहे. कक्षातर्फे उपचार मदतीबरोबरच कक्षातर्फे रक्तदान शिबिरांद्वारे रक्तपिशव्यांचे संकलन, आपत्ती व्यवस्थापनासाठी मॉक ड्रिल, लाभार्थ्यांमध्ये वृक्षारोपणाबाबत प्रबोधन असे अनेक उपक्रम राबविण्यात येत आहेत, अशी माहिती डॉ. विशाल येदवर यांनी दिली. या उपक्रमाचा लाभ घेण्याकरिता अर्जदारांना महाराष्ट्राचा रहिवासी असावा लागतो. अर्जदाराचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न १.६० लाखांच्या आत व शिधापत्रिका कार्ड आणि आधारपत्र असणे आवश्यक आहे. उपचार घेत असलेले रूग्णालय महाराष्ट्र राज्यामधील असणे आवश्यक असून रूग्णालयाची नोंद मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीच्या प्रणालीमध्ये असणे आवश्यक असते. विविध आजारांवरील उपचारांसाठी मदत मिळते. कॉकलियर ईम्प्लांट (वय ३ वर्षापर्यंत), हृदय, यकृत,किडनी, फुफ्फुस, बोन मॅरो आणि हाताचे प्रत्यारोपण, कर्करोग, रस्ते अपघात, लहान बालकांची शस्त्रक्रिया, मेंदुरोग, हृदयरोग आणि हिप रिप्लेसमेंट सर्जरी यासह डायलिसिस, केमोथेरेपी, रेडिएशन, नवजात शिशुंचे आजार, गुडघ्याचे प्रत्यारोपण, भाजलेले रूग्ण, अस्थीबंधन आणि विद्युत अपघात यांचा समावेश होतो. या वैद्यकीय कक्षाकडून अर्थसहाय्य प्राप्त करण्याकरिता विहित नमुन्यातील अर्ज, वैद्यकीय खर्चाचे अंदाजपत्रकाची मूळप्रत, डॉक्टरांच्या सहि व शिक्यासह खाजगी रुग्णालय असल्यास जिल्हा शल्यचिकित्सक यांचेकडुन प्रमाणीत करणे आवश्यक आहे.

# चिखली काँग्रेसकडून जनसुरक्षा कायद्याची होळी

## जनसुरक्षा कायदा हा लोकशाहीच्या विरोधात जाणारा काळा कायदा – राहुल बोंद्रे

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**चिखली, दि. २१** : महाराष्ट्र शासनाने नुकताच पारित केलेला जनसुरक्षा कायदा हा राज्यघटनेने नागरिकांना दिलेल्या मूलभूत अधिकारांचा संकोच करणारा असून, तो थेट लोकशाही मूल्यांना छेद देणारा आहे. या कायद्यातील काही तरतुदी या हुकूमशाही पद्धतीची आठवण करून देतात. जनसुरक्षा कायदा म्हणजे लोकशाहीच्या विरोधात जाणारा काळा कायदा आहे, अशा तीव्र शब्दात निषेध जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष तथा माजी आमदार राहुल बोंद्रे यांनी व्यक्त केला.

चिखली तालुका व शहर काँग्रेसच्या वतीने चिखली येथे २१ जुलै रोजी लोकशाहीचा गळा घोटणाऱ्या जनसुरक्षा कायद्याविरोधात व कायदा पारित करणाऱ्या राज्य सरकारच्या निषेधार्थ जनसुरक्षा कायद्याची होळी करण्यात आली. यावेळी राहुल बोंद्रे बोलत होते. याप्रसंगी बुलढाणा जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राहुल बोंद्रे, तालुका काँग्रेसचे अध्यक्ष रामभाऊ जाधव, शहर अध्यक्ष राहुल सवडतकर, माजी अतरोधीन काजी, दीपक देशमाने, डॉक्टर मोहम्मद इसरार, कुणाल बोंद्रे, प्राध्यापक निलेश गावंडे सर, प्राध्यापक राजु गवई सर, सभापती डॉक्टर संतोष वानखेडे, युवक कॉंग्रेस अध्यक्ष रिक्की काकडे, श्याम पठाडे, डॉक्टर सत्येंद्र भुसारी, अशोकराव पडघान, किशोर कदम, ज्ञानेश्वर सुरूशे, नगरसेवक राजु रज्जाक, विजय गाडेकर, विलास कंटुले, गोपाल देव्हडे, गोकुळ शिंगणे, बिदुसिंग इंगळे, जय बोंद्रे, शिवराज पाटील, विजय जागृत, डॉ. अमोल लहाने, कैलास खराडे, प्रदिप पचेरवाल, अमिनखॉ उमस्मानखॉ, दिपक थोरात, खलील बागवान, शहीजाद अली खान, डॉ. संजय घुगे, अॅड विलास नन्हई, सचिन शेटे, शेख बबलु, रामेश्वर भुसारी, समद हाजी, प्रमोद रत्नपारखी, रोहण पाटील, विकास लहाने, रामधन मोरे, दत्ता करवंदे, समाधान गिते, नजिर कुरेशी, मनोज जाधव, प्रकाश चव्हाण, कैलास कांडेलकर, गजानन वांजोळ, बाशिद जमदार, भास्कर चांदोरे, शकील भाई, संजय गिरी, शिवा म्हस्के, संजय महाले, आरिफ बागवान, जाकीर शेख, हादी शेख, सादीक जमदार,अकील खान, हाबीब भाई, सोहील शेख, रवि लोखंडे, नितीन वाघ, शेषराव साळवे, प्रदिप साळवे,शेख अजिम, दिनकर जाधव, मनोहर हिवाळे, प्रदिप शेजोळ, भास्कर अण्णा धमक, नंदु आंभोरे, शेषराव आंभोरे, अंबादास वाघमारे, भारत मुलचंदानी, बिबीशन राठोड, गुलाब आंभोरे, परशराम राठोड, सुभाष खरात, कुंदन यंगड, कैलास गायकवाड, दत्तात्रय येवले, सदुनाना ठेंग, विष्णु पाटील, भिमराव हिवरकर, बळीराम इंगळे, नागेश आंभोरे, विष्णु सोळंकी, संजुनाना सोळंकी, समाधान आकाळ, शुभम बुरकुल, लक्ष्मण भिसे, बाळु ढंगारी, प्रथमेश वानखेडे, संदेश वानखेडे, प्रेम वानखेडे, सागर साळवे, व्यंकटेश रिंढे, एन.टी.भुसारी, ज्ञानेश्वर गांवडे, विष्णु गि-हे, राजीक कुरेशी, संतोष ठेंग, राहुल चवरे, अजिम खान, आशिष थोरात, दत्तात्र साळवे, इरियास शेख, समिर शेख, संजय गुंजकर, भारत गायकवाड, यांच्यासह असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.




### सरकारला सामाजिक आंदोलने चिघळून टाकायची आहेत– राहुल बोंद्रे

विधिमंडळात जनसुरक्षा विधेयकावर राज्य सरकारने चर्चा होऊ दिली नाही. विरोधकांची संधी नाकारुन फक्त राक्षसी बहुमताच्या बळावर जनसुरक्षा कायदा पारित करण्यात आला आहे. या कायद्यानुसार सरकार म्हणेल ते बेकायदेशीर कृत्य असेल. लोकशाहीच्या रक्षणासाठी वेगवेगळ्या क्षेत्रात आंदोलन होतात, त्यासाठी सामाजिक कार्यकर्ते पुढाकार घेतात. पण, सरकारला सामाजिक आंदोलने चिघळून टाकायची आहेत. त्यांना देशविरोधी कृत्य ठरवून ते तुरुंगात टाकू शकतात. त्यामुळे या कायद्याची होळी करुन काँग्रेसच्या वतीने निषेध करण्यात आल्याचे जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राहुल भाऊ बोंद्रे यांनी सांगितले.

## बार्शीटाकळीचे तलाठी राजीक पांडे यांच्यावर २५ हजारांचा दंड; तहसीलदारांना चौकशीचे आदेश

### माहिती अधिकाराच्या उल्लंघनावर मोठी कारवाई

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २१** : माहितीच्या अधिकाराचा भंग केल्याप्रकरणी राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठाने बार्शीटाकळी येथील तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तलाठी राजिक पांडे यांच्यावर २५ हजाराचा दंड ठोठावला असून, तहसीलदार बार्शीटाकळी यांना खातेनिहाय चौकशीचे आदेश दिले आहेत. हा निर्णय सामान्य नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करणारा ठरला असून, माहिती अधिकार कायद्याच्या अंमलबजावणीतील एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे.

बार्शीटाकळी येथील सर्वे नंबर २९१ संदर्भातील माहिती मिळवण्यासाठी अर्जदाराने माहितीचा अधिकार कायद्यानुसार अर्ज सादर केला होता. मात्र, तत्कालीन जन माहिती अधिकारी तलाठी राजिक पांडे यांनी ''अर्ज प्राप्त झालेला नाही'' असे कारण दर्शवून माहिती नाकारली. विशेष म्हणजे, प्रथम अपील अधिकारी तथा मंडळ अधिकारी राऊत यांनीही या भूमिकेला सहमती देत अर्ज फेटाळला होता.

१४ जुलै २०२५ रोजी राज्य माहिती आयोग अमरावती खंडपीठात सुनावणी पार पडली. यावेळी तलाठी राजिक पांडे, मंडळ अधिकारी राऊत आणि विद्यमान तहसीलदार यांनी ''प्रक्रिया नियमाप्रमाणे पार पडली'' असा दावा केला. मात्र अर्जदार नरेंद्र पोटेकर यांनी पुराव्यांसह सदर माहितीची नकारात्मक कारवाई माहिती अधिकार कायद्याच्या विरोधात असल्याचे प्रभावीपणे मांडले.

आयुक्तांनी अर्जदाराचे म्हणणे ग्राह्य धरत, तत्कालीन जन माहिती अधिकारी राजिक पांडे यांच्यावर २५हजार दंडात्मक कारवाई जाहीर केली.तसेच तहसीलदार बार्शीटाकळी यांना संबंधित प्रकरणात खातेनिहाय चौकशीचे आदेश दिले.

### अर्जदाराची प्रतिक्रिया

या निर्णयावर प्रतिक्रिया देताना नरेंद्र पोटेकर म्हणाले, ''हा निकाल सामान्य नागरिकांसाठी मार्गदर्शक ठरेल. माहिती अधिकार हे केवळ कागदोपत्री नसून, लोकशाहीचा खरा श्वास आहे, हे न्यायालयाने दाखवून दिले आहे.

## आंदोलन: तहसील कार्यालयात केला 'कोंबड्यांचा नवस'

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**मंगरुळपीर, दि. २१** : तालुक्यातील तहसील कार्यालयातील पुरवठा विभाग स्वस्त धान्य पुरवठा करणाऱ्या वाहनांचे कागदपत्रांची पूर्तता न करता कीत्येक वर्षापासून नियमबाह्य वाहने चालवत आहे. त्या त्यामुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडीत जात असल्याने या सर्व प्रकरणाचा पाठपुरावा करून एक वर्षाचा कालावधी उलटला. तरी सुद्धा पुरवठा विभागाने विभागाने कारवाई न केल्याने तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांचे लक्ष वेधण्यासाठी विकास दाभाडे आणि कार्यकर्त्यांनी कोंबड्याचा नवस करून आंदोलनं केले.



यादरम्यान तहसीलदार यांनी निवेदनकर्त्यांचे म्हणणे ऐकून त्यांनी या प्रकरणात उचित कार्यवाही करण्यासाठी पंधरा दिवसाचा अवधी मागितला व तसे आंदोलन कर्त्यास आश्वासन पत्र सुद्धा देण्यात आले हे दिलेल्या आश्वासन महसूल प्रशासन कितपत ''पाळते'' की संपूर्ण प्रकरण थंड बस्त्यात ''पाडते'' याकडे तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे. या एक दिवसीय लक्षवेधी आंदोलनात विकास दाभाडे, गौरवकुमार इंगळे,कृष्णा आमटे, बबलू इंगळे, सतीश इंगळे, विठ्ठल खडसे शिवा आडात, संजय ईगोले, प्रतम येवले, सिधु मोरे, रौनक ससाने ओम खंडारे, मयुर थोंबे, सचिन कसार इत्यादी युवकांची उत्स्फूर्तपणे उपस्थिती होती.

## शेतकऱ्यांनो, घरच्या बियाण्याचे संरक्षण करा: कृषी विभागाचे आवाहन

**बुलढाणा** : खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांनी घरच्या बियाण्याचा वापर करावे. बदलत्या हवामान परिस्थिती आणि बाजारातील बियाण्यांच्या वाढत्या किमती लक्षात घेता, स्वतःचे बियाणे जपून ठेवणे ही शाश्वत शेतीसाठी महत्त्वाची बाब ठरत आहे. सर्व शेतकऱ्यांनी पुढील हंगामासाठी घरच्या बियाण्याचे संरक्षण करावे, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी मनोजकुमार ढगे यांनी केले आहे. घरच्या बियाण्याचे फायदे : बाजारातील महागड्या बियाण्यांचा खर्च टाळता येतो. स्थानिक हवामान व जमिनीस अनुरूप बियाण्यांची उगमशक्ती चांगली राहून गुणवत्तेबाबत सुनिश्चिता असते. इतरांवर अवलंबून न राहता स्वतःच्या बळावर शेती करता येते. स्थानिक, पारंपारिक व दुर्मिळ वाण टिकवता येतात.बियाणे साठवताना योग्या काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. बियाण्याची उगवण क्षमता व किडींपासून सुरक्षित राहण्यासाठी निरोगी व रोगमुक्त झाडांपासूनचे बियाणे निवडावे, बियाणे नीट स्वच्छ करून, त्यातील ओलावा पूर्णपणे काढून वाळवावेत. बियाणे हवाबंद डबे, पोती किंवा मातीची भांडी यामध्ये कोरड्या, थंड व अंधाऱ्या ठिकाणी ठेवावेत. किंड नियत्रंणासाठी कडुलिंबाचा पाला किंवा राख याचा वापर करून नैसर्गिक संरक्षण करावे. बियाण्यांवर वाणाचे नाव व साठवण्याची तारीख लिहावे. प्रतिबंधात्मक उपाययोजनामुळे शेतकऱ्यांना पुढील हंगामासाठी चांगल्या प्रतीचे बियाणे उपलब्ध होऊन त्यांची आर्थिक बाजू मजबूत होण्यास मदत होईल.

## गडचिरोलीत 'एलएमईएल'स्टील प्रकल्पाची आज पायाभरणी

### मुख्यमंत्री फडणवीसांचा वाढदिवस विकासकामांनी साजरा होणार

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**गडचिरोली, दि. २१** : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मंगळवारी, (दि.२२) 'एलएमईएल'च्या स्टील प्रकल्पाची पायाभरणी होणार आहे. हा प्रकल्प विदर्भातील पहिला एकात्मिक स्टील प्रकल्प ठरणार आहे.

चामोर्शी तालुक्यातील कोनसरी येथील लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेड (एलएमईएल)च्या ४.५ दशलक्ष टन प्रतिवर्ष क्षमतेच्या स्टील प्रकल्पाची पायाभरणी २२ जुलै रोजी मुख्यमंत्री तथा पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. याशिवाय मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते हेडरी येथे उभारण्यात आलेल्या पाच दशलक्ष टन प्रतिवर्ष क्षमतेच्या 'आयर्न ओर ग्राइंडिंग प्लान्ट'चे उद्घाटन आयोजित आहे. हा प्रकल्प 'एलएमईएल'ने केवळ एका वर्षात पूर्ण केला आहे. 'स्लरी पाइपलाइन' यासोबतच १० दशलक्ष टन प्रतिवर्ष क्षमतेच्या 'स्लरी पाइपलाइन'प्रकल्पाचेही उद्घाटन होणार आहे. ही स्लरी पाइपलाइन महाराष्ट्रातील पहिली लोखंड 'स्लरी पाइपलाइन' ठरणार आहे.

हेडरी ते कोनसरी ही ८५ किमी लांबीची पॅलेट प्लान्टदरम्यान असलेली पाइपलाइन कच्च्या मालाच्या वाहतुकीसाठी महत्त्वाची असून, ती कार्बन उत्सर्जनात ५५टक्के घट करेल आणि संपूर्ण प्रकल्पाच्या दळणवळणाची कार्यक्षमता वाढवेल. विशेष म्हणजे २२ जुलै रोजी मुख्यमंत्री फडणवीस यांचा वाढदिवस असून, गडचिरोलीतील विविध विकासकामांच्या माध्यमातून तो साजरा होणार आहे.नव्या वर्षाच्या पहिल्या दिवशी (१ जानेवारी २०२५) मुख्यमंत्री फडणवीस गडचिरोली जिल्हा दौऱ्यावर होते. आता आपल्या वाढदिवशीही ते गडचिरोलीत राहतील.




## एचपीव्ही लसीकरण शिबिरात २४५ मुलींनी घेतली लस

### विदर्भ प्रदेश विप्रनारी शक्ति सेवा संस्थेचा उपक्रम यशस्वी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**शेगाव, दि. २१** : शेगाव शहरात आज रविवार, दिनांक २० जुलै रोजी विदर्भ प्रांतीय विप्रनारी शक्ति सेवा संस्था, विदर्भ शाखा शेगाव यांच्यावतीने शांतीपद हॉस्पिटल येथे नऊ ते चौदा वयोगटातील शाळकरी मुलींसाठी एचपीव्ही लसीकरण शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले.



या शिबिरात शेगाव शहरातील सर्व समाजघटकांतील २४५ मुलींनी सहभाग घेत एचपीव्ही लस टोचून घेतली. स्त्री आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या या उपक्रमाचे शहरात स्वागत होत आहे. या शिबिराचे आयोजन संत तुकाराम हॉस्पिटल अँड मेडिकल रिसर्च सेंटर, अकोला चे चेअरमन गिरीशजी अग्रवाल, जी.एम. के. ओ. शर्मा, उद्योजक कमल किशोरजी हरितवाल, महेश सुभाषचंद्र शर्मा यांच्या सहकार्याने करण्यात आले होते. उद्घाटन समारंभात मारवाडी ब्राह्मण समाजाचे ज्येष्ठ अरुणकुमारजी बबेरवाल शर्मा, शेगाव नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष शरद शेठ अग्रवाल, पाणीपुरवठा विभागाचे माजी सभापती व माजी नगरसेवक पवनजी भिकुलालजी शर्मा, विप्र फाउंडेशनचे शेगाव अध्यक्ष के.बी. शर्मा, पंडित सतीश शर्मा, डॉ. हरीश सराफ, डॉ. अखिलेश कलावटे, डॉ. निलेश सोळंके, शिवम अशोक शर्मा, विनोद शर्मा आदी मान्यवर उपस्थित होते.

या शिबिराचे नेतृत्व विदर्भ प्रदेशाध्यक्षा सौ. मंजू अशोक शर्मा, सचिव सौ. मनीषा संजय शर्मा, उपाध्यक्ष डॉ. सोनल अखिलेश कलावटे, उपाध्यक्ष सौ. अनुराधा सतीश शर्मा, कोषाध्यक्ष सौ. पूजा पवन शर्मा यांनी केले. शिबिर यशस्वी करण्यासाठी कार्यरत राहिलेल्या कार्यकर्त्यांमध्ये सौ. निर्मला संतोष मिश्रा, सौ. सपना अमर शर्मा, सौ. राणी निलेश शर्मा, सौ. राणी नितेश शर्मा, सौ. स्वेता नरेंद्र तिवारी, सौ. स्वाती अखिलेश मिश्रा, सौ. राजश्री शशिकांत व्यास, सौ. उर्मिला जगदीश शर्मा, सौ. मीनाक्षी श्रीकांत व्यास, सौ. संगीता महेश शर्मा, सौ. सीमा राजेश शर्मा, सौ. प्रीती कृष्णकुमार शर्मा, सौ. किरण किशोर शर्मा, सौ. प्रियंका सुरज जोशी, सौ. सुनीता श्याम तिवारी, सौ. राखी विजय शर्मा, सौ. निशा विनोद शर्मा, सौ. सुशीला किशोर अवस्थी, सौ. उषा के.बी. शर्मा, सौ. प्रीती नंदकिशोर तिवारी यांच्यासह युवक कार्यकर्ते यांचा समावेश होता.यशस्वी शिबिरानंतर विदर्भ प्रदेशाध्यक्षा सौ. मंजू शर्मा आणि डॉ. सोनल कलावटे यांनी सांगितले की, ''सहा महिन्यानंतर दुसऱ्या डोससाठी असेच दुसरे शिबिर पुन्हा शांतीपद हॉस्पिटल येथे आयोजित करण्यात येणार आहे. आमचा उद्देश म्हणजे जास्तीत जास्त मुलींना गर्भाशयाच्या कर्करोगापासून वाचवणे.''

## डॉ. संतोषकुमार कोरपे यांना 'कै. विष्णू अण्णा पाटील जीवनगौरव' पुरस्कार

### उद्या मुंबई येथे होणार सन्मानित

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २१** : दि. अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने आपल्या यशस्वी वाटचालीत ११६ वर्षांचा टप्पा पूर्ण केला असून, महाराष्ट्रातील उत्कृष्ट व सक्षम जिल्हा बँक म्हणून लौकिक प्राप्त केला आहे. बँकेच्या आर्थिक शिस्ती, तांत्रिक प्रगती व शेतकरी हितसंबंधी धोरणांचा उच्च दर्जा गाठल्यामुळे बँकेला 'कै. वैकुंठभाई मेहता उत्कृष्ट जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक पुरस्कार' मिळणार आहे. या प्रतिष्ठित पुरस्काराबरोबरच बँकेचे अध्यक्ष डॉ. संतोषकुमार कोरपे यांना त्यांच्या सहकार क्षेत्रातील बहुमोल योगदानाबद्दल 'कै. विष्णू अण्णा पाटील जीवन गौरव पुरस्कार' देऊन गौरविण्यात येणार आहे. सन १९९३ पासून बँकेच्या अध्यक्षपदावर



कार्यरत असलेले डॉ. कोरपे यांनी बँकेच्या प्रगतीसाठी घेतलेली दूरदृष्टी, सुधारणा व सहकार क्षेत्रातील सामाजिक बांधिलकीचे कार्य यामुळे त्यांना हा मानाचा सन्मान मिळत आहे.

या दोन्ही पुरस्कारांचे वितरण सोहळा दि. २३ जुलै २०२५ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे दि. महाराष्ट्र स्टेट को-ऑप. बँक्स असोसिएशन लि. यांच्या वतीने संपन्न होणार आहे. बँकेच्या या यशात खातेदार, ग्राहक, पत्रकार व हितचिंतकांचा मोलाचा वाटा असल्याचे बँकेच्या वतीने सांगण्यात आले.

# भारतात रंगणार ६४ घरांचा जागतिक महासंग्राम!

## २ दशकांनंतर मिळाले बुद्धिबळ विश्वचषकाचे यजमानपद

नवी दिल्ली, दि. २१ प्रतिनिधी

भारतातील बुद्धिबळप्रेमींसाठी एक अत्यंत आनंदाची बातमी आहे. तब्बल २३ वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर, भारताला पुन्हा एकदा प्रतिष्ठित बुद्धिबळ विश्वचषक २०२५ चे यजमानपद भूषवण्याचा मान मिळाला आहे. ही स्पर्धा येत्या ३० ऑक्टोबर ते २७ नोव्हेंबर या कालावधीत खेळवली जाणार असून स्पर्धेच्या ठिकाणाची अधिकृत घोषणा लवकरच करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे.



बुद्धिबळाची जागतिक नियामक संस्था 'फिडे' () ने मंगळवारी (२१ जुलै) या वृत्ताला दुजोरा दिला. या महत्त्वपूर्ण घोषणेमुळे भारतीय बुद्धिबळ क्षेत्रात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या विश्वचषक स्पर्धेत जगभरातील २०६ अव्वल खेळाडू सहभागी होतील. विजेतेपदाच्या लढाईसोबतच, हे खेळाडू २०२६ मध्ये होणाऱ्या 'फिडे कँडिडेट्स' स्पर्धेतील स्थानासाठीही झुंज देतील.

भारताने यापूर्वी २००२ साली हैदराबाद येथे या स्पर्धेचे यशस्वी आयोजन केले होते. त्या स्पर्धेत भारताचे दिग्गज ग्रँडमास्टर विश्वनाथन आनंद यांनी विजेतेपद पटकावून इतिहास रचला होता. आता २३ वर्षांनंतर ही स्पर्धा पुन्हा एकदा भारतीय भूमीवर आयोजित होत आहे.

विश्वचषक २०२५ चे आयोजन नॉकआऊट पद्धतीने केले जाणार आहे, ज्यामध्ये प्रत्येक फेरीत पराभूत होणारा खेळाडू स्पर्धेतून बाहेर होईल. फिडेच्या नियमांनुसार, स्पर्धेतील अव्वल तीन खेळाडू थेट २०२६ च्या कँडिडेट्स स्पर्धेसाठी पात्र ठरतील, जी भविष्यातील विश्वविजेत्याच्या निवड प्रक्रियेतील एक महत्त्वाचा टप्पा मानली जाते. दिग्गज खेळाडू ठरणार आकर्षणाचे केंद्र या भव्य स्पर्धेत भारताचे अनेक अव्वल खेळाडू सहभागी होणार असल्याने स्थानिक प्रेक्षकांसाठी ही एक मोठी पर्वणी ठरणार आहे. यामध्ये विद्यमान विश्वविजेता डी. गुकेश, विश्वचषक २०२३ चा उपविजेता आर. प्रज्ञानानंद आणि जागतिक क्रमवारीत पहिल्या ५ खेळाडूंमध्ये स्थान मिळवलेला अर्जुन एरिगैसी यांचा समावेश आहे. या खेळाडूंच्या उपस्थितीमुळे स्पर्धेची रंगत आणखी वाढणार आहे.

या घोषणेवर प्रतिक्रिया देताना फिडेचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) एमिल सुतोव्स्की म्हणाले, 'आम्ही भारतात विश्वचषक २०२५ आयोजित करण्यासाठी अत्यंत उत्सुक आहोत. भारत हा असा देश आहे, जिथे बुद्धिबळ केवळ एक खेळ नसून एक ध्यास आहे.' या आयोजनामुळे देशातील उदयोन्मुख खेळाडूंना मोठी प्रेरणा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## भारतीय कर्णधार गिल इतिहास रचण्याच्या उंबरठ्यावर

**नवी दिल्ली :** इंग्लंडविरुद्धच्या सध्या सुरू असलेल्या कसोटी मालिकेत भारतीय संघाचा कर्णधार शुभमन गिल उत्कृष्ट फॉर्ममध्ये आहे. त्याने आतापर्यंत तीन सामन्यांत ६०० हून अधिक धावा केल्या आहेत. दोन्ही संघांमधील मालिकेतील चौथा कसोटी सामना मँचेस्टर येथे खेळवला जाणार असून, या सामन्यात भारताचा कसोटी कर्णधार शुभमन गिलला इतिहास रचण्याची सुवर्णसंधी आहे. इंग्लंडविरुद्ध एकाच कसोटी मालिकेत सर्वाधिक धावा करणारा आशियाई फलंदाज होण्यासाठी त्याला मँचेस्टर कसोटीत केवळ २५ धावांची आवश्यकता आहे.

इंग्लंडविरुद्धच्या द्विपक्षीय कसोटी मालिकेत सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम आशियाई फलंदाजांमध्ये पाकिस्तानचे माजी फलंदाज मोहम्मद युसूफ यांच्या नावावर आहे. त्यांनी २००६ साली इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत ६३१ धावा केल्या होत्या. दुसरीकडे, गिलने सध्या सुरू असलेल्या मालिकेत तीन सामन्यांच्या ६ डावांमध्ये ६०७ धावा केल्या आहेत. युसूफचा हा विक्रम मोडण्यासाठी त्याला चौथ्या कसोटी सामन्यात केवळ २५ धावांची गरज आहे. या मालिकेत गिलने आतापर्यंत एक द्विशतक आणि दोन शतके झळकावली असून, त्याची सर्वोच्च धावसंख्या २६९ आहे. जर त्याने चौथ्या कसोटीत २५ धावा केल्या, तर तो मोहम्मद युसूफचा १९ वर्षे जुना विक्रम आपल्या नावे करेल.

या सामन्यात शुभमन गिलला आणखी काही विक्रम आपल्या नावे करण्याची संधी असेल. मँचेस्टर कसोटी सामन्यात गिलने १४६ धावा केल्यास, तो भारत आणि इंग्लंड यांच्यातील एका कसोटी मालिकेत सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरेल. हा विक्रम सध्या इंग्लंडचे माजी दिग्गज फलंदाज ग्रॅहम गूच यांच्या नावावर आहे. त्यांनी १९९० साली एका मालिकेत ७५२ धावा केल्या होत्या.




## मिचेल ओवेनचे पदार्पणातच वादळी अर्धशतक!

### पाँटिंग-वॉर्नरनंतर 'अशी' कामगिरी करणारा तिसरा ऑस्ट्रेलियन

**किंग्स्टन :** ऑस्ट्रेलियाने वेस्ट इंडिजविरुद्धच्या ट्वेन्टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेची धडाकेबाज सुरुवात केली आहे. सबिना पार्क येथे खेळल्या गेलेल्या पहिल्याच सामन्यात ऑस्ट्रेलियाने यजमान वेस्ट इंडिजवर ३ गडी राखून मात केली. या विजयाचा शिल्पकार ठरला ते पदार्पण करणारा मिचेल ओवेन. त्याने आपल्या पहिल्याच आंतरराष्ट्रीय सामन्यात तुफानी अर्धशतकी खेळी खेळून सर्वांची मने जिंकली.

याआधी तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेत यजमान वेस्ट इंडिजला ३-० असा क्लिन स्वीप दिल्यानंतर, ऑस्ट्रेलियाने टी-२० मालिकेतही विजयी सलामी दिली आहे. किंग्स्टन येथील सबिना पार्कवर झालेल्या पहिल्या सामन्यात, नवोदित मिचेल ओवेनच्या वादळी खेळीच्या जोरावर ऑस्ट्रेलियाने वेस्ट इंडिजचा ३ गडी राखून पराभव केला. ओवेनने आपल्या कारकिर्दीतील पहिल्याच आंतरराष्ट्रीय टी-२० सामन्यात धडाकेबाज अर्धशतक झळकावण्याची किमया केली. या कामगिरीमुळे त्याने रिकी पाँटिंग आणि डेव्हिड वॉर्नर यांसारख्या दिग्गजांच्या विशेष क्लबमध्ये स्थान मिळवले आहे.

खरे तर, आंतरराष्ट्रीय टी-२० पदार्पणात अर्धशतक झळकावणारा मिचेल ओवेन हा केवळ तिसरा ऑस्ट्रेलियन फलंदाज ठरला आहे. त्याच्यापूर्वी केवळ रिकी पाँटिंग आणि डेव्हिड वॉर्नर यांनीच ही मोठी कामगिरी केली होती. इतकेच नव्हे, तर ऑस्ट्रेलियाकडून टी-२० पदार्पणात तिसरी सर्वोच्च धावसंख्या करण्याचा विक्रमही ओवेनच्या नावावर नोंदवला गेला आहे. २३ वर्षीय मिचेल ओवेनने अवघ्या २७ चेंडूंत ६ गगनचुंबी षटकारांसह ५० धावांची खेळी साकारली. त्याला कॅमेरून ग्रीनची उत्कृष्ट साथ लाभली. ग्रीननेही २६ चेंडूंत २ चौकार आणि ५ षटकारांच्या मदतीने ५१ धावांची वेगवान खेळी साकारली.

## भज्जीने मारलेली ती थप्पड श्रीसंतच्या लेकीच्या मनाला लागलीये!

नवी दिल्ली, दि. २१ प्रतिनिधी




भारतीय संघाचा माजी फिरकीपटू हरभजन सिंग आणि जलदगती गोलंदाज श्रीसंत यांच्यात च्या रिंगणात झालेली वादग्रस्त घटना आजही क्रिकेट चाहत्यांच्या लक्षात आहे. २००८ च्या पहिल्या हंगामात कडून खेळणाऱ्या हरभजन सिंगनं भर मैदानात श्रीसंतला (पंजाब संघात) थप्पड मारली होती. क्रिकेटच्या मैदानातील हे एक गाजलेले प्रकरण आहे. आपली चूक मान्य करत हरभजन सिंगने एकदा नव्हे तर अनेकदा जगजाहिरपणे माफीही मागितलीये. श्रीसंतनही त्याला माफ केलय. पण एक व्यक्ती अशी आहे, जी आजही भज्जीच्या त्या गोष्टीवर मनात राग धरून आहे. ती व्यक्ती म्हणजे दुसरी तिसरी कोणी नसून ती आहे श्रीसंतची लेक सानविका. खुद्द हरभजन सिंगनेच हा किस्सा शेअर केला आहे.

आर. अश्विनसोबत गप्पा गोष्टी करताना हरभजन सिंग याने आयपीएलच्या मैदानात श्रीसंतला मारलेली थप्पड, ही क्रिकेट कारकिर्दीतील एक मोठी चूक होती, असे म्हटले आहे. माझ्या कारकिर्दीतील हा एक वाईट प्रसंग होता. जे घडलं ते व्हायला नको होते. त्याने मला उसाकवले, मला मी एवढ्या टोकाचे पाऊल उचलायला नको होते. या चुकीबद्दल मी २०० वेळा माफी मागितली आहे, अशा आशयाच्या वक्तव्यासह भज्जीने या जुन्या प्रकरणात पुन्हा एकदा श्रीसंतची माफी मागितली.

यावेळी हरभजन सिंगनं या घटनेसंदर्भातील एक खास किस्साही शेअर केला आहे. तो म्हणाला की, मी एकदा श्रीसंतच्या मुलीला भेटलो. मी तिच्याशी खूप प्रेमानं बोलत होतो. पण ती माझ्याशी बोलायला तयार नव्हती. तुम्ही माझ्या बाबांना मारलंय, त्यामुळे मला तुमच्याशी बोलायचं नाही, असा रिप्लाय आला. माझ्या कृतीचा बाल मनावर झालेला परिणाम बघून मला अक्षरश: रडू आले होते. श्रीसंतच्या लेकीसमोर उभी राहिलेली खलनायकाची छबी मला धक्का देणारी होती. ज्यावेळी ती मोठी होईल, त्यावेळी कदाचित ती मला समजू शकेल, असेही फिरकीपटू यावेळी म्हणाला आहे.

## १२ वर्षांनी पुन्हा सुरू होणार टी-२० लीग, धोनीने जिंकलेली शेवटची ट्रॉफी

**नवी दिल्ली :** सिंगापूरमध्ये सुरू असलेल्या आयसीसीच्या बैठकीतून एक मोठी बातमी समोर आली आहे. अनेक देशांमध्ये टी-२० लीग खेळल्या जातात. आता आणखी एक टी-२० लीग परत येणार आहे. २०१४ नंतर ही लीग बंद करण्यात आली होती. पण आता ती पुन्हा सुरू होणार आहे. विशेष म्हणजे अनेक देशांतील फ्रँचायझी संघ या लीगमध्ये भाग घेतात. या लीगने क्रिकेट जगताचे लक्ष वेधले होते आणि टी-२० फॉरमॅटची लोकप्रियता वाढवली होती.




गेल्या दोन दशकांत टी-२० क्रिकेटने क्रिकेटचे जग पूर्णपणे बदलून टाकले आहे. रोमांचक सामने आणि मनोरंजनामुळे ही लीग चाहत्यांना प्रचंडल आवडते. मीडिया रिपोर्ट्सनुसार, टी-२० चॅम्पियन्स लीग दपरत येणार आहे. यामध्ये जगभरातील टॉप टी-२० फ्रँचायझी संघ एकमेकांविरुद्ध खेळतील. पुढील वर्षी सप्टेंबरमध्ये ही लीग सुरू होऊ शकते.

टी-२० चॅम्पियन्स लीगचा पहिला हंगाम २००८ मध्ये सुरू झाला होता, तर शेवटचा हंगाम २०१४ मध्ये खेळवला गेला. शेवटचा हंगाम एमएस धोनीच्या नेतृत्वाखाली चेन्नई सुपर किंग्जने जिंकला होता. द सिडनी मॉर्निंग हेराल्डमधील एका वृत्तानुसार, आयसीसीच्या बैठकीत सदस्यांमध्ये चॅम्पियन्स लीग टी-२० च्या पुनरागमनावरही चर्चा झाली आहे.

## 'टीम इंडिया-मँचेस्टर युनायटेड'ची ऐतिहासिक भेट!

### क्रिकेट-फुटबॉलच्या मैत्रीचा रंगला उत्सव

नवी दिल्ली, दि. २१ प्रतिनिधी

मँचेस्टर : भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतील चौथा सामना २३ जुलैपासून मँचेस्टर येथे सुरू होत आहे. या महत्त्वपूर्ण सामन्यापूर्वी, भारतीय क्रिकेट संघाने इंग्लंडमधील प्रसिद्ध फुटबॉल क्लब 'मँचेस्टर युनायटेड'च्या खेळाडूंची भेट घेतली. या भेटीदरम्यान दोन्ही संघांच्या खेळाडूंनी एकत्र सराव करत एक मैत्रीपूर्ण वेळ घालवला, ज्यामुळे क्रिकेट आणि फुटबॉल या दोन लोकप्रिय खेळांचा एक अविस्मरणीय संगम क्रीडाप्रेमींना पाहायला मिळाला.

सध्या भारतीय संघ मँचेस्टरमध्ये आगामी चौथ्या कसोटी सामन्याच्या तयारीत व्यस्त आहे. हा सामना २३ जुलैपासून मँचेस्टरच्या ऐतिहासिक ओल्ड ट्रॅफर्ड मैदानावर खेळवला जाणार आहे. या महत्त्वाच्या सामन्यापूर्वी तणावमुक्त वातावरणाची निर्मिती करण्याच्या उद्देशाने भारतीय क्रिकेट संघाने मँचेस्टर युनायटेडच्या खेळाडूंची भेट घेतली.

या भेटीची छायाचित्रे आणि व्हिडिओ भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने () सोशल मीडियावर प्रसिद्ध केली आहेत. यामध्ये,




भारतीय संघातील प्रमुख खेळाडू फुटबॉलपटूंशी अनौपचारिक आणि खेळीमेळीच्या वातावरणात संवाद साधताना आणि फुटबॉल खेळताना दिसत आहेत. यावेळी दोन्ही संघांच्या खेळाडूंनी एकमेकांना आपापल्या संघाची जर्सी भेट देऊन या क्षणाला अधिक खास बनवले. भारत आणि इंग्लंड यांच्यातील ओल्ड ट्रॅफर्ड येथील चौथ्या कसोटी सामन्यापूर्वी ही भेट झाल्याने, दोन प्रतिष्ठित संघांमधील या भेटीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर, कर्णधार शुभमन गिल आणि फिरकीपटू कुलदीप यादव यांनी या भेटीबद्दल आपले विचार व्यक्त केले. गंभीर आणि गिल यांनी सांगितले की, मँचेस्टर युनायटेडचे प्रशिक्षक रुबेन अमोरिम आणि कर्णधार ब्रुनो फर्नांडिस यांच्याशी झालेल्या चर्चेचा मुख्य विषय सांघिक खेळात येणारा दबाव, अपेक्षांचे ओझे आणि प्रचंड चाहतावर्गाच्या दबावाखाली स्वतःला कसे स्थिर ठेवावे हा होता. दरम्यान, कुलदीप यादवने ब्राझीलचा खेळाडू कॅसेमिरो याचे कौतुक करत, आपण या मिडफिल्डरचे मोठे चाहते असल्याची भावना व्यक्त केली.

व्हिडिओमध्ये टिपलेल्या इतर क्षणांमध्ये, यष्टीरक्षक-फलंदाज ऋषभ पंत मँचेस्टर युनायटेडचा गोलरक्षक टॉम हीटन याच्याशी मनमोकळ्या गप्पा मारताना दिसतो, तर मँचेस्टर युनायटेडचा कट्टर समर्थक असलेला वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराज या भेटीदरम्यान अनेकदा आपले वैशिष्ट्यपूर्ण सिऊ सेलिब्रेशन करण्याचा मोह आवरू शकला नाही. हे सेलिब्रेशन त्याचा आदर्श खेळाडू ख्रिस्तियानो रोनाल्डो याला दिलेला एक सलाम होता, जो या क्लबकडून दोन वेळा खेळला आहे.

एका छायाचित्रात, मोहम्मद सिराज हा युनायटेडचा दिग्गज बचावपटू हॅरी मॅग्वायरला गोलंदाजी शिकवताना दिसतो, तर दुसऱ्या छायाचित्रात शुभमन गिल आणि ब्रुनो फर्नांडिस यांच्या गप्पा रंगल्याचे दिसले. त्याचवेळी, वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह हा मेसन माउंट आणि हॅरी मॅग्वायर यांच्याशी संभाषणात मग्न असल्याचे दिसून आले. या व्हिडिओमध्ये हॅरी मॅग्वायर सिराजच्या गोलंदाजीवर क्रिकेट बॅटने फटकेबाजी करताना आणि ऋषभ पंत पेनल्टी किक मारण्याचा प्रयत्न करताना दिसतो. हा व्हिडिओ प्रसिद्ध होताच सोशल मीडियावर चाहत्यांनी प्रचंड उत्साही प्रतिक्रिया दिल्या. अनेकांनी या अनोख्या भेटीचे कौतुक केले, तर काही चाहत्यांनी दोन्ही संघांसमोरील समान आव्हानांकडे लक्ष वेधले. विशेष म्हणजे, दोन्ही संघांनी त्यांच्या मागील अकरा सामन्यांपैकी केवळ दोन सामन्यांत विजय मिळवला आहे, याकडेही काही चाहत्यांनी लक्ष वेधले आहे.

## क्रेडिट कार्ड अर्ज वारंवार का नाकारले जातात?

**नवी दिल्ली :** आजच्या डिजिटल युगात क्रेडिट कार्ड हे केवळ लक्झरी नसून, गरजेचे आर्थिक साधनही बनले आहे. शॉपिंगपासून ते आपत्कालीन खर्चापर्यंत, क्रेडिट कार्डचा वापर सर्वत्र वाढला आहे. मात्र, अनेकदा नागरिकांचा क्रेडिट कार्डसाठीचा अर्ज बँकेकडून वारंवार नाकारला जातो. हे नेमके का घडते, याची कारणे जाणून घेणे महत्त्वाचे आहे.




क्रेडिट कार्ड अर्ज नाकारण्यामागील सर्वात मोठे कारण म्हणजे, खराब क्रेडिट स्कोअर. सिबिल किंवा इतर क्रेडिट ब्युरोचा स्कोअर ७५० पेक्षा कमी असल्यास, बँका किंवा वित्तीय संस्था त्या अर्जदारावर विश्वास ठेवत नाहीत. वेळेवर कर्ज किंवा क्रेडिट कार्डचे बिल न भरल्यास आपला स्कोअर कमी होतो आणि परिणामी अर्ज नाकारला जातो. जर तुमच्यावर आधीच अनेक कर्जे किंवा ईएमआय असतील, तर बँक तुमचा अर्ज नाकारू शकते. कारण, जास्त कर्ज असलेल्या व्यक्तीला नवीन कर्ज फेडणे कठीण जाऊ शकते, असा बँकेचा अंदाज असतो. क्रेडिट कार्ड मिळवण्यासाठी नियमित आणि स्थिर उत्पन्न असणे आवश्यक आहे. फ्रीलान्सिंग, कंत्राटी नोकरी किंवा उत्पन्नाचा निश्चित पुरावा नसल्यास, बँका अर्ज नाकारतात. कारण, उत्पन्नाची अनिश्चितता असल्यास कर्ज फेडण्याची क्षमता कमी असते. अर्जात चुकीची माहिती, अपूर्ण कागदपत्रे किंवा पत्त्याचा गोंधळ असल्यासही अर्ज नाकारला जाऊ शकतो. अर्ज करताना सर्व माहिती अचूक आणि पूर्ण द्यावी. काही वेळा वयाची अट पूर्ण न झाल्यास किंवा नोकरीत सातत्य नसेल, तरीही अर्ज नाकारला जाऊ शकतो. बँका अर्जदाराची नोकरीतील स्थिरता आणि अनुभव पाहतात.

हप्ते वेळेवर आणि पूर्ण भरा : तुमचा क्रेडिट स्कोअर ठरवण्यात कर्जाचे हप्ते (ईएमआय) आणि क्रेडिट कार्डची बिले वेळेवर भरणे, हा सर्वात महत्त्वाचा घटक आहे. एक जरी हप्ता चुकला तरी त्याचा थेट परिणाम तुमच्या स्कोअरवर होतो. अनेकजण क्रेडिट कार्डचे फक्त 'किमान देयक' भरतात; पण ही सवय धोकादायक आहे.

# पहिली नोकरी ७ हजाराची, ३५ व्या वर्षी दोन घरे हे शक्य आहे का?

नवी दिल्ली, दि. २१ प्रतिनिधी

एकीकडे महागाई आणि घरांच्या वाढत्या किमतींमुळे तरुण पिढी त्रस्त असताना, एका ३५ वर्षीय तरुणाची गोष्ट सोशल मीडियावर लाखो लोकांसाठी प्रेरणा ठरत आहे. आयआयटी, आयआयएम किंवा कोणत्याही मोठ्या ब्रँडची नोकरी नाही. तरीही एका सामान्य कष्टकरी व्यक्तीने अलिशान घर आणि कारचे लाखो लोक स्वप्न पाहतात ते साध्य केले आहे. महिन्याला अवघ्या ७ हजार रुपयांपासून करिअरची सुरुवात करून, या तरुणाने नोएडा आणि बंगळूरु यांसारख्या मोठ्या शहरांमध्ये स्वतःचे घर घेतले आहे. वयाच्या ३५ व्या वर्षी त्याने १ कोटी रुपयांपेक्षा जास्त कर्ज फेडून तो जवळपास कर्जमुक्त झाला आहे. जाणून घ्या या तरुणाच्या यशाची अविश्वसनीय गोष्ट...

**संघर्षाची सुरुवात आणि मिळालेल दोन कानमंत्र :** सोशल मीडिया प्लॅटफॉर्म रेडिट () वर एका युझरने त्याचा संघर्षमय प्रवास शेअर केला आहे. २०१३ साली या तरुणाने नोएडा येथे आपल्या करिअरची सुरुवात केली, तेव्हा त्याला महिन्याला फक्त ७ हजार रुपये पगार होता. काही काळानंतर बंगळूरुला जाऊन त्याने मधून एक तांत्रिक कोर्स पूर्ण केला, पण त्यानंतरही त्याला तब्बल ४५ कंपन्यांनी नोकरी दिली नाही. मात्र, त्याने शिकण्याची जिद्द सोडली नाही. याच काळात एका वरिष्ठ एचआरने दिलेला सल्ला



त्याच्यासाठी टर्निंग पॉईंट ठरला. त्यांनी दिलेले दोन कानमंत्र आजही महत्त्वाचे आहेत, असे तो सांगतो. ''बचतीला घराच्या भाड्याप्रमाणे समजा, ती प्रत्येक महिन्याला अनिवार्य आहे. क्रेडिट कार्डपासून लांब राहा, ते कर्ज नाही, तर एक सापळा आहे,'' हे दोन कानमंत्र त्याने आजपर्यंत अवलंबले आहेत. त्यानंतर त्याने प्रत्येक खर्चाचा हिशोब ठेवायला सुरुवात केली आणि अनावश्यक खर्च टाळला.

**चुका झाल्या, पण चूकीतून शिकत मिळवला मोठा परतावा :** त्याची बचतीची सुरुवात कर-बचत करणाऱ्या एफडी पासून झाली, जिथे त्याला ८.७५ टक्के व्याज मिळत होते. हळूहळू त्याने म्युच्युअल फंडातील एसआयपी आणि शेअर बाजारातही गुंतवणूक करण्यास सुरुवात केली. पाच वर्षांच्या काळात त्याच्या काही गुंतवणुकींनी ५० ते ३०० टक्क्यांपर्यंतचा जबरदस्त परतावा दिला. या प्रवासात त्याच्याकडून अनेक चुका झाल्या, पण प्रत्येक चुकीतून शिकण्याच्या सवयीमुळे तो कधीच थांबला नाही.

**पहिल्या घराचं स्वप्न कसं पूर्ण केलं? :** २०१८ पर्यंत त्याने ५ लाख रुपयांची बचत केली होती. त्याचवेळी नवीन नोकरीत मिळालेला १ लाखाचा बोनस, १ लाखाचा पुनर्वसन भत्ता आणि वडिलांकडून मिळालेली ७ लाखांची मदत, याच्या जोरावर त्याने नोएडा येथे फ्लॅट खरेदी करण्याचा धाडसी निर्णय घेतला. यासाठी त्याने सुमारे ५५ ते ६० लाख रुपयांचे गृहकर्ज घेतले, ज्याचा कालावधी २५ वर्षांचा होता. पण कर्ज घेताना त्याने स्वतःसाठी एक कठोर नियम बनवला. ''जर भरण्यात कधी चूक झाली, तर भावनिक विचार न करता फ्लॅट विकून टाकायचा.'' त्याने दरवर्षी १२ ऐवजी १४ भरण्याचा नियम ठेवला आणि बोनसची रक्कम थेट कर्ज फेडण्यासाठी वापरली. यामुळे त्याचे कर्ज वेळेच्या आधीच कमी होऊ लागले.

## शेअर बाजारात खरेदीचा उत्साह, सेन्सेक्स- निफ्टी तेजीसह बंद

नवी दिल्ली, दि. २१ प्रतिनिधी

विदेशी गुंतवणूकदारांकडून खरेदी आणि बँकिंग शेअर्समधील तेजीच्या जोरावर सोमवारी (दि.२१ जुलै) सेन्सेक्स- निफ्टी वधारुन बंद झाले. सेन्सेक्स ४४२ अंकांनी वाढून ८२,२०० वर बंद झाला. तर निफ्टी ५० निर्देशांक १२२ अंकांनी वाढून २५,०९० वर बंद झाला. एकूणच शेअर बाजारात खरेदीचा उत्साह राहिला.



विशेषतः बँकिंग शेअर्समधील तेजीमुळे निफ्टी बँक मजबूत दिसून आला. निफ्टी बँक १.१ टक्के वाढला. यावर आयसीआयसीआय बँक २.७ टक्के, एचडीएफसी बँक २.२ टक्के, आयडीएफसी फर्स्ट बँक १.३ टक्के आणि कोटक बँक शेअर्स १.१ टक्के वाढला.

मेटल, रियल्टी आणि ऑटो शेअर्समध्येही खरेदी दिसून आली. पण आयटी शेअर्सवर दबाव राहिला. बीएसई मिडकॅप ०.५ टक्के वाढून बंद झाला. तर स्मॉलकॅप सपाट पातळीवर स्थिरावला.

सेन्सेक्सवर इर्टनलचा शेअर्स ७.३ टक्के वाढून टॉप गेनर राहिला. त्याचबरोबर आयसीआयसीआय बँक, एचडीएफसी बँक, एम अँड एम, भारत इलेक्ट्रॉनिक्स, कोटक बँक, टाटा मोटर्स, बजाज फिनसर्व्ह, एलटी, पॉवर ग्रिड हे शेअर्स १ ते २.७ टक्क्यांपर्यंत वाढले. तर दुसरीकडे रिलायन्सचा शेअर्स ३.२ टक्क्यांनी घसरला. एचसीएल टेक, हिंदुस्तान युनिलिव्हर, टीसीएस, आयटीसी, मारुती आदी शेअर्समध्येही घसरण दिसून आली.

सेन्सेक्स सुरुवातीला १४८ अंकांनी घसरून ८१,६०० पर्यंत खाली आला होता. तर निफ्टी २५ हजारांच्या खाली गेला होता. त्यानंतर दोन्ही निर्देशांकांनी जोरदार रिकव्हरी केली. बँक आणि बँकेच्या जून तिमाहीतील चांगल्या कमाईच्या आकडेवारीने एकूणच बँकिंग आणि फायनान्सियल शेअर्समध्ये तेजीचा माहौल राहिला. समभागांमध्ये वाढ दिसून आली.

## आता आधार कार्डवर मिळणार झटपट कर्ज

**नवी दिल्ली :** अचानक पैशांची गरज लागल्यास आता चिंता करण्याची गरज नाही. बँक किंवा मित्रांकडे धाव घेण्याऐवजी, तुमच्या खिशातील आधार कार्डच तुम्हाला काही मिनिटांत ५,००० रुपयांपर्यंतचे झटपट कर्ज मिळवून देऊ शकते. फिनटेक आणि एनबीएफसी कंपन्यांनी ही प्रक्रिया इतकी सोपी केली आहे की, आता कर्ज मिळवण्यासाठी लांब रांगेत उभे राहण्याची किंवा कागदपत्रांचा ढिगारा जमा करण्याची गरज नाही. जर तुम्हाला अचानक पैशांची गरज भासली, तर तुम्ही या सुविधेचा वापर कसा करू शकता आणि अर्ज करताना कोणती काळजी घेतली पाहिजे, हे सविस्तरपणे जाणून घेऊया.

* अशा प्रकारच्या छोट्या कर्जासाठी काही मूलभूत अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे:
* अर्जदाराचे वय सामान्यतः २१ वर्षांपेक्षा जास्त असावे.
* उत्पन्नाचा नियमित स्रोत असणे आवश्यक आहे, जरी तो कमी असला तरी चालेल.
* आधार कार्डशी लिंक केलेला मोबाईल नंबर असणे अनिवार्य आहे, कारण त्यावरच ओटीपी येतो.
* तुमच्याकडे पॅन कार्ड असणे देखील आवश्यक आहे.

# 'मातृवंदन' योजनेला 'अडथळ्यां'चे ग्रहण

## आरोग्य विभागाकडून हस्तांतरण रखडले; 'महिला व बालकल्याण' विभाग हतबल, योजनाच ठप्प

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २१ : माता आणि बालकांचे आरोग्य सुधारण्यासाठीची महत्त्वपूर्ण 'प्रधानमंत्री मातृवंदन योजना', आरोग्य आणि महिला व बालकल्याण या दोन विभागांच्या समन्वयाच्या अभावामुळे अक्षरशः ठप्प झाली आहे. मार्च २०२५ मध्ये ही योजना आरोग्य विभागाकडून महिला व बालकल्याण विभागाकडे हस्तांतरित करण्याचा निर्णय होऊनही, ही प्रक्रिया अद्याप पूर्ण न झाल्याने, हजारो गरजू गर्भवती महिला मदतीपासून वंचित आहेत.**




१ जानेवारी २०१७ पासून सुरू असलेली ही योजना, गर्भवती आणि स्तनदा मातांना सकस आहारासाठी आर्थिक सहाय्य देते, ज्यामुळे मातामृत्यू आणि बालमृत्यू दर कमी होण्यास मदत होते. या योजनेअंतर्गत, पात्र महिलांना पहिल्या अपत्यासाठी ५ हजार रुपयांची मदत तीन टप्प्यांत दिली जाते. पूर्वी ही योजना आरोग्य विभागामार्फत यशस्वीपणे राबवली जात होती. मात्र, मार्च २०२५ मध्ये, शासनाने ही योजना महिला व बालकल्याण विभागाकडे हस्तांतरित करण्याचा निर्णय घेतला.

चार महिने उलटूनही, आरोग्य विभागाने या योजनेचे हस्तांतरण पूर्ण केलेले नाही. या प्रशासकीय दिरंगाईमुळे, नवीन लाभार्थ्यांची नोंदणीच थांबली आहे. त्यामुळे, हजारो गरजू गर्भवती महिला, ज्या या योजनेसाठी पात्र आहेत, त्यांना अर्जही करता येत नाहीये. दोन विभागांच्या या टोलवाटोलवीमुळे, शासनाची एक अत्यंत महत्त्वाची आणि संवेदनशील योजनाच 'वेंटिलेटर'वर गेली असून, याला जबाबदार कोण, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. या अनास्थेमुळे, माता आणि बालकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

### ही अट...

**सरकारने अधिसूचित केलेल्या संस्थेत नोंदणीकृत महिलांनाच लागू असून, लाभाची पाच हजारांची रक्कम तीन टप्प्यांत संबंधित लाभार्थ्यांच्या खात्यात थेट जमा करण्यात येते. यासाठी जात व उत्पन्नाची अट नाही. आर्थिक साहाय्याचा पहिला हप्ता (१ हजार रुपये.) गर्भवती मातांनी मासिक पाळीच्या शेवटच्या तारखेपासून १५० दिवसांच्या आत शासकीय रुग्णालयात नोंद केल्यानंतर मिळतो. दुसरा हप्ता (२ हजार रुपये) बाळंतपूर्व तपासणी करताना गर्भधारणेच्या सहा महिने पूर्ण झाल्यानंतर तर योजनेतील तिसरा आणि शेवटचा हप्ता (२ हजार रुपये) हा ती प्रसूत झाल्यानंतर बाळाला लसीकरणाचा पहिल डोस (साडे तीन महिने) झाल्यानंतर मिळण्याची तरतूद आहे.**

### नवी नोंदणी नाही

**मार्च महिन्यात आरोग्य विभागाकडून योजना महिला व बालकल्याण विभागाकडे हस्तांतरित करण्याची अधिसूचना निघाली; परंतु आरोग्य विभागाने अद्याप ही प्रक्रिया पूर्ण केली नसल्याने नवी नोंदणी झालेली नाही, अशी माहिती महिला व बाल कल्याण अधिकारी (जि.प.नागपूर) कैलास घोडके यांनी दिली.**

## सरकारी कामात अडथळा, गुन्हा दाखल

**कन्हान, दि. २१ :** सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अज्ञात आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला. बनावट सोने विकून फसवणूक करणारे काही इसम कन्हान ठाण्याच्या हद्दीतील मौजा तारसा येथील रस्त्यालगतच्या जंगल परिसरात येणार असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली होती याआधारे पोलिस उपनिरीक्षक मनोज गडादे आपल्या पथकासह घटनास्थळी पोहोचले असता दोन संशयित व्यक्ती फिरताना दिसल्या. त्यांना थांबवण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांनी झुडपी जंगलात पळ काढला. पाठलाग सुरू असताना आणखी दोन अनोळखी इसम त्यांच्यासोबत असल्याचे निदर्शनास आले. यानंतर चारही अनोळखी इसमांचा जंगल परिसरात पाठलाग सुरू ठेवला. मात्र, जंगलाचा फायदा घेत आरोपींनी अचानक पोलिसांवर दगडफेक सुरू केली. यावेळी अंमलदार अमित मेहरे यांच्या अंगावर दगड लागल्याने त्यांना किरकोळ दुखापत झाली आहे.

## थोडक्यात

### तस्करीची वाळू जप्त

**भिवापूर :** भिवापूर पोलिसांनी धडक कारवाई करत तस्करीची वाळू जप्त केली. ही कारवाई शनिवारी करण्यात आली. अवैध आणि विनापरवाना वाळूची चोरटी वाहतूक सुरू असल्याच्या माहितीच्या आधारे पोलिसांनी नाकाबंदी केली यावेळी संशयित सोळा चाकी टिप्पर थांबवण्यात आला. तपासणीत वाहनात वाळू आढळून आली. वाहनचालक दीपक रामचंद्र दळवी याच्याकडे कोणताही परवाना आढळून आला नाही पोलिसांनी पंचनामा करून १.५ ब्रास वाळू (किंमत ६० हजार) आणि टिप्पर वाहन (किंमत ५० लाख) असा एकूण ५० लाख ६० हजार किमतीचा मुद्देमाल जप्त केला. कारवाईत चालक आणि वाहन मालक गणेश शाहू (काटोल नाका, नागपूर) या दोन्ही आरोपींविरुद्ध भारतीय दंड संहिता कलम ३०३(२), महाराष्ट्र जमीन महसूल संहिता कलम ४८(७), ४८(८), खाण व खनिज अधिनियम कलम ४, २१, सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंधक अधिनियम कलम ३, आणि पर्यावरण संरक्षण अधिनियम कलम १५ अंतर्गत गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली.

### रानभाजी महोत्सव आज

**नागपूर :** आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय नागपूरच्या वतीने रानभाजी, रानफळे, वनऔषधे तसेच अन्नधान्य आणि आदिवासी बांधवांच्या शबरी नॅचरल बँन्डच्या प्रिमीयम उत्पादनांची विक्री करुन रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी रानभाजी महोत्सवाचे २२ जुलै रोजी आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवाचे आयोजन प्रकल्प कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, आदिवासी विकास भवन नागपूर, अमरावती रोड, गिरीपेठ, येथे दिनांक २२ जुलै रोजी मंगळवार वेळ दुपारी २ ते ५ पर्यंत आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांनी मेळाव्याला उपस्थिती द्यावी असे आवाहन प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नागपूर यांनी केले आहे.

## नागपूर जिल्ह्यात 'स्टॉप डायरिया' विशेष मोहीम

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २१ :** पावसाळा कालावधीत दूषित पाण्यामुळे डायरियासह अन्य जलजन्य आजारांची शक्यता लक्षात घेत नागपूर जिल्ह्यात 'स्टॉप डायरिया' ही विशेष मोहीम सुरू करण्यात आली आहे. ही मोहीम ३० जुलै २०२५ या कालावधीत टप्प्याटप्प्याने राबविण्यात येणार आहे. दरम्यान, या मोहिमेची अंमलबजावणी जिल्हा परिषद सीईओ विनायक महामुनी यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहे.

'स्वच्छ गाव, शुद्ध जल, बेहतर कल' या ब्रीदवाक्याखाली 'स्टॉप डायरिया' मोहीम राबविण्यात येत आहे. जिल्हा परिषद आणि आरोग्य विभाग यांच्या संयुक्त सहभागातून आरोग्य केंद्रे, शाळा, अंगणवाड्यांसह सरकारी कार्यालयांमधील पिण्याच्या पाण्याची तपासणी करण्यात येत आहे. दूषित पाण्याचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविले जाणार असून, पाणी व्यवस्थापन, स्वच्छता आणि आरोग्यासंबंधी स्थानिक नागरिक, स्वयंसेवी संस्था आणि शासकीय कर्मचा०यांना प्रशिक्षणाची सुविधा मिळणार आहे. याशिवाय गावपातळीवर पाणी समित्या बळकट करून पाण्याच्या स्रोतांची निगा राखली जाणार आहे. पावसाचे पाणी संकलन, कूपनलिकेची तपासणी, वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छतेसंदर्भातील जनजागृतीसह उघड्यावर शौचास प्रतिबंध यावर भर देण्यात येईल. नागरिकांनी 'स्टॉप डायरिया' मोहिमेत उत्साहाने सहभाग नोंदवावा, असे आवाहन जल जीवन मिशनचे प्रकल्प संचालक कुणाल उंदीरवाडे यांनी केले आहे.

## शैक्षणिक विकासात आमूलाग्र बदल, येणार 'एआय मोबाईल लॅब'

### मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचा पुढाकार, आठ कोटींचा प्रस्ताव सादर

**नागपूर, दि. २१ :** जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने जिल्हा नियोजन समितीकडे आठ कोटींच्या एआय (आर्टिफिशियल इंटेलिजेंस) मोबाईल लॅबसाठी निधीची मागणी केली आहे. या प्रस्तावाला पुणे येथून तांत्रिक मान्यता मिळाली असून, निधीला मंजुरी मिळाल्यास जिल्ह्याच्या शैक्षणिक विकासात आमूलाग्र बदल होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) विनायक महामुनी यांनी जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे शिक्षण




उपलब्ध करून देण्यासाठी एक महत्त्वाकांक्षी पाऊल उचलले आहे. विद्यार्थ्यांना एआय तंत्रज्ञानाशी संलग्न करीत शिक्षणाचा दर्जावाढ करण्यास प्राधान्य देण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना एआय तंत्रज्ञान आधारित शिक्षण देण्यासाठी दोन सुसज्ज वाहने असतील. एआयसंबंधी यंत्रणा असलेली मोबाईल लॅब १३ तालुक्यांतील जिल्हा परिषद शाळांना भेट देतील. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर आणि कौशल्याची ओळख या उपक्रमातून देण्यात येणार आहे

**लवकरच कार्यान्वित**

सदर प्रस्तावाला पुणे येथून तांत्रिक मान्यता मिळाली असून, जिल्हा नियोजन विभागाकडून निधीला मंजुरी मिळाल्यास ही योजना लवकरच कार्यान्वित होण्याची शक्यता आहे. जिल्हा परिषदेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचे शिक्षण मिळून भविष्यातील आव्हानांसाठी अधिक चांगल्या प्रकारे तयार होऊ शकतील, असा दावा करण्यात येत आहे.

## CAPTION मेट्रो विस्तार...



**नागपूर : आजच्या घडीला नागपूर शहराच्या चारही दिशांना मेट्रो ट्रेन धावत आहे दररोज हजारो प्रवाशी प्रवास करत असून, यात विद्यार्थ्यांचा अधिक भरणा आहे आता हीच मेट्रो खापरीपासून पंचतारांकित बुटीबोरी एमआयडीसी क्षेत्राला जोडण्यात येत आहे येथील कामे प्रगतीपथावर असल्याचे दिसून येत आहेत.**

## निधन

### प्रकाश नेरकर यांचे निधन

**नागपूर :** सरस्वतीनगर येथील



रहिवाशी प्रकाश राजहंस नेरकर यांचे हृदयघाताने निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ६३ वर्षं होते. त्यांच्या पार्थिवावर सोमवारी (२१ जुलै) मानेवाडा घाटावर अंतिम संस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा शुभम आणि मोठा आप्तपरिवार आहे.

## गावठी दारूप्रकरणी गुन्हे दाखल

**कुही, दि. २१ :** कुही पोलिसांनी रविवारी पारधी बेडामध्ये अवैध मोहफुल गावठी दारू काढणा०यांवर पाच पथकांच्या मदतीने एकाच वेळी कारवाई केली. अवैध मोहफूल गावठी दारू काढणा०या पाच महिला आरोपींच्या ताब्यातून ५२ ड्रममध्ये एकूण ५,२०० लिटर मोहफुल सडवा (किंमत १ लाख ८२ हजार आणि प्लास्टिक ड्रम (किंमत १०,४०० रुपये) असा एकूण १ लाख ९२ हजार ४००/- किमतीचा मुद्देमाल जप्त केला. तसेच, पंचनामा करून मुद्देमालाची नष्ट करण्याची कारवाई करण्यात आली. महिला आरोपींविरुद्ध कुही पोलिस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम ६५ (ई)(फ) अंतर्गत पाच गुन्हे दाखल करण्यात आले.

## कोम्बिंग ऑपरेशन, हद्दपार आरोपीला अटक

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**कन्हान, दि. २१ :** कन्हान उपविभागाचे उपविभागीय पोलिस अधिकारी संतोष गायकवाड यांनी १९ जुलैच्या रात्री ११ वाजेपासून २० जुलै २०२५ रोजी पहाटे ५ वाजेपर्यंतच्या गस्तीदरम्यान रेकॉर्डवरील गुन्हेगार, कारागृहातून सुटलेले कैदी, निगराणीखालील बदमाश, अवैध दारू विक्रेत्यांची तपासणी केली. तसेच, त्यांच्या घरांची साक्षीदारांच्या उपस्थितीत झडती घेण्यात आली. याशिवाय नाकाबंदी करून संशयित वाहनांची तपासणी करण्यात आली.

पोलिस अधिकारी संतोष गायकवाड यांच्या नेतृत्वात शिवनगर, फुकटनगर, शिवाजी नगर, धर्मनगर पिंपरी, सुपर टाऊन,



संताजी नगर परिसरांमध्ये पायी गस्त घालून कोम्बिंग ऑपरेशन राबवण्यात आले. यावेळी कन्हान ठाण्याचे अधिकारी, अंमलदार आणि दंगल नियंत्रण पथकाचे अंमलदार उपस्थित होते. गस्तीदरम्यान नागपूर जिल्ह्यातून हद्दपार केलेला अविनाश (लांगडा) सुखचंद सहारे (तुकाराम नगर, कन्हान) हा आढळून आला. हद्दपारीच्या आदेशाचे उल्लंघन केल्याबद्दल त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलिस अधिनियम कलम १४२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

## 'गोंडवाना एक्सप्रेस'मधून सात किलो गांजा जप्त

### महिला आरोपीला अटक, नागपूर रेल्वे पोलिसांची मोठी कारवाई

**नागपूर, दि. २१ :** मध्यवर्ती रेल्वेस्थानकात गोंडवाना एक्स्प्रेसची सुरक्षा तपासणी सुरू असताना गांजाची मोठी खेप रेल्वे पोलिसांच्या हाती लागली याप्रकरणी सुकना अवधेश मेहरा ( होशंगाबाद मध्य प्रदेश) हिला अटक करण्यात आली आरोपीच्या ताब्यातून १.१४ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. न्यायालयाने तिला दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

माहितीनुसार, गोंडवाना एक्सप्रेस नागपूर रेल्वे स्थानकात थांबताच पोलिस पथकाला तपासणीत कोच बी-३ मधील २८ क्रमांकाच्या बर्थखाली एक ट्रॉली बॅग बेवारस स्थितीत आढळली. बॅगसंदर्भात विचारपूस केली असता त्याबाबत कुणीही माहिती दिली नाही. त्यामुळे बॉम्बशोध व नाशक पथकाला




### गरिबीचा घेतला जातो फायदा

**ओडिशा आणि विशाखापट्टणम् येथील जंगलात गांजाची शेती करण्यात येत असल्याची माहिती आहे. मध्य प्रदेशातील काही भागातूनही तस्करी होते. अशा ठिकाणाहून देशभरात गांजा पोहोचविण्यासाठी अत्यंत गरीब, गरजू पुरुष वा महिलांना हेरून त्यांचा वापर करण्यात येतो. नेमून दिलेल्या दुसऱ्या ठिकाणी माल पोहोचविण्याची जबाबदारी त्यांच्यावर जबाबदारी असते. या बदल्यात अत्यंत कमी अर्थात तीन हजार रुपयांपर्यंतची रक्कम हाती टिकवण्यात येते.**

पाचारण करण्यात आले. तपासणीत काहीही न आढळल्याने पुन्हा चौकशी सुरू असताना बर्थ क्रमांक ३२ वरील महिलेची संशयास्पद हालचाल पाहून तिची चौकशी केली असता तिने घाबरून सत्य पोलिसांना सांगितले. कारवाईतशबनम बॅग, ट्रॉली बॅगमध्ये सेलोटेपने बांधलेला सात किलो गांजा, आधारकार्ड, रेल्वे तिकीट, मोबाईल असा एकूण एक लाख १४ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल आरोपी सुकनाजवळून जप्त करण्यात आला. ही कारवाई पोलिस अधीक्षक मंगेश शिंदे, अपर पोलिस अधीक्षक दत्ताराम राठोड, उपविभागीय अधिकारी पांडुरंग सोनवणे यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक गौरव गावंडे, सपोनि नीलम डोंगरे, पोलिस हवालदार संजय पटले, मजहर अली, शबाना पठाण, ममता तिवारी, मंजूषा खांडेकर, अविन गजबे, राहुल यावले, स्थानिक गुन्हे शाखा पथकाचे चंद्रशेखर मदनकर, बीडीडीएसचे हवालदार दीपक डोर्लीकर जयश्री प्रधान, गजानन शेळके, श्वान योद्धा आणि मलोटे यांनी केली.

## पावसाने दांडी मारल्याने वातावरणातील उकाडा वाढला

### पिकांना पाण्याची गरज, शेतकरी चिंतेत; हवामान विभागाकडून 'यलो अलर्ट' जारी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २१ : सध्या पावसाने दांडी मारल्याने वातावरणातील उकाडा वाढला असून, कडाक्याच्या उन्हामुळे छत्री डोक्यावर घेणे भाग आहे. दुसरीकडे शेतातील पिकांनाही पावसाची प्रतीक्षा सोसावी लागत आहे. दरम्यान, मागील गुरुवारी उत्तर नागपुरात तासभराच्या पावसाने चांगलीच दाणादाण उडवली होती.**

सध्या नागपूर शहर आणि जिल्ह्याच्या ढगाळ वातावरणात प्रचंड उकाडा वाढला आहे. घरातील कूलर पुन्हा सुरू झाले असून, उन्ह सुद्धा कडाक्याचे आहे. रविवारी कमाल तापमान ३२.८ अंश सेल्सिअस आणि किमान अर्थात कमीत कमी तापमान २६.२ अंश सेल्सिअस इतके होते शनिवारी सकाळच्या वेळी कमी दृष्यतामानामुळे इंडिगोच्या बंगळुरू-नागपूर विमानाला १५ ते २० मिनिटांपर्यंत आकाशात घिरट्या घालाव्या लागल्या होत्या.

**शेतकरी चिंतेत**

दुसरीकडे शेतातील पिकांनाची निंदणी,



डवरणीची कामे सुरू असली तरी त्यांनाही पावसाची प्रतीक्षा आहे. उन्हामुळे कोवळी पिके पिवळी पडण्याची भीती व्यक्त होत आहे. दरम्यान, हवामान विभागाने २१ ते २४ जुलै दरम्यान विदर्भात जोरदार पावसाचा इशारा दिला आहे. पुढील दोन दिवस किरकोळ तर गुरुवारी दमदार पावसाची शक्यता आहे.नागपूरसह चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, अकोला, अमरावती, बुलढाणा, वाशिम, वर्धा, यवतमाळ जिल्ह्यांत विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता वर्तविली असून, यलो अलर्टही जारी केला आहे.

### शेतशिवारात सावध असावे

**मागील काही दिवसांत शहरासह ग्रामीण भागात आकाशातील वीज कोसळण्याच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार मुसळधार पावसासह विजेचा कडकडाट आणि कोसळण्याची शक्यता असल्याने शेत शिवारात असलेले शेतकरी, शेतमजूर या सर्वांनी सावध राहावे. स्वतःच्या सुरक्षेसाठी आवश्यक काळजी घ्यावी. पाऊस सुरू असताना विजेच्या कडकडाटात झाडाखाली आश्रय घेऊ नये, असा सल्ला जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आला आहे.**

### 'यलो अलर्ट'

**भारतीय हवामान विभागाने (आयएमडी) नागपूर आणि संपूर्ण विदर्भ विभागासाठी २१ ते २४ जुलै २०२५ या कालावधीसाठी जोरदार पावसाचा 'यलो अलर्ट' जारी केला आहे. सध्याची हवामान स्थिती जोरदार पावसासाठी अनुकूल असल्याचे म्हटले आहे. मंगळवारी (२२ जुलै) आकाश सामान्यत: ढगाळ राहणार असून, मध्यम पाऊस पडेल. येत्या बुधवारी आकाश सामान्यत: ढगाळ राहण्यासोबतच काही ठिकाणी सामान्य किंवा वादळासह पाऊस पडेल. विजांच्या कडकडाटासह सोसाट्याच्या वाऱ्याचा वेग ३०-४० किमी प्रतितास राहू शकते.**

## बार आणि रेस्टॉरंटवर धडक कारवाई

### पोलिसांची 'ऑपरेशन थंडर' अंतर्गत मोहीम

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २१ :** येथील पोलिसांनी 'ऑपरेशन थंडर'अंतर्गत रविवारी पहाटे शहरातील बार आणि रेस्टॉरंट्सवर धडक कारवाई केली. वेळेचे उल्लंघन करून पहाटेपर्यंत सुरू असलेल्या आस्थापनांवर गुन्हे दाखल करण्यात आल्याने, व्यावसायिकांचे धाबे दणाणले आहेत.

या कारवाईत, धरमपेठ येथील बॅरल कॅफे, लाहौरी बार आणि मार्टिनी लाऊंज हे पहाटे चार वाजेपर्यंत सुरू असल्याचे आढळले. पोलिसांनी त्यांच्यावर महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये कारवाई केली. "नियमांचे उल्लंघन करून कायदा-सुव्यवस्थेला धोका निर्माण करणाऱ्यांची गय केली जाणार नाही," असा सक्त इशारा पोलीस आयुक्त रवींद्र कुमार सिंगल यांनी दिला आहे. त्यांनी नागरिकांनाही आवाहन केले की, बेकायदेशीरपणे सुरू असलेल्या आस्थापनांची माहिती पोलिसांना द्यावी. 'ऑपरेशन थंडर'अंतर्गत ही कारवाई वर्षभर सुरू राहणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या कारवाईमुळे शहरातील अवैध व्यवसायांना आळा बसण्यास मदत होणार आहे.

अजिंक्य भारत

# आपलं अकोला

अकोला, मंगळवार, दि. २२ जुलै २०२५

## थोडक्यात

### कासली खुर्द गावाला पुराचा धोका; प्रशासनाची पाहणी मोहीम



**अकोला :** कासली खुर्द गावाला लागूनच वाहणाऱ्या गोमणी नाल्याला मोठ्या प्रमाणात पाणी आल्यास गावाला पुराचा धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याची तक्रार ग्रामस्थ इंगळे यांनी तहसीलदारांकडे केली होती. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तत्काळ दखल घेत मंडळ अधिकारी ताळे , पटवारी राहूत आणि ग्रामसेवक सुरज मोरे यांनी घटनास्थळी जाऊन नाल्याची व परिसराची पाहणी केली. नाल्याचे पाणी वाढल्यास ते गावात शिरण्याची शक्यता असल्याने ग्रामस्थांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. प्रशासनाने याबाबत योग्य त्या उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही ग्रामस्थांनी केली आहे.

### अपहरण प्रकरणातील अल्पवयीन पीडितेची सुटका

**अकोला:** अपहरण प्रकरणात पोलिसांनी महत्त्वाची कारवाई करत पीडित अल्पवयीन मुलीचा यशस्वी शोध घेतला आहे. सदर पीडितेला हिंगोली जिल्ह्यातील हट्टा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ग्राम करंजी येथून शोधून काढण्यात आले. ही कारवाई पोलीस अधीक्षक अकोला अर्चित चांडक व शहर पोलीस उपअधीक्षक सतीश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. तपास अधिकारी पोलीस निरीक्षक शिरीष खंडारे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक फौजदार श्याम शर्मा, पोलीस कॉन्स्टेबल सादिक सय्यद व महिला पोलीस कर्मचारी कांचन उइके यांनी संयुक्तरीत्या ही कारवाई केली. सदर पीडितेला करंजी येथून ताब्यात घेऊन अकोला येथे गायत्री बालिका गृह या संरक्षण केंद्रात ठेवण्यात आले असून, तिच्या सुरक्षेची सर्व काळजी घेतली जात आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहायक फौजदार श्याम शर्मा करीत आहेत. अल्पवयीन मुलींच्या अपहरणाच्या घटनांवर अटकाव करण्यासाठी पोलीस प्रशासन अत्यंत संवेदनशीलतेने व तत्परतेने कारवाई करीत असून, या कारवाईमुळे पोलीस प्रशासनावर जनतेचा विश्वास अधिक दृढ झालेला आहे.

### काळे हॉस्पिटलमध्ये चोरी; १० हजारांची रोकड घेऊन फरार

**अकोला :** शहरातील सिव्हिल लाइन्स भागात असलेल्या भागवत प्लॉटमधील काळे हॉस्पिटलमध्ये १७ जुलै रोजी सकाळी चोरीची घटना घडली. एक अज्ञात चोरटा हॉस्पिटलच्या मेडिकल काउंटरमध्ये घुसून १०हजार रुपयांची रोकड लंपास करीत पोबारा झाला. या प्रकरणी सिव्हिल लाइन्स पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, १७ जुलै रोजी सकाळी ७.५५ वाजता अज्ञात चोरट्याने मेडिकलचे शटर उघडून आत प्रवेश केला. त्याने काउंटरमधील रोख रक्कम लांबविली व त्यानंतर डॉक्टरांच्या कॅबिनमध्येही चोरीचा प्रयत्न केला; मात्र तिथे काही न सापडल्याने चोरट्याने ८.०५ वाजता सिल्व्हर रंगाच्या स्कुटीवरून घटनास्थळावरून पलायन केले. चोरीची संपूर्ण घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून, पोलिसांकडून चोरट्याचा तपास सुरू आहे. या प्रकरणात अज्ञात आरोपीविरुद्ध चोरीचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सिव्हिल लाइन्स पोलीस पुढील तपास करीत आहेत.

# मुदतबाह्य कीटकनाशके नवीन बॉटलमध्ये भरणाऱ्या कंपनीवर भरारी पथकाची धाड

## २१ लाखाचा मुदतबाह्य साठा विक्री बंद करण्याचे आदेश

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. २१ :** जुने मुदतबाह्य कीटकनाशके नवीन बॉटलमध्ये भरून विक्री करण्याचा गोरखधंद्यावर कृषी विभागाच्या भरारी पथकाने छापा टाकून संबंधित कंपनीवर कारवाई करण्यात आली आहे. या छाप्यात २१ लाख ९५ हजार २८० रुपये किंमतीचा मुदतबाह्य साठा विक्री बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

अकोला स्थित व्ही. जे. क्रॉप सायन्सस प्रायव्हेट लिमिटेड कंपनी या कीटकनाशके उत्पादक कंपनीच्या गोडाऊन मध्ये जुने मुदतबाह्य कीटकनाशकांच्या बॉटल फोडून त्यामधील कीटकनाशक नवीन बॉटल मध्ये टाकणे, त्याचे वजन करणे व त्यावर नवीन बॅच क्रमांक व उत्पादन दिनांक असलेले स्टिकर लावणे सुरू असल्याची गुप्त माहिती कृषी विभागाच्या भरारी पथकाला मिळाली. यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शंकर किरवे यांच्या उपस्थितीत अकोला जिल्हा भरारी पथक प्रमुख तथा जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी डॉ.

तुषार जाधव, भरारी पथक सदस्य जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक सतीश दांडगे, कृषी अधिकारी (गुणनियंत्रण) सुधाकर खंडारे, राहुल सिरसाठ, कैलास राठोड, गौरव राऊत यांच्या पथकाने सदर गोडाऊनवर धाड टाकली. सदर कंपनीचे कर्मचारी व मजूर यांच्या मार्फत जुन्या मुदत बाह्य कीटकनाशके बॉटल फोडून त्यामधील कीटकनाशक नवीन बॉटल मध्ये टाकणे, त्याचे वजन करणे व त्याावर नवीन बॅच क्रमांक व उत्पादन दिनांक असलेले स्टिकर लावणे हे कामकाज सुरू होते. या प्रकरणात कीटकनाशके कायदा १९६८ व नियम १९७१ नुसार उत्पादन स्थळी उपलब्ध मुदतबाह्य साठा रक्कम रु. २१,९५,२८० इतक्या साठ्यास विक्री बंद आदेश देण्यात आला असून उत्पादन स्थळावरून ८ कीटकनाशके नमुने घेण्यात आले आहेत. या प्रकरणात कृषी अधिकारी सुधाकर खंडारे यांनी पोलिस स्टेशन अकोला येथे तक्रार दाखल केली असून संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## १४ वर्षांपासूनची नागरी वसाहत टाकली ग्रीन झोनमध्ये

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. २१ :** स्थानिक कौलखेड संत नगरी तीन मध्ये गेल्या १४ वर्षांपासून राहणाऱ्या नागरिकांचा परिसर अचानक ग्रीन झोनमध्ये गेल्याने नागरीक संतापले असून त्यांनी या प्रकरणी निवेदन पाठवून थेट मुख्यमंत्री देंवेद्र फडणवीस यांना जाब विचारला आहे.

संतनगरीतील नागरीकांनी बांधकामाची रीतसर परवानगी महापालिकेच्या कार्यालयाकडून घेतली आहे मात्र, अचानक या परिसराला ग्रीन झोनमध्ये टाकल्या गेले असून या लेआऊटच्या आजूबाजूचा प्लॉट न घेता केवळ मधातला भाग हा ग्रीन झोनमध्ये टाकल्यामुळे पक्के बांधकाम करून राहत असलेले रहिवासी कमालीचे घाबरून गेले आहेत. या संदर्भात प्रभाग क्रमांक १९ चे माजी नगरसेवक तसेच महापालिकेचे अधिकारी यांच्याशी बोलणे झाले. हा निर्णय घेताना कोणत्याही रहिवाशाला नोटीस मिळाली नाही. हा भाग अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघाचा भाग आहे. गेल्या १० ते १५ वषापासून १०० ते १५० घरांत कुटुंबीय राहत आहेत. अजून पर्यंत पक्का रस्ता नाही. हा परिसर ग्रीन झोनमध्ये टाकल्या गेल्याने स्थानिक रहिवासी घाबरले आहेत. यासंदर्भात नागरिकांनी भाजपा आमदार वसंत खंडेलवाल यांना निवेदन दिले असून समस्या सोडविण्याची विनंती केली आहे. आता मुख्यमंत्री याप्रकरणी काय लक्ष देतात, याकडे परिसरातील नागरीकांचे लक्ष लागून आहे.

## छावा संघटनेचे पदाधिकारी आक्रमक

### सुरज चव्हाण यांच्यासह गुंडांच्या विरोधात कठोर कारवाईची मागणी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २१ :** लातूर येथे शेतकऱ्यांच्या प्रश्नावर निवेदन दिल्यानंतर अखिल भारतीय छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांवर हल्ला झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकारामुळे संघटनेच्या कार्यकर्त्यांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली असून, या प्रकरणी अजित पवार गटाचे पदाधिकारी सुरज चव्हाण व त्यांच्या गुंडांविरोधात कठोर कारवाईची मागणी करण्यात आली आहे.

संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजय गाडगे पाटील यांनी राज्य सरकारच्या शेतकरी धोरणाविरोधात लातूर येथे निवेदन दिले होते. त्यामध्ये त्यांनी ''राज्याचे कृषिमंत्री संसदेमध्ये ताशपत्ता खेळतात, शेतकऱ्यांच्या समस्यांकडे दुर्लक्ष करतात'' असा आरोप केला होता. यानंतर, सुरज चव्हाण याने आपल्या समर्थकांसह छावा कार्यकर्त्यांवर हल्ला चढवला, असा दावा संघटनेने केला आहे.

या घटनेविरोधात अखिल भारतीय छावा संघटना, अकोला जिल्ह्याच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन सादर करण्यात आले. जिल्हाध्यक्ष रणजित काळे, उपाध्यक्ष सुधाकर पाटील आदी पदाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आलेल्या या निवेदनात, सुरज चव्हाण व त्यांच्या गुंडांवर तात्काळ गुन्हे दाखल करावेत तसेच त्यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून हकालपट्टी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, छावा कार्यकर्त्यांवर झालेल्या या हल्ल्यामुळे संतप्त प्रतिक्रिया उमटत असून, प्रशासनाने तात्काळ आणि कठोर पावले उचलावीत, अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशाराही संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

## येरे येरे पावसा...



**अकोला : शहरातच नव्हे तर जिल्ह्यात सुद्धा पावसाने गत १५ दिवसांपासून दडी मारल्याने वातावरणात मोठा बदल झाला असून उन्हामुळे जीवाची लाही-लाही होत आहे. एकाएकी पावसाने दडी मारली असून, ग्रामीण भागातील पिकावरसुद्धा मोठा परिणाम होत आहे. ढग येते पण पाऊस पडत नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली असून, शेतकऱ्याचेच नव्हे तर जनसामान्य जनतेचे डोळे आभाळाकडे लागले आहेत.** (छाया. संजय ताथुरकर)

# मान्यतांच्या प्रक्रियेला विलंब नको

## कामे खोळंबल्यास कारवाई करू: जिल्हाधिकारी अजित कुंभार यांचे निर्देश

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**अकोला, दि. २१ :** जलयुक्त शिवार योजनेतील नियोजित कामांच्या मान्यता, निविदा ही प्रक्रिया पावसाळा संपण्यापूर्वीच पूर्ण करून घ्यावी व पावसाळ्यानंतर तत्काळ कामांना सुरूवात करावी. मान्यता-निविदांच्या प्रक्रियेला विलंब करून कामे खोळंबल्याचे निदर्शनास आल्यास जबाबदारी निश्चित करू, असा इशारा जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी आज येथे दिला.

जलयुक्त शिवार, जलसंधारण कामे, जलसाठ्यांची प्रगणना आदी विविध विषयांवरील बैठक जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नव्या इमारतीत तिसऱ्या मजल्यावरील सभागृहात झाली, त्यावेळी ते बोलत होते. जिल्हा जलसंधारण अधिकारी अमोल मस्कर, सचिनकुमार वानरे, भूजल सर्वेक्षण वरिष्ठ भूवैज्ञानिक संजय कराड, जीवन प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता नीलेश राठोड यांच्यासह विविध यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. कुंभार म्हणाले की, मान्यता, निविदा अशा प्रक्रियेत कामे अडकून राहू नयेत. अशा प्रक्रिया व नियोजित कामे वेळेत पूर्ण व्हावीत. जिल्ह्यात जलसंधारणाची अधिकाधिक कामे पूर्ण झाली पाहिजेत. त्यासाठी यंदा करावयाच्या कामांची प्रक्रिया सुरू करावी. तालुकास्तरीय बैठका व आवश्यक प्रक्रिया वेळेत पूर्ण करावी. जिओ पोर्टलवर कामे अपलोड करण्याचे कामही अनेक विभागांनी पूर्ण केले नाहीत. जि. प., कृषी विभाग यांचीही अनेक कामे अपलोड व्हावयाची आहेत. ही प्रक्रिया शुक्रवारपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिका-यांनी केले.

### स्वयंसेवी संस्थांच्या कामावर नाराजी

जलयुक्त शिवार योजनेत १५९ कामांच्या प्रशासकीय मान्यता झाल्या. त्याातील ११९ पूर्ण झाली आहेत. ११ कामे प्रगतीपथावर आहेत. त्यातील उर्वरित कामे आर्ट ऑफ लिव्हिंग या स्वयंसेवी संस्थेने पूर्ण न केल्याबद्दल नाराजी व्यक्त करण्यात आली. नाम फाऊंडेशननेही कामे पूर्ण न केल्याबद्दल नाराजी व्यक्त करण्यात आली.

## जुने शहरात विजेचा खेळखंडोबा

### महावितरणच्या मनमानी कारभारावर नागरिक संतप्त




दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २१ :** जुन्या शहरातील नागरिक गेल्या तीन दिवसांपासून महावितरणच्या मनमानी कारभाराचा बळी पडत आहेत. दिवस असो वा रात्र, वीजपुरवठा अनेक वेळा खंडित होत असून नागरिक हैराण झाले आहेत. दिवसा किमान चार वेळा १० ते २० मिनिटांसाठी वीज खंडित होते, तर रात्री ११ नंतरही अशाच प्रकारे चार वेळा वीज बंद होते. हा प्रकार महावितरणच्या नियोजनशून्य आणि भोंगळ कारभाराची साक्ष देत आहे.

कोणतेही शासकीय अथवा निमशासकीय कार्यालय नियमांच्या चौकटीत राहून जनतेला सेवा पुरवते. त्याचप्रमाणे महावितरणनेही ग्राहकांना वीजपुरवठा करताना नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. मात्र, नागरिकांना वीजपुरवठ्याशी संबंधित अधिकारांची माहिती नसल्यामुळे ते होणाऱ्या त्रासाविरुद्ध आवाज उठवू शकत नाहीत.

> वीज नियामक आयोगानुसार नागरिकांना त्रास होत असेल, तर त्यांनी महावितरणकडे लेखी स्वरूपात तक्रारी कराव्यात. त्यावर नियमानुसार कारवाई करण्यात येईल.
>
> **- हेमंत पावडे,** कार्यकारी अभियंता, शहर विभाग, महावितरण

ग्राहकांनी वेळेवर वीजबिल भरले नाही तर महावितरण व्याज आकारते किंव्हा वीजपुरवठा खंडित करते. मग वेळेवर सेवा न दिल्यास महावितरणने ग्राहकांना भरपाई का देऊ नये? असा संतप्त सवाल जुने शहरातील नागरिक उपस्थित करत आहेत. या मनमानीमुळे विद्यार्थ्यांचा अभ्यास, व्यापाऱ्यांचे व्यवहार आणि रुग्णांच्या गरजा यावर प्रतिकूल परिणाम होत असून संपूर्ण शहरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### सेवा वेळेत न दिल्यास भरपाईची तरतूद?

वीज नियामक आयोगाच्या नियमांनुसार, ग्राहकांना निश्चित वेळेत अखंड वीजसेवा देणे बंधनकारक आहे. काही अपवाद वगळता, वारंवार व विनाकारण होणारे वीजखंडन हे नियमभंग ठरतो. अशा वेळी ग्राहकांना भरपाई मिळण्याची तरतूद असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांद्वारे मिळाली आहे. मात्र, याची माहिती महावितरणकडून नागरिकांना का दिली जात नाही, हा सवाल उपस्थित होत आहे.

# नव्या वर्षात शहरात धावणार नव्या कोऱ्या ई-बसेस

## डिसेंबरपर्यंत होणार डेपो व चार्जिंग स्टेशनचे काम

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २१ : केंद्र शासनाच्या पीएम ई-बस सेवा योजने अंतर्गत अकोला शहरासाठी ४२ इलेक्ट्रिक बसेस मिळणार आहेत. त्यासाठी खडकी परिसरात इलेक्ट्रिक बससाठी डेपो व चार्जिंग स्टेशन उभारणीचे काम सुरू आहे. डिसेंबर २०२५ पर्यंत काम पूर्ण करण्याची अट कंत्राटदाराला घालण्यात आली असून पुढील नवीन वर्षात अकोलेकरांना नव्या कोऱ्या बस मिळणार आहेत.**



केंद्र शासनाकडून अकोला महापालिकेला ४२ इलेक्ट्रिक बसेस मिळणार असून त्यासाठी शहराच्या दक्षिण झोनमध्ये खडकी परिसरात ई- बस डेपो उभारण्याचे काम सुरू झाले आहे. या डेपोमध्ये चार्जिंग स्टेशनसह बसेसच्या देखभाल व दुरुस्तीसाठी व्यवस्था असणार आहे. इलेक्ट्रिक बसेसला डेपोत जाण्यासाठी ६२० मीटर लांब व १५ मीटर रुंद असलेला सिमेंट काँक्रीटचा प्रशस्त मार्ग बांधण्यात आला आहे.

यासाठी ५ कोटी रुपये खर्च करण्यात आला असून, यामध्ये पथदीप व्यवस्था व मार्गाच्या दोन्ही बाजूला पावसाचे पाणी वाहून नेण्यासाठी ड्रेनेजची व्यवस्था करण्यात आली आहे. डिसेंबर २०२५ पर्यंत बस डेपो व चार्जिंग स्टेशनचे काम पूर्ण करण्याची अट कंत्राटदाराला घालण्यात आली असून काम पूर्ण झाल्यानंतर ४२ इलेक्ट्रिक बसेस महापालिकेला मिळणार असल्याची माहिती शहर अभियंता नीला वंजारी यांनी दिली. बस डेपो व चार्जिंग स्टेशनचे काम पूर्ण झाल्यानंतर शहर बस वाहतुकीचा मार्ग निश्चित करण्यात येणार आहे. त्यानंतर बसेस धावणार आहेत.

### कामासाठी १७ कोटींचा खर्च

या प्रकल्पातील बांधकामासंबंधीचे कंत्राट कोठारी कन्स्ट्रक्शनला देण्यात आले आहे. इलेक्ट्रिक कामाचे कंत्राट मालेगाव येथील विनोद एजन्सीला देण्यात आले आहे. महापालिकेच्या मालकीच्या असलेल्या तीन एकर जागेत ई-बस डेपोचे काम करण्यात येत आहे. यासाठी १७ कोटींचा निधी खर्च केला जाणार आहे.

## आकाशात अद्भूत दृश्यांची मेजवानी

**अकोला :** आपण जरी पृथ्वीवर राहत असलो तरी तिच्या गतीविषयी फारच थोड्या लोकांना माहिती असते. पृथ्वीची परिक्रमण गती दर तासाला सुमारे १६६५ किमी असून सूर्याभोवती ती दर तासाला जवळपास १,०७,००० किमी वेगाने फिरते. ही गती काही मिलिसेकंदात सतत बदलत असते. हा अति सूक्ष्म बदल अंतराळ संशोधनासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरतो. भारतीय अंतराळ संशोधन क्षेत्रात महत्त्वपूर्ण पाऊल टाकत, अंतराळवीर शुभांशू शुक्ला यांनी इंटरनॅशनल स्पेस स्टेशनवर केवळ १७ दिवसांत ६० प्रयोग पूर्ण करत ऐतिहासिक कामगिरी बजावली आहे. त्यामुळे भारताच्या अंतराळ मोहिमांना अधिक वेग मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. दरम्यान, २१ ते २६ जुलै या सप्ताहात आकाशातील ग्रह-नक्षत्रांचे अद्वितीय संयोग पाहायला मिळणार आहेत.

अजिंक्य भारत

# आपलं वाशिम

मंगळवार, दि. २२ जुलै २०२५



## थोडक्यात

### युवकाचा विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न

**कारंजा :** शहरातील बायपास परिसरात १९ जुलै रोजी सकाळी साडेदहा वाजताच्या सुमारास एका २७ वर्षीय युवकाने विष प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. संबंधित युवक वडगाव (ता. कारंजा) येथील रहिवासी आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, बायपास परिसरात या युवकाने उंदीर मारण्यासाठी वापरले जाणारे विषारी औषध सेवन केले. ही घटना लक्षात येताच त्याला उपचारासाठी कारंजा उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु उपचारादरम्यान त्याची प्रकृती गंभीर असल्याने वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्याला पुढील उपचारासाठी अकोला येथे पाठविले.

### एकाच दिवशी दोघांना सर्पदंश: प्रकृती स्थिर

**कारंजा :** तालुक्यात १९ जुलै रोजी सकाळच्या वेगवेगळ्या सुमारास दोन ठिकाणी सर्पदंशाच्या घटना घडल्या असून, यामध्ये दोघे जखमी झाले आहेत. शेतात काम करताना साप चावल्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. चंद्रकांत दामोदर नेमाने (वय ६०, रा. पसरणी) हे शेतात काम करत असताना त्यांना सापाने दंश केला. त्यांना उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असून, उपचार सुरु आहेत.

### ‘स्वाभिमानी’कडून कृषी मंत्र्यांना पाठविले कीटकनाशक!

**वाशिम :** राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांचा विधानभवनात रमी खेळतानाचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर, कीटकनाशकाची बाटली पोस्टाद्वारा पाठवली असून, ‘‘हे किटकनाशक प्यावे किंवा तत्काळ राजीनामा द्यावा,’’ अशी संतप्त मागणी त्यांच्या वतीने करण्यात आली आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या युवक आघाडीने निषेध नोंदविला आहे. कृषीमंत्र्यांच्या आजवरच्या शेतकरी विरोधी वक्तव्याचा तीव्र निषेधही स्वाभीमानी शेतकरी संघटनेने केला आहे.

### १८ वर्षीय युवती काही न सांगता बेपत्ता

**मंगरूळपीर :** तालुक्यातील एका १८ वर्षीय युवती अचानक बेपत्ता झाल्याची तक्रार २० जुलै रोजी मंगरूळपीर पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. पोलिसांनी याप्रकरणी मिसिंगची नोंद घेतली असून, शोधकार्य सुरू आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ४० वर्षीय महिलेने मुलीच्या बेपत्ता होण्याची तक्रार दाखल केली आहे. २० जुलै रोजी जेवणासाठी बोलवण्यासाठी ती घराच्या स्लॅबवर गेली असता, मुलगी दिसली नाही. नंतर तिने घरात, परिसरात व नातेवाइकांकडे शोध घेतला, तसेच भ्रमणध्वनीद्वारे संपर्क साधला. मात्र, युवतीचा कुठेही थांगपत्ता लागला नाही. तक्रारीनुसार, युवती कोणालाही काही न सांगता घरातून निघून गेली असून, ती नेमकी कोठे गेली याबाबत कोणतीही माहिती मिळालेली नाही. याप्रकरणी पोलिसांनी गुन्ह्याचा तपास सुरू केला आहे.

### गॅस सिलिंडरचा अचानक भडका झाल्याने तरुण भाजला



**कारंजा :** शहरातील एका कॉलनीत १८ जुलै रोजी रात्री १०:३० वाजता स्वयंपाकाच्या गॅस सिलिंडरचा अचानक भडका झाल्याने २० वर्षीय तरुण गंभीररीत्या भाजला. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, तरुण घरी असताना गॅस सिलिंडरचा स्फोट झाला. त्या दुर्घटनेत तो भाजला असून, त्याला तत्काळ कारंजा उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. रुग्णालयात तातडीने उपचार सुरू करण्यात आले. कर्तव्यावरील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या यशस्वी उपचारांमुळे त्याची प्रकृती स्थिर झाली असून, त्याला उपचारानंतर घरी सोडण्यात आले.

# एसटीच्या स्मार्टकार्ड योजनेला ब्रेक

## मुदत संपलेल्या स्मार्टकार्डचे नूतनीकरण ठप्प

### प्रवाशांना जुन्याच कागदी ओळखपत्रांचा आधार

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. २१ :** एसटी महामंडळाने मोठा दिखावा करीत कागदी ओळखपत्राच्या जागी प्रवाशांना स्मार्टकार्ड देण्याची योजना सुरू केली. परंतु, ही योजना बारगळी असून तयार केलेले असंख्य स्मार्टकार्ड जिल्ह्यातील एसटी बस आगारातील आरक्षण कक्षात धुळखात पडून आहेत. त्यामुळे स्मार्टकार्ड योजना बंद पडली असून आता जुन्याच कागदी ओळखपत्राचा आधार घेत प्रवाशांना प्रवास करावा लागत आहे.

ज्येष्ठ नागरिकांना तहसील कार्यालयातून मिळणाऱ्या ज्येष्ठ नागरिक दाखल्याच्या आधारे एसटीची सवलत मिळते. त्याचबरोबर शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना एसटीची सवलत दिली जाते. तसेच, नियमीत प्रवास करणाऱ्या प्रवाशांसह सात दिवस, चौदा दिवस कुठेही प्रवास योजनेसाठी देखील एसटीचे पास मिळतात. मात्र, लाभार्थ्यांना मिळणारे सवलत पास हे कागदी स्वरूपात असल्यामुळे ते पावसाळ्यात भिजून खराब होण्याबरोबरच गहाळ होण्याची भीती निर्माण झाली होती. त्यामुळे नऊ वर्षांपूर्वी एसटी महामंडळाने स्मार्टकार्ड योजना सूरू केली. त्यानंतर जिल्ह्यातील प्रत्येक स्थानकातील आरक्षण कक्षात स्मार्टकार्ड देण्याची व्यवस्था करण्यात आली. एटीएमसारखे अद्ययावत असे स्मार्टकार्ड पास व ओळखपत्र म्हणून हाताळताना प्रवाशांनाही आनंद वाटत होता. एसटीच्या स्मार्टकार्डच्या आधारे ज्येष्ठ नागरिकांना प्रवास करण्याची सुविधा उपलब्ध झाली. तसेच, एसटीतून प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांसह अन्य पासधारक प्रवाशांनादेखील स्मार्टकार्ड देण्यास सुरुवात केली. मात्र, गेल्या दोन वर्षांपासून स्मार्टकार्ड योजनाच बंद पडली आहे. ज्या कंपनीकडून स्मार्टकार्ड दिले जात होते, त्या कंपनीला परवडत नसल्याने त्यांनी हे काम थांबविल्याची चर्चा एसटी महामंडळात सुरू आहे. त्यामुळे एसटीची स्मार्टकार्ड योजना बारगळी असल्याचे दिसून येत आहे.



२०१६ पासून स्मार्ट कार्ड योजना सुरु झाली. एटीएम कार्डसारखे अद्ययावयत असे स्मार्टकार्ड विद्यार्थ्यांसह ज्येष्ठ नागरिक व अन्य पासधारकांचे 'स्मार्ट' ओळखपत्र बनले. ते ओळखपत्र स्कॅन केल्यावर नोंदणी मशीनमध्ये केली जात होती. ज्या कंपनीला स्मार्टकार्ड तयार करण्याचे काम दिले होते, त्याच कंपनीने तांत्रिक कामांमध्ये बिघाड असल्याचे कारण पुढे केले आहे. सर्व्हरची समस्या निर्माण झाल्याने ज्येष्ठ नागरिकांना व विद्यार्थ्यांना नव्याने स्मार्टकार्ड काढण्यापासून मुदत संपलेल्या स्मार्टकार्डचे नुतनीकरणही करणे थांबल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे एसटीतून प्रवास करताना प्रवाशांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. ज्येष्ठ नागरिकांना आता आधार कार्डच्या व विद्याथ्यर्थ्यांना कागदी पासच्या भरोवश्यावरच प्रवास करावा लागत आहे.

**स्मार्टकार्ड योजना शासनाची आहे. गेल्या दोन वर्षांपासून ही योजना बंद झाली आहे. प्रवाशांसह विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये, यासाठी ज्येष्ठ नागरिकांना आधार कार्डद्वारे एसटीतून प्रवास करण्याची व्यवस्था केली आहे. सध्या जुन्याच पद्धतीने कामकाज करण्याच्या सूचना आहेत. त्यानुसार कामकाज सुरू आहे. स्मार्टकार्ड का बंद आहेत, याची माहिती अद्याप वरिष्ठ पातळीवर मिळालेली नाही. अशी माहिती आगार प्रमुखांनी दिली आहे.**

## घंटागाड्या बंद: शहरातील कचरा संकलनावर परिणाम



### कंत्राटी कामगारांचे कामबंद आंदोलन सुरू

**वाशिम :** मुख्याधिकाऱ्यांनी लेखी आश्वासन दिल्यानंतरही किमान वेतन लागू न केल्याने नाराज झालेल्या वाशिम नगरपरिषदेतील कंत्राटी कामगारांनी २० जुलैपासून पुन्हा कामबंद आंदोलन सुरू केलं आहे. या कामगारांमध्ये घंटागाडीसह कचरा उचलणारे कर्मचारी मोठ्या प्रमाणावर आहेत, त्यामुळे शहरातील कचरा संकलनाचे काम ठप्प झाले आहे. यापूर्वी दि. ५ जून २०२५ रोजी किमान वेतनाच्या मागणीसाठी बेमुदत संप सुरू करण्यात आला होता. त्यानंतर ११ जून रोजी सरकारी कामगार अधिकारी यांच्या उपस्थितीत झालेल्या चर्चेत मुख्याधिकारी यांनी किमान वेतन लागू करण्याचे लेखी आश्वासन दिल्याने कामगारांनी आंदोलन तात्पुरते मागे घेतले होते. मात्र, प्रत्यक्षात कोणतेही सुधारित कंत्राट निघाले नाही आणि जुन्याच दराने काम सुरू ठेवण्याचा आग्रह ठेवल्यामुळे कामगारांनी फसवणुकीचा आरोप करत पुन्हा संपाचा मार्ग स्वीकारला आहे. ‘‘जोपर्यंत शासन निर्णयानुसार किमान वेतन लागू करून कंत्राटी अटी निश्चित केल्या जात नाहीत, तोपर्यंत कामावर परतणार नाही,’’ असा ठाम पवित्रा कामगारांनी घेतला आहे. दरम्यान, आंदोलनबाबतचे निवेदन जिल्हाधिकारी कार्यालय, पोलिस प्रशासन व इतर विभागांना देण्यात आले आहे. प्रशासन यावर काय तोडगा काढते, याकडे लक्ष लागले आहे.

#### कंत्राटदाराचा अपमानजनक व्यवहार

कामगारांच्या म्हणण्यानुसार, १९ जुलै रोजी एका कंत्राटदाराने ‘‘काम करायचं असेल तर करा, नसेल तर आम्हाला गरज नाही’’ असे सांगत अपमानजनक वागणूक दिली, ज्यामुळे रोष अधिक तीव्र झाला. निवेदनात देखील याबाबत उल्लेख करण्यात आला आहे.

#### कचरा संकलनावर थेट परिणाम

कामबंद आंदोलनामुळे शहरात घंटागाड्या रस्त्यावर दिसेनाशा झाल्या आहेत. परिणामी, घरगुती व व्यापारी कचरा जमा होऊ लागला असून, काही ठिकाणी दुर्गंधीची समस्या उद्भवत आहे. प्रशासनाकडून तात्काळ निर्णय न झाल्यास अडचणी निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसाठी राज्यस्तरीय स्पर्धा

### ५ लाख रुपयांचे प्रथम पारितोषिक

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. २१ :** पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या वतीने महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. सदर स्पर्धेत नोंदणीकृत संस्था किंवा परवानाधारक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे सहभागी होऊ शकतात. सदर स्पर्धेचा अर्ज पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबईच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या ऑनलाईन पोर्टलद्वारेच दि. २० जुलै २०२५ पासून दि. २० ऑगस्ट २०२५ पर्यंत स्वीकारण्यात येणार आहेत. अपूर्ण अर्ज रद्द ठरविण्यात येतील.

सदर स्पर्धा निःशुल्क असून सांस्कृतिक कार्यक्रम, सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन, संस्कृतीचे जतन व संवर्धन याकरिता राबविण्यात आलेले उपक्रम, गडकिल्ले यांचे जतन व संवर्धन, राष्ट्रीय व राज्य स्मारके, धार्मिक स्थळे यांविषयी जनजागृकता तसेच जतन व संवर्धन, विविध सामाजिक उपक्रम व कार्ये, पर्यावरणपूरक मूर्ती, पर्यावरणपूरक सजावट,ध्वनिप्रदूषण रहित वातावरण, गणेशभक्तासाठी केलेल्या सोयी सुविधा यांच्या आधारे केलेल्या कार्याचा गौरव व्हावा आणि असेच समाजाभिमुख उपक्रम अधिकाधिक घडावेत म्हणून प्रोत्साहनपर पुरस्कार देण्याचे शासनाचे उद्दिष्ट आहे. याच निकषांच्या आधारे स्पर्धेचे परीक्षण केले जाईल.

२७ ऑगस्ट पासून सुरू होणाऱ्या गणेशोत्सवात सर्व जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी कार्यालयांनी गठीत केलेली जिल्हास्तरीय समिती या स्पर्धेत सहभागी मंडळे किंवा संस्थांच्या उत्सव स्थळाला भेट देतील आणि जिल्हास्तरीय परीक्षण पूर्ण करतील. स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी सर्वांनी आपापल्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.

## बाल आशीर्वाद योजनेचा ‘तो‘ मेसेज दिशाभूल करणारा

### अफवांवर विश्वासू ठेवू नये

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. २१ :** मुख्यमंत्री बाल आशीर्वाद योजना या नावाने सोशल मीडियावर प्रसारित होत असलेला संदेश पूर्णपणे खोटा असून, महिला व बाल विकास विभागाकडून अशी कोणतीही योजना राबविण्यात येत नाही, असे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी जी.एन.पडघान यांनी स्पष्ट केले आहे. नागरिकांनी अशा अफवांवर विश्वास ठेवू नये असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांनी केले आहे. मुख्यमंत्री बाल आशीर्वाद योजना अशी योजना असल्याचे भासवून समाजमाध्यमांद्वारे काही संदेश प्रसारित होत आहेत. असे वृत्त केवळ अफवा असून, नागरिकांनी त्यावर विश्वास ठेवू नये व फसवणुकीला बळी पडू नये. अशी कोणतीही योजना नसून त्यास बळी पडू नये असे आवाहन करण्यात येत आहे.

# महसूल विभागाचे छापे: ६५० कट्टे तांदूळ जप्त!

### दोन गोदाम सील: रेशन धान्याचा काळाबाजार

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**कारंजा, दि. २१ :** तालुक्यात रेशन धान्याचा काळाबाजार सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर, १९ जुलै रोजी महसूल विभागाच्या पथकाने कोळी येथील दोन गोदामांवर छापा टाकून ६५० कट्टे तांदूळ जप्त केले. ही कारवाई जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. आणि तहसीलदार कुणाल झाल्टे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

कोळी येथील गोदामातून रेशनच्या तांदळाचा काळाबाजार होत असल्याची गुप्त माहिती तहसील कार्यालयाच्या पुरवठा विभागाला प्राप्त झाली. त्यावरून तहसीलदार कुणाल झाल्टे यांच्या नेतृत्वात पुरवठा अधिकारी स्मिता नायगावकर, तलाठी वानखडे, तसेच महसूल कर्मचारी यांच्या पथकाने कोळी येथील दोन गोदामांवर छापा टाकला. त्यावेळी गोदाम क्रमांक १ मध्ये तांदळाचे अंदाजे ३५० ते ४०० कट्टे, तर गोदाम क्र.२ मध्ये तांदळाचे अंदाजे २२० ते २५० कट्टे आढळून आले.



तांदळाचा हा अवैध साठा पुरवठा विभागाने जप्त करून दोन्ही गोदामांना सील ठोकले. प्राथमिक माहितीनुसार ही गोदामे आमिर गुंगीवाले यांच्या मालकीची असल्याचे कळते.

या प्रकरणाची सखोल चौकशी सुरू असून, या गोदामांचा वापर नेमका कशासाठी केला जात होता? धान्याचा स्रोत काय? आणि ते कोणत्या मार्गे, कुठे तस्करीसाठी वापरण्यात येणार होते, या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी प्रशासनाने चौकशीला सुरुवात केली आहे. यासंदर्भात फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गत २५ जूनला सुद्धा तालुक्यातील दोनद व सोहळ- गायवळ येथे धाडी टाकून रेशनच्या तांदळाचे ६५० कट्टे जप्त करण्यात आले होते. तांदळाच्या साठेबाजीचे हे प्रकरण ताजे असतानाच करंजा तहसील कार्यालयाच्या पुरवठा विभागाने कोळी येथे मोठी कारवाई केली आहे. यावरून सध्या कारंजा तालुक्यात रेशनच्या तांदळाचा काळाबाजार चांगलाच फोफावल्याचे स्पष्ट होत आहे.

# ताण-तणावामुळे शासकीय कर्मचाऱ्यांना उच्च रक्तदाबाचा वाढतोय त्रास!

। सुनील फुलारी ।

**वाशिम, दि. २१ :** कारंजा लाड शासकीय कार्यालयांतील कर्मचाऱ्यांना कामाच्या ताणतणावाचा मोठ्या प्रमाणात फटका बसत असून, त्याचा थेट परिणाम त्यांच्या आरोग्यावर होत असल्याचे समोर आले आहे. विशेषतः उच्च रक्तदाब (हायपरटेन्शन) हा त्रास अधिकाधिक कर्मचाऱ्यांना सतावत आहे. कारंजा येथील विविध शासकीय कार्यालयांमध्ये यासंदर्भात विचारणा केली असता अनेकांनी तणावामुळे आरोग्य बिघडत असल्याचे सांगितले.

ताज्या पाहणीतून असे दिसून आले की, बहुतांश अधिकारी व कर्मचारी हे दीर्घकाळ संगणकासमोर बसून काम करतात, वेळेवर काम पूर्ण करण्याची



दडपणं, अपुरा कर्मचारी वर्ग, वरून येणाऱ्या कामाचा मारा आणि अधूनमधून होणाऱ्या तपासण्या यामुळे मानसिक आणि शारीरिक तणाव वाढतो. हेच तणाव उच्च रक्तदाबासारख्या आजारांना आमंत्रण देत आहेत.

एक शासकीय कर्मचारी म्हणाले, ‘‘दैनंदिन कामाचा भार, वरिष्ठांची अपेक्षा पूर्ण करण्याची जबाबदारी, वेळोवेळी बदलणारे शासन आदेश यामुळे प्रचंड मानसिक तणाव जाणवतो. घरच्यांसाठी वेळ मिळत नाही, जेवणाची वेळही बिघडते. त्याचा परिणाम थेट आरोग्यावर होतो.’’

आरोग्य तज्ज्ञांच्या मते, सतत तणावात काम केल्यामुळे रक्तदाब नियंत्रित राहात नाही. अशा परिस्थितीत योग्य आहार, नियमित व्यायाम आणि तणाव व्यवस्थापन तंत्रांचा अवलंब करणे अत्यावश्यक आहे. अन्यथा लवकरच ही समस्या गंभीर रूप घेऊ शकते.

सध्या शासकीय कर्मचाऱ्यांमध्ये उच्च रक्तदाब, मधुमेह, निद्रानाश, डोकेदुखी, थकवा या समस्या सामान्य झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेत, नियमित आरोग्य तपासणी, योगशिबिरे, तणाव व्यवस्थापन सत्र यांचे आयोजन करणे अत्यंत गरजेचे आहे.

कामाचा बोजा कमी करणे, सुयोग्य कार्यवाटप आणि कर्मचारी कल्याणासाठी सकारात्मक पावले उचलल्यासच शासकीय यंत्रणा आरोग्यदायी राहील, अन्यथा उच्च रक्तदाबासह गंभीर आजार वाढण्याचा धोका आहे.

## साडीवरून वाद: पतीला रॉडने मारहाण; चौघांवर गुन्हा दाखल

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मानोरा, दि. २१ :** पत्नीला ‘‘चांगली साडी नेस‘‘ एवढंच सांगितल्यावर पतीला रॉडने मारहाण झाल्याची धक्कादायक घटना तालुक्यातील फुलउमरी येथे घडली. किरकोळ वादाचे रूपांतर थेट हाणामारीत झाल्याने एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फुलउमरी येथील सुरेश राठोड आणि त्याची पत्नी रोशनी राठोड १९ जुलै रोजी देवदर्शनासाठी आसोला येथे जाण्याच्या तयारीत होते. त्यावेळी सुरेशने रोशनीला ‘‘चांगली साडी नेस‘‘ असे सांगितले. मात्र, रोशनीने ‘‘चांगल्या साड्या माहेरी आहेत, मी हीच नेसून जाते किंवा माहेरीच परत जाते,‘‘ असे उत्तर दिले. त्यातून वाद वाढत गेला.

सुरेशचे वडील शंकर राठोड यांनी हा प्रकार रोशनीच्या वडिलांना सांगितला. दुसऱ्याच दिवशी, म्हणजे २० जुलै रोजी सकाळी १०.३० वाजता रोशनीचे आई-वडील आणि नातेवाईक फुलउमरीत राठोड यांच्या घरी आले. तेथे सुरेश आणि त्याचे वडील शंकर यांच्यासोबत वाद घालून लोखंडी रॉडने मारहाण करण्यात आली. या घटनेत सुरेश आणि शंकर राठोड दोघेही गंभीर जखमी झाले आहेत. या प्रकरणी मानोरा पोलिसांनी प्रकाश चव्हाण, राजेश चव्हाण, सुशीला चव्हाण (सर्व रा. खंडापूर, ता. दिग्रस) आणि रोशनी राठोड यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास मानोरा पोलिस करीत आहेत.

## थोडक्यात

### ज्ञानदर्पण शाळेत विद्यारंभ संस्कार आनंदात



**अकोला :** न्यू खेतान नगर, कौलखेड येथील विद्याभारती अखिल भारतीय शिक्षा संस्थान संलग्नित ज्ञानदर्पण इंग्रजी शाळेत विद्यारंभ संस्कार २१ जुलै रोजी सकाळी ९.३० ते १२.०० यादरम्यान उत्साहात साजरा करण्यात आला. नर्सरी, के. जी १ व के.जी २ च्या मुलांचा व पालकांचा सहभाग होता. या कार्यक्रमांमध्ये मुलांना पाट्या वाटप करून मुलांच्या हाताने त्या पाट्यांवर अक्षर संस्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पल्लवी कुळकर्णी होत्या. यज्ञेश गुरुजींच्या हस्ते या कार्यक्रमाची पूजा संपन्न झाली. यामध्ये यजमान रमेश पिंजरकर लाभले होते. या कार्यक्रमांमध्ये मार्गदर्शन अनिता कुळकर्णी, शाळेच्या मुख्याध्यापिका मंदा भाकरे तसेच संजय यांनी केले. कार्यक्रमात अंजली वाघमारे, कविता कुरुडे, वैशाली मुळतकर, स्वरूपा शास्त्री व सेविका उज्ज्वला यांनी सहकार्य केले. या कार्यक्रमाला पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

### विद्यार्थी बनविणार दरवर्षी एक हजार सीड बॉल



**अकोला :** १८ जुलै रोजी आनंददायी शनिवार तसेच झाडे लावा झाडे जगवा, एक पेड माँ के नाम, हरितक्रांती, तापमान वाढीला आळा, वसुंधरा हिरवी करा, या सर्व विषयांच्या अनुषंगाने न्यू ईरा हायस्कूलच्या प्रांगणामध्ये विद्यार्थ्यांनी बनविले १००० सीड बॉल. सीड बॉलमुळे बिया किडे, मुंग्या, पक्षी यांच्यापासून सुरक्षित राहतात. सीडबॉलमुळे आपण ओसाड टेकड्या, जमीन यावर हरितक्रांती घडवून आणू शकतो. सीडबॉलमधूनचे झाड उगवतील त्यामुळे पर्यावरणाला मदत मिळू शकते, तसेच तापमान वाढीचा पारा कमी करू शकतो, ओसाड जमिनीवर हरितक्रांती घडून आणू शकतो, अशी सर्व प्रकारची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांकडून प्रत्यक्ष सीडबॉल बनवून कार्यशाळा घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी कडुनिंब, जांभूळ, सीताफळ, आंब्याच्या कोई अशा प्रकारच्या बिया जमा केल्या. चिकन माती, शेणखत यांना एकत्र करून ती माती भिजवण्यात आली तसेच छोटे छोटे मातीचे गोळे तयार करून त्यामध्ये बिया टाकण्यात आल्या. स्काऊट गाईड, एनसीसी तसेच शाळेच्या विद्यार्थ्यांकडून १००० सीडबॉल तयार करण्यात आले. या कार्यशाळेसाठी शाळेचे मुख्याध्यापक महेश ठोके, सहायक शिक्षिका योगिता मडावी, सुषमा देशमुख, दिलीप राठोड, संध्या मुडा, शिक्षकेतर कर्मचारी अनंत कुलकर्णी, शुभम सरोदे यांचे सहकार्य लाभले.

### 'आशा'चा मेळावा वेताळ बाबा मंदिराच्या सभामंडपात



**मुंडगाव** : आशा सेविका व गट प्रवर्तक संघटना अकोला जिल्हाच्यावतीने आशा व गट प्रवर्तक संघटना मेळावा २० जुलै रोजी वेताळबाबा संस्थान देवरी येथे संपन्न झाला. यावेळी अकोट तालुक्यातील आशांना मानधन मार्चपर्यंत देण्यात आले;परंतु इतर तालुक्यातील आशांना मेपर्यंतचे मानधन देण्यात आले, तसेच आशांकडून झाडपूस करण्याची कामेसुद्धा करून घेतली जातात, अशी विविध विषयांवर चर्चा करण्यात आली,पतसेच आशा व गट प्रवर्तक संघटना यांच्या मेळाव्याच्या निमित्ताने प्रत्येक आरोग्य केंद्रांतर्गत व तालुका कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. त्यामध्ये तालुकाध्यक्ष मिना गेबड, ज्योती भगत, अरुणा वाकोडे, वानखडे, वंदना पाखरे, वैशाली नाथे, वर्षा पुनकर, स्वप्नाली वडतकर, ललीता मोहोड, मंजुषा कळसकर, नंदा वसु, कोकीळा डिघे, आशा चव्हाण, मेघा मोहोड, आरती नाथे, रेखा तायडे, रेखा दुधे, सरला आग्रे, ज्योती भगत, मुक्ता काटोले, वंदना वावरे, राधा पाटेकर, मंगला भुसे, सत्यभामा बुंदे, माया बोरचाटे, छाया धोंडेकर, खडसने, दुर्गा मोहोड, वसु, कविता वानखडे, महानंदा जैन, सूर्यकांता राऊत, अरुणा वाकोडे, मालु भोरखडे, सुनीता तांदीलकर यांची निवड करण्यात आली, तर या मेळाव्यास मार्गदर्शन अकोला जिल्हा अध्यक्ष तथा राज्य सदस्य राजन गावंडे, राज्य कौन्सिल सदस्य मिना गेबड, जिल्हा कार्यकारिणी सदस्य संतोष चिपळे, जिल्हा कार्यकारिणी सदस्य सुलोचना पवार यांनी केले तर या मेळाव्याचे प्रास्ताविक राजन गावंडे, संचालन स्वप्नाली वडतकर, आभार ललीता मोहोड यांनी मानले.

## पावसाअभावी पिके लागली सुकू!

### शेतकरी वरुणराजाच्या प्रतीक्षेत!

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**बाळापूर, दि. २१ : खरीप पिकाची पेरणी होऊन १ महिना झाला. मध्यंतरी काही प्रमाणात चांगला पाऊस पडल्याने पिके चांगलीच वाढीस लागली होती. शेतकऱ्याने योग्य ती मशागत केली; परंतु मशागत होऊन टवटवीत दिसायला लागलेली पिके पावसाच्या प्रतीक्षेत सुकायला लागली आहेत.**

गेल्या १५ दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. लवकर पाऊस न आल्यास शेतकऱ्यांनी बँकेकडून किंवा सावकाराकडून घेतलेली रक्कम परत फेडता येईल का नाही? असा प्रश्न निर्माण होत आहे. पावसाअभावी पिकांचे मोठे नुकसान होणार आहे आणि उन्हाळ्यासारखे उष्ण तापमान असल्याने पिके दुपारी सुकलेल्या अवस्थेत दिसतात. पाऊस उशिरा आला तर पिके थोड्याफार प्रमाणात जगतीलही; मात्र झडती कमी लागते व बाजारभावही कमी मिळते, त्यामुळे शेतकऱ्यावरील कर्ज कसे फेडायचे? या चिंतेत बळीराजा आपल्या पिकाला पाहून वरुणराजाला येण्याचे साकडे घालत आहे.

> पिकाची मशागत करीत असताना बहुतांश वेळा शेतकऱ्यांकडे पैसे नसतात, त्यामुळे दुकानदाराकडून फवारणीची औषधे उधार आणून कामे करावी लागतात.
>
> **- नीलेश दामोदर**
> अल्पभूधारक शेतकरी, हात्ता.

#### पावसाने मारली दडी, शेतकऱ्यांची चिंता वाढली

जिल्ह्यातील पेरणीं मोठ्या प्रमाणात आटोपली असून, शेतकऱ्यांना आनंद झाल्याचे वाटत असतानाच गेल्या काही दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ झाली असून, शेतकऱ्यांचे डोळे आभाळाकडे लागलेले आहेत. शेतकऱ्यांनी हिरवी स्वप्ने पाहत महागायची बिजवाई शेतीत टाकली आणि ती अंकुरलीसुद्धा, त्यामुळे शेतकऱ्यांनी स्वप्नपूर्तीसाठी खतांचा डोस आणि डवरणीही झाली; मात्र आता पिकांना पावसाची अत्यंत आवश्यकता असून, आभाळात फक्त ढग जमा होतात; परंतु बरसत नाहीत, त्यामुळे शेतकरी चिंतातूर झाला आहे.

## मन नदी पुलावरील कठड्याचे काम कधी पूर्ण होणार?

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**बाळापूर, दि. २१ :** जून महिन्यात नदीला मोठा पूर आल्याने पुलावरील लोखंडी कठडे वाहून गेल्यामुळे पुलावरुन जीव धोक्यात घालून वाहन चालक व नागरिकांना जावे लागते. बाळापूर येथे तहसील कार्यालय असल्याने तालुक्यातील नागरिक व शाळेतील विद्यार्थी, तसेच नागपूर, पुणे, मुंबईकडे जाणाऱ्या बसेस या पुलावरून वर्दळ होत असते. भविष्यात दुर्घटना टाळण्यासाठी कठडे आवश्यक आहेत; मात्र कठडे बसविण्याचे काम अजूनही अर्धवट आहे. मन नदी पुलावरील कठड्याचे काम कधी पूर्ण होणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

तालुक्यातील नागरिक दररोज आपल्या कामानिमित्त तालुक्याला येतात; परंतु शहराच्या सुरुवातीला मन नदीवरील पूल अतिशय खोल आणि एका बाजूने कठडे लागलेले आहेत आणि दुसरी बाजू अजूनपर्यंत मोकडी असल्याने भीती व्यक्त केली जाते. तर पुलावरील पडलेल्या खड्यामुळे वाहन चालकांना मोठी कसरत करावी लागते. तर या अर्धवट कठड्यामुळे अपघाताची शक्यता वाढली आहे , याकडे संबंधित अधिकाऱ्याने लक्ष घालून काम पूर्ण करण्याचे आदेश देण्यात यावे, अशी मागणी होत आहे.

> संबंधित ठेकेदारांसोबत बोलून लवकरात लवकर पुलावरील कठडे लावण्याचा आदेश देण्यात येतील
>
> **- वैभव फरताडे**
> तहसीलदार बाळापूर.

## तुकडोजी महाराज चरणपादुका प्रचारवारीचे अकोटमध्ये भव्य स्वागत



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोट, दि. २१ :** अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवाश्रम गुरूकुंज मोझरी तालुका तिवसा जिल्हा अमरावती अंतर्गत वंदनीय श्री.राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या चरणस्पर्शाने पवित्र पावन अकोट नगरीत हजारो लोकसमुदायमध्ये चरण पादुकाचे भव्य स्वागत केंद्रीय कार्यकारिणी सदस्य भाऊसाहेब रवींद्र मुंडगावकर यांच्या निवासस्थानी आगमन झालेल्या चरण पादुका प्रचारवारीचे भव्य स्वागत करण्यात आले.

केंद्रीय कार्यकारिणी सदस्य भाऊसाहेब रवींद्र मुंडगावकर यांच्या निवासस्थानी झालेल्या सामुदायिक सर्व संतांच्या तत्त्वाचा समन्वय साधून अखिल भारतीय श्री वारकरी संप्रदायाचे पाईक ह.भ.प.वाणीभूषण गुरुवर्य ज्ञानेश्वर महाराज वाघ, वारी भैरवगड यांच्या हरी कीर्तनाने अकोट नगरी आनंदाच्या जल्लोषात देहभान झाली. मंडळाचे अकोला जिल्हा सेवाधिकरी भाऊसाहेब शिवाजी दादा म्हैसने, संगीता गावंडे अकोला जिल्हा महिला सेवाधिकारी तथा नवनिर्वाचित मध्यवर्ती प्रतिनिधी यांच्या उपस्थितीमध्ये कीर्तन सोहळा आणि चरण पादुकाचे पूजन झाले. पंचक्रोषीतील पुंडा, कवठा, आसेगाव बाजार, वरुर जऊळका, सावरगाव, रुईखेड, पणज, आडगाव, रुईखेड, बोर्डी, शिवपूर, वाई, दिवठाणा, चंडीकापूर, सावरा, अकोलखेड, अकोली जहागीर, तेल्हारा तालुक्यातील बरीच मंडळी व अकोटमधील हजारो भाविकांनी दर्शनाचा लाभ घेत काल्याच्या महाप्रसादाचा लाभ घेतला. पालखी सोहळ्यात प्रामुख्याने केंदिय प्रचार सचिव ह.भ.प. सुशील महाराज वणवे यांनी मोझरी ते पंढरपूर पादुका प्रचार वारी व वापसी पंढरपूर, मुंबई, नाशिक, पुणे , शेगाव , अकोला, अकोट पर्यंतचा लेखाजोखा सर्वांसमोर सादर केला व सर्वांचे आभार व्यक्त केले आणि आभार रवींद्र दादा यांनी मानून राष्ट्रवंदणेने कार्य क्रमाचा शेवट झाला आणि नंतर महाप्रसाद झाला तालुका प्रचार प्रमुख तथा मध्यवर्ती प्रतिनिधी हभप श्रीविष्णुदास निमकर्डे महाराज तसेच तालुका सेवाधिकारी तथा मध्यवर्ती प्रतिनिधी दिनेश बोचे, राष्ट्रीय कीर्तन सम्राट शुकदास महाराज गाडेकर यांच्या उपस्थितीमध्ये कार्यक्रम पार पडला.

## श्रावण मास कावड उत्सव समिती अकोटची कार्यकारिणी जाहीर

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोट, दि. २१ :** अकोट येथील श्रावण मास कावड उत्सव समितीची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यावेळी अकोटमधील सर्व कावडधारी शिवभक्त मंडळाचे अध्यक्ष यावेळी हजर होते. दरवर्षीप्रमाणे चौथा श्रावण सोमवार १८/८/२०२५ ला असून, हा कावड उत्सव सण मोठया उत्साहाने व नव्या शक्तीने साजरा करण्यात येणार आहे. त्यानिमित्त श्रावण मास कावड उत्सव समितीची बैठक गणपती मंदिर, नरसिंग महाराज मंदिराजवळ अकोट येथे ठेवण्यात आली होती.या वेळी शिवभक्त कावडधारी मंडळ अध्यक्षांच्या सर्वनुमते श्रावण मास कावड उत्सव समिती अकोट शहर सन २०२५ च्या अध्यक्षपदी अनंता भगवान मिसाळ, तर उपाध्यक्ष सुनील ताराचंद देठे उपाध्यक्ष, प्रतीक संजय गोरे,सचिव डिगांबर रामकृष्ण सोळंके(वस्ताद),सहसचिव सचिन भगवान नागापुरे,सहसचिव गोलु गणेश भगत,कोषाध्यक्ष संजय सातळेकर,सहकोषाध्यक्ष दिलीप किसन पागृत, सदस्य रवि प्रल्हाद ताडे,सुरज दिलीप शेंडोकार,मयुर गजानन नाठे,प्रतीक हेंड,मोहन बेराड,गजानन चौधरी,गोपाल माकोडे,तथा सर्व शिव कावड मंडळाचे अध्यक्ष समितीचे सदस्य आहेत.येत्या २० वर्षांपासून अध्यक्ष असलेले संजय गोरे यांनी खूप सुंदर कार्यपार पार पाडले. म्हणून सर्व कावड अध्यक्षांनी संजय गोरे यांचे हार,शाल,श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला, तसेच सर्व नवनवीन अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य व पदाधिकारी यांचा हार, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात येते. दरवर्षीप्रमाणे यावर्षीसुद्धा सर्व कावड मंडळांनी नियमाचे पालन करावे. या कार्यक्रमाचे संचालन समिती सचिव डिगांबर सोळंके(वस्ताद)यांनी केले. तर आभार प्रतीक गोरे यांनी मानले.

## हुमणी अळीचा पिकांवर मोठा प्रादुर्भाव

**अकोला :** अकोला जिल्ह्याच्या बाभूळगाव जहागीर, शिवणी व चांदूर मंडळातील गावांमध्ये हुमणी अळीने सोयाबीन, कापूस आणि तूर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले आहे, ज्यामुळे शेतकरी मोठ्या संकटात सापडले आहेत. डोंगरगाव, सिसा, मासा, उदेगाव, कुंभारी, बोरदखेड, पांढरी, बाभूळगाव जहागीर आणि येवता या गावांमध्ये सुमारे २०० एकर शेती हुमणी अळीने पूर्णपणे उद्ध्वस्त केली आहे. दुबार पेरणीची वेळ निघून गेल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. या गंभीर परिस्थितीबाबत डोंगरगावचे उपसरपंच किशोर काकडे यांच्या नेतृत्वाखाली योगेश ज्ञा. नागापुरे, जगदेव वानरे, दिलीप खारोडकार, मोहन बदरखे, मनोहर काकडे आणि योगेश रा. नागापुरे यांनी आज (२१ जुलै, २०२५) तालुका कृषी अधिकारी, अकोला, सुधाकर खंडारे यांना निवेदन दिले.

## नूतन विद्यालय येथे केले वृक्षारोपण

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**आलेगाव, दि. २१ :** येथील नूतन विद्यालय आलेगाव येथे १९ जुलै २०२५ शनिवारी सकाळी विद्यालयाच्या प्रांगणामध्ये इको क्लब अंतर्गत 'एक झाड आईच्या सन्मानार्थ' योजनेंतर्गत विद्यालयाचे प्राचार्य राठोड प्रमुख अतिथी पर्यवेक्षक माळी तसेच सर्व शिक्षक,कर्मचारी यांच्या उपस्थितीत वर्ग पाचवी ते दहावीपर्यंतचे सर्व विद्यार्थी तसेच गुरु गणेश मिस्त्री जैन कला व विज्ञान कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाचे सर्व विद्यार्थ्यांनी परिसरात वृक्षारोपण केले.

सुरुवातीला शिक्षकांनी आजच्या एकविसाव्या शतकात पर्यावरणातील असंतुलनाला दूर करण्याकरिता या पृथ्वीवर झाडांची आवश्यकता अत्याधिक आहे, याकरिता झाडे लावणे आवश्यक आहे व ते जगणेसुद्धा महत्त्वपूर्ण आहे हे विद्यार्थ्यांना अनेक उदाहरणाद्वारे समजून सांगितले. याप्रसंगी उपस्थित सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनींनी आम्ही वृक्षारोपण करणार व त्याचे संगोपनसुद्धा काळजीने करणार, याकरिता सामूहिक प्रतिज्ञासुद्धा घेतली. तसेच अनेक विद्यार्थी समूहांनी एका एका झाडाच्या संरक्षणाची जबाबदारी घेऊन त्याला वाढवून जगविण्याचा निर्धार केला आहे.

अनेक विद्यार्थ्यांना वृक्षरोपण करण्याकरिता वृक्षारोपांचे वितरण करण्यात आले. मिळालेली वृक्ष विद्यार्थ्यांनी आपल्या शेतामध्ये किंवा घराजवळ लावावी व त्याचे संरक्षण करावे, असा विद्यार्थ्यांनी निर्धार केला. याप्रसंगी विद्यालयातील शिक्षक मंगुळकर, तिलकरी, थोरात,अंबुलकर सोनोने ,बहादुरे ,तिवाले, खर्डे, भुबरे, शिलवंत, देशमाने, धारतरकर ,काळदाते ,खैरे, सरप, निखाडे, अटलकर, पातोडे, भारस्कर पानपते, थापा तसेच गावातील नागरिक उपस्थित होते. अशा कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये निसर्गाप्रती प्रेम निर्माण होईल व विद्यार्थी जास्तीत जास्त झाडांना जगवतील त्यामुळे आपले पर्यावरण चांगले होण्यास मदत होईल ,असे विचार उपस्थित सर्वांनी व्यक्त केले.

## अकोट ते रंभापूर फाटा रस्ता उठला नागरिकांच्या जीवावर!

### रस्ता खोदून ठेवल्यामुळे अपघात; अनेकांना गंभीर दुखापती

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोट, दि. २१ :** तालुक्यातील अकोट ते सावरा रस्त्याचे काम सुरू आहे. कंत्राटदाराने रस्ता खोदून ठेवल्यामुळे मोठ-मोठे अपघात या रस्त्यावर होत आहेत. यामध्ये अनेकांना गंभीर दुखापती झाल्या आहेत.

अकोट ते ढगा फाटा ते सावरा रोड काम गेल्या काही दिवसांपासून बंद पडल्यामुळे रात्रंदिवस रस्ता वाहतूक सुरू असल्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे. रस्त्यावरील खड्ड्यांमुळे वाहनचालकांना व स्थानिक गावातील नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. अमरावती जिल्ह्यातील गौरखेड येथील रहिवासी शुभम खंडारे यांचा १९ जुलै रोजी रात्री अकोटवरून घरी परत जात असताना ढगा फाट्याजवळ अपघात झाला. या अपघातात त्यांला गंभीर दुखापत झाली. सावरा गावातील नागरिकांनी त्यांना मंचनपूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्र येथे उपचारासाठी आणले. नंतर त्यांच्या नातेवाइकांना माहिती देण्यात आली. अशाप्रकारे अनेकांना या ठिकाणी अपघात होऊन गंभीर दुखापती झाल्या आहेत. अकोट ते सावरा रोडवर अशा प्रकारचे अपघात निदर्शनास आल्यास सावरा आपत्कालीन ग्रूपच्यावतीने मदत केल्या जाते. अकोट ते सावरा रस्त्यावर खोदलेल्या खड्ड्यांमुळे जीवितहानी तसेच गंभीर दुखापती होऊ नये म्हणून शासनाच्या संबंधित विभागाने विशेष लक्ष देऊन रखडलेल्या रस्त्याचे काम त्वरित सुरू करावे, अशी मागणी अकोट व सावरा येथील स्थानिक नागरिकांच्या वतीने केली जात आहे.

## आरोग्य शिबिराला वंचित बहुजन आघाडी पदाधिकाऱ्यांची भेट



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**बार्शीटाकळी, दि. २१ :** रविवार २० जुलै २५ रोजी आयोजन करण्यात आलेल्या शिबिरामध्ये अकोल्यातील तज्ज्ञ डॉक्टरांकडून वेगवेगळ्या तपासण्या करण्यात आल्या. तीनशे लोकांनी या शिबिराचा लाभ घेतला.

शिबिराचे आयोजन वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते अमोल जामनिक यांनी केले. या शिबिराला उद्घाटक म्हणून वंचित बहुजन आघाडीचे अकोला जिल्हा अध्यक्ष प्रमोद देंडवे आणि जिल्हा महासचिव मिलिंद इंगळे हे होते तर सोबत बार्शीटाकळी तालुक्याचे कार्याध्यक्ष गोरसिंग राठोड, वंचित बहुजन आघाडीचे वरिष्ठ नेते नईमुद्दीन शेख, तमिज खान ऊर्फ गोबा सेठ, शुद्धोधन इंगळे, सुरेश जामनिक, अनिल धुरंधर, शहर अध्यक्ष अजहर पठाण, दिनेश मानकर, भास्कर सरदार, दादाराव जामनिक, गणेश गवई, बॉबी जालनिक, नागेश कांबळे, अविनाश चक्रनारायण, मिलिंद करवते, सुरज इंगळे, रक्षक जाधव, शीलवंत ढोले, वकील जामनिक, अमोल वकील जामनिक, अरविंद जामनिक, गिरधर राठोड समवेत अनेक वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# राज्यातील शेतकऱ्यांचे देशाबाहेर अभ्यास दौरे; जागतिक तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.२१ : विविध देशांनी विकसित केलेले शेतीविषयक तंत्रज्ञान व तेथील शेतकऱ्यांनी त्याचा केलेला अवलंब व त्याद्वारे त्यांच्या उत्पन्नात झालेली वाढ जाणून शेतकऱ्यांचे ज्ञान आणि क्षमता उंचावण्याकरिता कृषी विभागाकडून अभ्यास दौरे आयोजिण्यात येत आहेत.**

योजनेअंतर्गत निवड झालेल्या शेतकऱ्यांना युरोप (नेदरलँड्स, जर्मनी, स्वित्झर्लंड, फ्रान्स), इस्त्राईल, जपान, मलेशिया, व्हिएतनाम, फिलीपाइन्स, चीन आणि दक्षिण कोरिया अशा प्रगत देशांमध्ये अभ्यास दौऱ्यावर पाठवण्यात येणार आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी अधिकाधिक शेतक-यांनी दि. २४ जुलैपूर्वी तालुका कृषी अधिकारी कार्यालयाकडे अर्ज करावेत, असे आवाहन कृषी उपसंचालक ए.बी. गावडे यांनी केले आहे.

## कृषी विभागाचा उपक्रम; अर्ज करण्याचे आवाहन



**अभ्यास दौऱ्याचे उद्दिष्टे:** उत्पादन व उत्पादकता वाढविणे, शेतीमध्ये नवीन तंत्रज्ञानाचा वापर, काढणीपश्चात प्रक्रिया व व्यवस्थापन पद्धतींचा अभ्यास, जागतिक शेती व्यवस्थापन प्रणाली समजून घेणे, निर्यातक्षम शेतीचा विकास. **देशनिहाय अभ्यासाचे क्षेत्र:** युरोप दौऱ्यामध्ये फलोत्पादन, सेंद्रिय शेती, दुग्धोत्पादनातील आधुनिक पद्धतीचा अभ्यास, इस्त्राईल दौऱ्यात पाणी व्यवस्थापन, कृषी यांत्रिकीकरण, जपान दौऱ्यात सेंद्रिय शेती व उच्चतंत्र शेती पद्धती, मलेशिया, व्हिएतनाम, फिलीपाइन्स दौऱ्यांत काढणीपश्चात तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन, चीन दौऱ्यात कृषी, उत्पादनवाढ तंत्रज्ञान, दक्षिण कोरिया दौऱ्यात आधुनिक अन्न प्रक्रिया तंत्रज्ञानाचा अभ्यास केला जाईल. या दौऱ्यांमुळे शेतकऱ्यांमध्ये शेतातील नवोन्मेषाबाबत जागरूकता निर्माण होईल. आधुनिक बाजार व्यवस्थापन, निर्यातीच्या संधी आणि जागतिक स्पर्धेमध्ये टिकून राहण्यासाठी शेतकऱ्यांचे ज्ञान वाढणार आहे.

**पात्रतेचे निकष:** अर्जदार स्वतः शेतकरी असावा, अर्जदाराच्या नावावर मागील ६ महिन्यांचा ७/१२ आणि ८-अ उतारा असावा, शेती हे उत्पन्नाचे मुख्य साधन असावे, शेतकऱ्याकडे ॲग्रीस्टॅक अंतर्गत फार्मर आयडी असणे बंधनकारक आहे. फक्त एका कुटुंबातील एकाच सदस्यास या योजनेचा लाभ घेता येईल, आधार प्रमाणपत्राची प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे, दौऱ्यास निघण्याच्या दिवशी शेतकऱ्याचे वय किमान २५ वर्षे पूर्ण असावे आणि शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त असावा. यासाठी वैद्यकीय प्रमाणपत्र अनिवार्य आहे, अर्जदाराकडे वैध पासपोर्ट असावा व त्याची मुदत किमान तीन महिने शिल्लक असावी. अर्जदार कोणत्याही शासकीय, निमशासकीय, सहकारी किंवा खाजगी संस्थेत नोकरीस नसावा, तसेच डॉक्टर, वकील, अभियंता, सीए, कंत्राटदार इत्यादी व्यवसायाशी संबंधित नसावा, यापूर्वी शासकीय खर्चावर परदेश दौरा केलेला नसावा.

**आर्थिक सहाय्य:** शासनामार्फत एकूण दौऱ्याच्या खर्चाच्या ५० टक्के रक्कम किंवा कमाल १ लाखांपर्यंत आर्थिक सहाय्य (अनुदान) दिले जाणार आहे. उर्वरित खर्च शेतकऱ्याने स्वतः भरावा लागेल.

**अर्ज प्रक्रिया:** इच्छुक शेतकऱ्यांनी प्रपत्र-१ मध्ये आवश्यक माहिती भरून, आवश्यक कागदपत्रांसह तालुका कृषी अधिकारी कार्यालयात अर्ज सादर करावा. जर पात्र अर्जांची संख्या लक्षांकापेक्षा अधिक झाली, तर जिल्हास्तरीय समितीमार्फत सोडत पद्धतीने निवड केली जाईल. निवड झालेल्या शेतकऱ्यांनी वैद्यकीय तंदुरुस्तीचे प्रमाणपत्र आणि कोरोना तपासणी अहवाल अनिवार्यपणे सादर करावे.

# थोडक्यात

## आजारी वासरांना टिनशेडमध्ये ठेवण्याची मागणी

**खामगाव** - घाटपुरी रोडवरील गोरक्षण संस्थानमध्ये एका वासराला उन्हात अलग ठेवले होते. ही बाब गोरक्षक यांच्या निदर्शनास आली. याबाबत गोरक्षणचे संचालक बबलुसेठ राठी यांना विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, वासरू आजारी असल्याने पशुचिकित्सक यांनी या वासराला इतर गोवंशापासून अलग ठेवण्यास सांगितले होते. त्यामुळे त्याला गोवंशापासून अलग ठेवले आहे. तर आजारी वासरूला उघड्यावर उन्हामध्ये ठेवले आहे. त्याला शेडमध्ये घ्यावे, अशी मागणी बबलुसेठ यांच्याकडे केली होती. ही मागणी बबलुसेठ राठी यांनी मान्य केली.

## शेतकऱ्याचा विहिरीत पडून मृत्यू

**खामगाव :** तालुक्यातील किन्ही महादेव येथील शेतकरी संतोष जयराम खेडकर (४२) हे काल २० जुलै २५ रोजी सकाळी १० वाजताच्या सुमारास किन्ही महादेव शिवारातील आपल्या शेतात काम करण्यासाठी गेले होते. सायंकाळ पर्यंत घरी परतले नाही म्हणुन त्यांचे वडील जयराम हरी खेडकर (६६) हे शेतात जाऊन शोध घेत असतांना त्यांना दोरासह बाटली व मुलाची चप्पल विहिरीत पडलेली दिसली. यांनतर ग्रामस्थांच्या मदतीने संतोष खेडकर यांचा विहिरीत शोध घेतला असता त्यांचा मृतदेह आढळून आला. याबाबतची माहिती पोलिस पाटील संतोष मोरे यांनी हिवरखेड पोलिसांना दिली असता पोलिसांनी घटनास्थळी पोहचुन पंचनामा केला. याप्रकरणी जयराम खेडकर यांनी हिवरखेड पोस्टेला दिलेल्या फिर्यादीवरून पोस्टेमध्ये कलम १९४ भान्यासुसं नुसार मर्ग दाखल केला आहे.

## प्रवासी महिलेची सोनसाखळी लंपास

**खामगाव :** येथील एसटी बसस्थानकावर प्रवाशांच्या गर्दीचा फायदा घेत एका महिला प्रवाशाच्या पर्समधून सोन्याचे मंगळसूत्र व रोख रक्कम चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. याबाबत प्रतिभा श्याम इंगळे (३५) रा. खामगाव रोड, शेगाव यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्या आपल्या लहान मुला-मुलीसह अकोल्याला कामानिमित्त जाण्यासाठी १९ जुलै रोजी शेगाव बसस्थानकात आल्या होत्या, फलाट क्रमांक दोनवर उभ्या असलेल्या एमएच-४० एन-९९६३ क्रमांकाच्या अकोला जाणाऱ्या बसमध्ये त्या गर्दीत चढत असताना, त्यांना पर्स उघडी असल्याचे दिसले. त्यातील मंगळसुत्र गायब असल्याचे दिसून आले.

## कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव

| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | १६११ - २२५० |
| गहू | २४०० - २५२५ |
| तुर | ४३०० - ६६६० |
| हरभरा | ४५०० - ६०७५ |
| सोयाबीन | ३७०० - ४४०० |
| भुईमुग | ४७२५ - ५७०० |
| बाजरी | १९२५ - १९२५ |
| मोहरी | ५७५० - ५७५० |
| मलाई चना | ७१५०-७१५० |
| मक्का | २०२५ - २०२५ |

## जन सुरक्षा विधेयक रद्द करण्यात यावे:वंचितची मागणी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**जळगाव जा. दि.२१ :** शासनाने जनसुरक्षा विधेयक मंजुर केल्याचा निषेध करुन हे विधेयक रद्द करण्यात यावे, अशी मागणी वंचीत बहुजन आघाडीचे तालुका अध्यक्ष रमेश नाईक यांच्या नेतृत्वात कार्यकत्यांनी आज १६ जुलै रोजी एका निवेदनाव्दारे तहसीलदार यांच्या मार्फत राज्यपाल यांच्याकडे केली आहे.

मागील पाच ते सहा दिवसात महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक विधान सभेत एक मुखाने पारित करण्यात आले. विधान सभेत महायुतीच्या सभासदांनी एकमुखाने हे विधेयक पारित केले. विधेयकाला विरोधी बाकावर बसणाऱ्या विरोधी पक्षांच्या सभासदांनी सुध्दा पाठिंबा दिला. त्याामुळे या विधेयकाचे कायद्यात रूपांतर झाले तर लोकशाहीचे रूपांतर हुकुमशाही मध्ये झाल्याशिवाय राहणार नाही. नागरिकांच्या स्वातंत्र्याावर बाधा आनणारे हे विधेयक आहे. भारतीय संविधाना नुसार जे मूलभूत हक्क मिळाले, त्याासाठी सुध्दा हे विधेयक धोकादायक आहे. त्याामुळे हे विधेयक रद्द करण्यात यावे, अशी मागणी करून विधेयकाचा व महायुती सरकारचा



निषेध करण्यात आला. निवेदन देतांना वंचीतचे तालकाध्यक्ष रमेश नाईक, सचिव साहेबराव भगत, श्रीकृष्ण गवई, राजरत वाकोडे, प्रवीण तायडे, विजय तायडे, स्वप्निल गवई, असमत खान, बाबुरावजी तायडे, नारायण पवार, अताउल्ला खान, असमत खान, भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष जगदीश हातेकर, दिलीप तायडे, सुरेश वाघोदे, गुणवंत मेटांगे, रवींद्र जाधव, मुकेश पवार, महिला आघाडीच्या सुनीता हेलोडे, प्रमोद कोकाटे, अमोल तायडे, सुनील भटकर, बुद्धभूषण वाघोदे, प्रदीप वानखडे, नरेश पवार. देविदास वानखडे, सुदाम गवई, बाळू तायडे, अशोक दाभाडे उपस्थित होते.

## केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या मालाची बांधावरून इराणमध्ये निर्यात

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**संग्रामपुर दि.२१ :** तालुक्यातील पंचांळा येथील केळी उत्पादक शेतकऱ्याला केळीचे उत्पादन हे चांगल्या दर्जाचे झाल्यामुळे या शेतकऱ्याच्या बांधावरून केळी एजंट मार्फत थेट खरेदी करून ही चांगल्या दर्जाची केळी आता विदेशामध्ये इराण या देशात निर्यात होत आहे तर या केळी बागेला जिल्हा कृषी अधिकारी यांनी सुद्धा भेट दिली. पंचाळा येथील केळीही विदेशात इराण येथे येथे निर्यात होत असल्यामुळे या केळी बागेला जिल्हा कृषी अधिकारी मनोज ढगे, मयुरी खलाणे कृषी उपसंचालक बुलढाणा, बाळासाहेब व्यवहारे उपविभागीय कृषी अधिकारी, तहसीलदार प्रशांत पाटील, रमेश जाधव तालुका कृषी अधिकारी, संदीप अवचार मंडळ कृषी अधिकारी, रवींद्र जाधव सहाय्यक कृषी अधिकारी यांनी २१ जुलै रोजी या केळी बागेला भेट दिली.

तालुक्यातील पंचाळा येथील अनिल



देविदास खानझोड शेतकरी यांनी गतवर्षी १५ एकरामध्ये केळीची लागवड केली होती. दरम्यान त्यांनी त्यांच्या केळीच्या बागाची चांगली मेहनत घेतल्यामुळे त्यांना त्यांच्या मेहनतीचे आज चांगले फळ मिळाले आहे त्यांच्या केळी बागातील केळी ही चांगली दर्जेदार झाल्यामुळे त्यांच्या त्यांच्या केळी पिकाला आज चांगला भाव मिळाला आहे. त्यांच्या केळी बागातील केळीही दर्जेदार असल्यामुळे त्यांना १९००० हजार रुपये प्रति टन प्रमाणे आज भाव मिळत आहेत. थेट केळी खरेदी करणारे व्यापारीच त्यांच्या बांधावर आल्यामुळे तसेच त्यांची केळीही थेट बांधावरून इराण मध्ये निर्यातीसस जात असल्यामुळे परिसरातील शेतकरी हे अनिल खानझोड यांचा केळीबाग पाहण्यासाठी शेतकरी हे शेतकऱ्याच्या केळी बागाच्या बांधावर येत आहेत. केळी उत्पादक शेतकरी अनिल खानझोड यांना १५ एकर क्षेत्रात केळीची उत्पादन हे सरासरी सहा टन मिळण्याची अपेक्षा आहे. केळीचे चांगले उत्पादन मिळवण्यासाठी व चांगली दर्जेदार केळीची तयार होण्यासाठी त्यांनी त्यांच्या या केळी या फळबागेमध्ये रोपांना सेंद्रिय खते, तसेच वेळेवर खतपाणी दिले होते. पंचाळा येथील सरपंच अनिल खानझोड, भगवान खानझोड पोलिस पाटील, ज्ञानेश्वर देविदास खानझोड, शेतकरी तसेच शिवसेनेचे नंदु पाटील खानझोड यांचे या शेतकऱ्यांना केळी बाग साठी योग्य मार्गदर्शन मिळाल्यामुळे माझ्या शेतातील केळीही आज इराण येथे जात असल्याचे शेतकरी खानझोड यांनी सांगितले.

## रस्ता नसल्याने स्मशानभूमीत पार्थिव नेता येत नाही, मुलांनी शाळेत जायचे कसे?

### महिला सरपंच आक्रमक, साबांविचे दुर्लक्ष

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**देऊळगाव राजा दि.२१ :** तालुक्यातील पिंप्री आंधळे गावातला मुख्य रस्ता हा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या हद्दीत असून या रस्त्याकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याने सततच्या पावसामुळे रस्त्याची अवस्था अतिशय दयनीय झाली आहे. या रस्त्याचे तातडीने खडीकरण करून देण्याची मागणी पिंप्री आंधळेच्या सरपंच सौ.अंजली आंधळे व ग्रामस्थांनी संबधित अधिकाऱ्यांकडे केली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता सचिन वाघ, शाखा अभियंता महेश भाले यांना दिलेल्या निवेदनात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या हद्दीत अंढेरा ते डोड्रा हा रस्ता असून सदर रस्ता हा पिंप्री आंधळे गावातून मुख्य मार्गाने गेलेला आहे.या रस्त्याच्या संदर्भात संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना गावाच्या वतीने सरपंच यांनी वारंवार सूचित केलेले होते. मात्र



त्याकडे संबंधित अधिकाऱ्यांनी गांभीर्याने लक्ष दिलेले नाही.सदर रस्ता हा गावातल्या मुख्य मार्गाने गेलेला असल्याने या रस्त्यावरून ये-जा करताना ग्रामस्थांना अतोनात त्रास सहन करावा लागत आहे. या मार्गावर देवी देवतांचे मंदिर असून सकाळ संध्याकाळ मंदिरामध्ये हरिपाठ, भजन व आरती करण्यासाठी ग्रामस्थांना जाणे शक्य नाही, या संपूर्ण रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य निर्माण झाल्याने वयोवृद्धांना पाय घसरून गंभीर दुखापत होण्याची शक्यता नाकारता येत नाही.याच मुख्य मार्गावर गावातली हिंदू स्मशानभूमी असून रस्ता अतिशय खराब झालेला असल्याने अंत्यसंस्कारासाठी पार्थिव सुद्धा नेणे कठीण झाले आहे.अंत्यविधी व रक्षा विसर्जनासाठी आलेल्या नागरिकांना या रस्त्याने स्मशानभूमीत जाणे शक्य नाही, गावात येणारा रस्ता हा अत्यंत खराब असल्याने गावातील अंगणवाडीत प्राथमिक व माध्यमिक शाळेत शिकणाऱ्या मुला मुलींना या रस्त्याने जाणे बंद झाले आहे.तसेच बाहेरगावी शिकायला जाणाऱ्या मुला-मुलींना नेण्यासाठी येणाऱ्या स्कूल बसेस या गावाच्या बाहेरच थांबत असल्याने दररोज पालक त्यांच्या मुलांना घेऊन या स्कूल बसेस पर्यंत सोडतात.सदर रस्ता हा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत येत असल्याने या रस्त्यावर ग्रामपंचायतला काम करता येत नाही,अंढेरा फाटा ते डोड्रा हा रस्ता मंजूर झालेला नाही, तो पर्यंत ग्रामपंचायत कार्यालयापासून ते मल्हारी आंधळे यांच्या घराच्या जवळच्या डोड्रा पांधीच्या कॉर्नर पर्यंत तातडीने या रस्त्याचे खडीकरण करून देण्याची मागणी करत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे. पिंप्री आंधळेच्या सरपंच सौ.अंजली आंधळे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे केली आहे. यावेळी सरपंच अंजली आंधळे, व्हाईस ऑफ मिडिया पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष अर्जुनकुमार आंधळे,विकास राजेंद्र आंधळे, विष्णु शिवाजी परिहार,किरण रविंद्र आंधळे, वैभव पंढरी आंधळे,निलेश विष्णु वाघ उपस्थित होते.

## शेगाव ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीत जुगारावर छापा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**शेगाव दि.२० :** पोलीस अधिक्षक निलेश तांबे, यांनी अवैध धंदयांचा समुळ नाश व्हावा व जिल्हा व्यसनमुक्त व्हावा या संकल्पनेतुन संपुर्ण बुलढाणा जिल्हयात ऑपरेशन परीवर्तन ही मोहीम राबविल्या जात आहे. त्या प्रमाणे पोलीस स्टेशन शेगाव ग्रामीण येथे दि. २० जुलै रोजी मिळालेल्या गुप्त माहिती वरुन ग्राम जवळा बु शिवारात काही इसम एक्का बादशहा नावाचा जुगार पैशाचे हार जितने खेळत व खेळवित आहेत. अशा माहिती वरुन शेगाव ग्रामीण ठाणेदार प्रविण लिंगाडे सोबत पोउपनि गजानन शिंदे, व पोस्टॉफ असे बोर्डी नदीच्या पात्रातुन लपत छपत पोलीस पथकाने खबरे प्रमाणे जुगार खेळत असलेल्या घटनास्थळी सायंकाळी जावुन खात्री करुन जुगार रेड केली.

त्यामध्ये एकुण दहा आरोपी ज्यापैकी पाच आरोपी हे घटनास्थळी मिळुन आले असुन उर्वरीत पाच आरोपी घटनास्थळावरुन फरार झाले आहेत हजर आरोपी यांचे कडुन नगदी व घटनास्थळी मिळुन आलेल्या मोटार सायकली व साहीत्या असे एकुण किमती २,५३,०६०/- रूपयाचा ताश पत्ता जुगाराचा मुददेमाल पंचा समक्ष मिळुन आल्याने तो मोक्यावर रितसर जप्त करुन ताब्यात घेण्यात आला आहे. प्रकरणात शासन तर्फे पोउपनि गजानन शिंदे यांनी तक्रार दिल्यावरुन पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## सना फातिमा शेख हारुण हिचे शिष्यवृत्ती परीक्षेत सुयश

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**जानेफळ दि.२१ :** स्थानिक पेपर विक्रेता शेख हारुण शेख इब्राहिम यांची कन्या सना फातिमा शेख हारुण ही शालेय शिष्यवृत्ती परीक्षेत उत्कृष्ट गुणांनी उत्तीर्ण झाली असून शिष्यवृत्ती साठी प्राप्त ठरली आहे त्यामुळे तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.
सरस्वती कन्या विद्यालय जानेफळ मधील ती विद्यार्थीनी आहे. अत्यंत गरीबीच्या परिस्थितीत ती शिक्षण घेत असून कुठला शिकवणी वर्ग नाही केवळ शालेय मार्गदर्शनातून तिने हे यश प्राप्त केले आहे. वडील गेल्या ३० वर्षापासून पेपर वाटपाचे काम करतात तर आई शेतमजुरी करून आपल्या पाल्यांना शिक्षण देत आहे. गरीब परिस्थिती मुळे आपण पूर्णपणे शिक्षण घेऊ शकलो नाही परंतु पाल्यांनी चांगले शिक्षण घेऊन त्यांचे भविष्य घडविले पाहिजे यासाठी आईवडील रोज मजुरी करून पाल्यांच्या शिक्षणा साठी खर्च करीत आहेत त्यामुळे कु.सनी फातिमा हिने त्यांच्या मेहणतीचे चिज केले आहे.

## मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त उद्या भव्य रक्तदान शिबिर

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खामगाव दि.२१ :** महाराष्ट्र राज्याचे यशस्वी लाडके मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस यांच्या वाढदिवसानिमित्त उद्या दिनांक २२ जुलै रोजी खामगावात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

राज्याचे मुख्यमंत्री लाडक्या बहिणींचे लाडके देवा भाऊ यांचा उद्या वाढदिवस आहे. वाढदिवसानिमित्त त्यांनी अनावश्यक खर्च न करता समाजपयोगी कार्यक्रम घेऊन नागरिकांची सेवा करावी असे आवाहन भाजपा कार्यकर्त्यांना केले आहे. त्या अनुषंगाने खाम गावात उद्या भव्य रक्तदान शिबिर व इतर समाजपयोगी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



महाराष्ट्र राज्याचे कामगार मंत्री तथा खामगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार ॲड आकाश फुंडकर यांचे नेतृत्वात तसेच भाजपा महाराष्ट्र प्रदेश सोशल मीडिया संयोजक सागरदादा फुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली उद्या दिनांक २२ जुलै रोजी उपजिल्हा शासकीय रुग्णालय खामगांव येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबराच्या नियोजन व यशसवितेसाठी आज भाजपा कार्यालयात बैठक पार पडली. यावेळी राज्याचे कामगार मंत्री ना. ॲड आकाश फुंडकर, जेष्ठ साहित्यिक राम दादा मोहिते, भाजपा जिल्हा सरचिटणीस शरदचंद्र गायकी, भाजपा खाम गांव विधानसभा प्रमुख संजय शिनगारे, विस्तारक डॉ एकनाथ पाटील, खामगाव तालुकाध्यक्ष श्याम पाटेखेडे, नरेंद्र शिंगोटे, शेगाव तालुकाध्यक्ष राजेंद्र ढोले, खामगाव शहराध्यक्ष राजेंद्र धनोकार, भाजयुमो महाराष्ट्र प्रदेश सचिव राम मिश्रा, युवा मोर्चा खामगाव मतदार संघ संयोजक पवन गरड आदी प्रमुख पदाधिकारी यांची प्रमुख उपस्तिथी होती. यावेळी खामगाव मतदार संघातील प्रमुख भाजपा पदाधिकारी उपस्थित होते. भव्य रक्तदान शिबिरासह शहरातील प्रत्योक प्रभाग तसेच प्रत्योक गावात रुक्षारोपण आणि इतर समाजपयोगी कार्यक्रम घेण्यात येणार आहे. तरी या रक्तदान शिबीर व इतर आयोजित कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी होऊन समाज हित जोपसावे असे आवाहन ना. ॲड. आकाश फुंडकर यांनी केले आहे.

# अजिंक्य भारत
# आपलं अमरावती

मंगळवार, दि. २२ जुलै २०२५



डॉ. पांडेस् मेड. रेमेडीज (OPC) प्रा.ली.

डॉ. रविराज पांडे (एम.डी.)

वात, दमा, अस्थमा, वजन वाढविणे, कमी करणे, त्वचा रोग, वंधत्व, लैंगिक समस्या, स्त्री रोग, सर्व प्रकारच्या व इतर रोगांवर उपचार व मार्गदर्शन केल्या जाईल.

व्यंकटेश कॉलनी, शंकरनगर जवळ, अमरावती. ( दर सोमवारी )

C/o राईकवार हॉस्पिटल जयस्तंभ चौक परतवाहा ( दर महिन्याचा 3 रा. शनिवार )

C/o महाराष्ट्र मेडिकल बनोसा रोड, दर्यापूर ( दर महिन्याचा 2 रा. गुरुवार )

वेळ : दुपारी 2 ते सायंकाळी 7 वाजेपर्यंत

मो. 9890043911, 9372151186


## थोडक्यात

### क्षुल्लक कारणावरून शिवीगाळ करीत मारहाण

अंजनगाव सुर्जी : गॅरेजमध्ये दुरूस्तकेलेल्या चार चाकीची ट्रायल घेण्यासाठी गेलेल्या युवकाला मागून आलेल्या दुचाकीस्वाराने शिवीगाळ केली. शिवीगाळ का करतो म्हणून त्याला विचारणा केली असता, त्याने हातातील कड्याने डोक्यावर मारले, त्यात फिर्यादी शुभम राजेंद. मालदार (२६, रा. सातेगाव) हा जखमी झाला. ही घटना राजवाडा हॉटेलजवळ घडली. फिर्यादीच्या तक्रारीवरून अंजनगाव पोलिसांनी मारहाण करणाऱ्या युवकाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### सातेगाव शिवारात सोलर पंप चोरी

अंजनगाव सुर्जी : सातेगाव शिवारातसंतोष त्र्यंबक देशमुख (७२, रा. सातेगाव) यांचे शेत असून तेथे सोलर पंप आहे. अज्ञात चोरट्याने त्याचा कंट्रोलर चोरून नेला. त्याची अंदाजे किंमत ३५ हजार रुपये आहे. याबाबत देशमुख यांनी रहिमापूर पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### शेतातील डायनामा चोरणारा अटकेत

**चांदूर बाजार :** शेतातील अंदाजे ६५ हजार रुपये किंमतीचा डायनामा चोरणाऱ्या चोरट्याला चांदूर बाजार पोलिसांनी अटक केली. त्यांने फिर्यादी गोकुल दुर्गासिंग बैस (ठाकूर) (६५, रा. नजरपूर, ता. चांदूर बाजार) यांनी तक्रार दिली. पोलिसांनी गुन्हा नोंद केला.

### दुचाकीच्या धडकेत युवक जखमी

चांदूर रेल्वे : शहरातील गांधी चौकात समोरून आलेल्या भरधाव दुचाकीने चार चाकीला धडक दिली. त्यामध्ये दुचाकीस्वाराच्या पायाला दुखापत झाली. याबाबत राहुल अंबापुरे (३०, रा. चांदूर रेल्वे) यांनी दिलेल्या तक्रारीवरून चांदूर रेल्वे पोलिसांनी दुचाकीस्वाराविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### उभ्या ट्रकवर दुचाकी धडकली

अंजनगाव सुर्जी : भंडारज मार्गावर बंद स्थिती रस्त्याच्या मध्ये उभ्या असलेल्या ट्रकवर दुचाकी धडकली. त्यात दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला. याबाबत चंदू गोपाल गुलेरे (५०, रा. खिरकुंड, जि. अकोला) यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### दुचाकीवरून पडल्याने युवक जखमी

**परतवाडा:** तीन मित्र दुचाकीने अचलपूर येथून वझर धरणावर फिरण्यासाठी गेले. तेथून परत येत असताना तिघांपैकी आशिष धुरंधर हा दुचाकीवरून खाली पडल्याने जखमी झाला. त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. मात्र, त्याच वेळी दुचाकी चालवणारा त्यांचा मित्र घटनास्थळावरून दुचाकीसह पळून गेला. ही घटना कोर्ट परिसरात घडली. तुषार दीपक दाभाडे (२२, रा. सुलतानपूरा, अचलपूर) याने दिलेल्या तक्रारीवरून परतवाडा पोलिसांनी दुचाकी स्वाराविरुद्ध गुन्हा नोंद केला असून पुढील तपास परतवाडा पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करीत आहे.

# मनपाची सुरक्षा ठेव कुठे गायब?




## ५० कोटींच्या रकमेवरून वादंग, कंत्राटदार न्यायालयाच्या तयारीत

अजिंक्य भारत



**अमरावती, दि.२१ :** शहरातील विकासकामांच्या बदल्यात महानगरपालिकेकडे कंत्राटदारांनी जमा केलेली ५० कोटी रुपयांहून अधिक सुरक्षा ठेव आता वाऱ्यावर गेल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. नाले, रस्ते, गार्डन फेंसिंग यांसारखी कामे पूर्ण करूनही अनेक कंत्राटदारांना त्यांची ठेव परत मिळालेली नाही. त्यातच लेखा विभागाकडून ही रक्कम विकासकामासाठी वापरली गेली असे सांगण्यात आल्याने कंत्राटदारांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. कंत्राटदारांची सातत्यपूर्ण धडपड, तरीही रिकामी झोळी.

कंत्राटदारांनी दोन-तीन वेळा स्मरणपत्रे देऊनही महानगरपालिका कारवाई करत नाही. उलट लेखा विभागाचे उत्तर आमच्याकडे पैसेच नाहीत ऐकून अनेकांचा संताप उफाळून आला आहे.कंत्राटदारांचा दावा, कामे पूर्ण करून दिल्यानंतर सुरक्षा ठेव परत करणे ही मनपाची जबाबदारी आहे. पण मनपा फक्त बोळवण करते.

**प्रश्नांची मालिकाच मनपाला संशयच्या भोवऱ्यात**

ही सुरक्षा ठेव खरंच विकासकामांसाठी वापरली का? वापरली असेल, तर त्या कामांसाठी राज्य सरकारकडून आलेला निधी कुठे गेला?

**या ठेव रकमेतून मिळणारे व्याज कुठे जमा झाले?**

कर वसुलीतून मनपाकडे येणाऱ्या कोट्यावधींच्या निधीचा हिशेब काय? या सर्व प्रश्नांमुळे लेखा विभाग आणि तत्कालीन मनपा प्रशासन संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहे. यामागे 'गोल्डन गँग' नावाने ओळखली जाणारी टोळीने निधी फस्त केला का? असा संशय कंत्राटदारांच्या मनात घर करत आहे.

### नवीन आयुक्तांसाठी मोठे आव्हान

नवनियुक्त आयुक्त सौम्या चांडक - शर्मा यांच्या कारकिर्दीवर हे प्रकरण मोठी छाया टाकू शकते. त्यांची प्रतिमा कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याची असली, तरी कंत्राटदारांच्या अपेक्षा प्रचंड आहेत. प्रशासनाचा हा घोटाळा त्यांच्यासाठी डोकेदुखी ठरणार हे निश्चित.

### कायदेशीर गुन्हा, जबाबदार कोण?

कंत्राटदारांच्या ठेवी जर इतरत्र वळवण्यात आल्या असतील, तर तो कायदेशीर गुन्हा आहे. त्यातच या प्रकरणातील हिशोब आणि पारदर्शकतेच्या अभावामुळे मनपा लेखा विभागावर आरोपांची मालिका होत आहे. या प्रकरणात जबाबदार कोण आणि कोणावर कारवाई होणार, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

अनेक कंत्राटदारांनी आता न्यायालयीन लढाईचा मार्ग स्वीकारण्याचे ठरवले आहे. केवळ सुरक्षा ठेव परत मिळवण्यासाठी नव्हे, तर गेल्या काही वर्षांपासून थकित असलेल्या रकमेवर व्याजासह वसुली करण्याची मागणी करण्याची तयारी सुरू आहे. कंत्राटदार राजू मुंदडा यांनी स्पष्ट केले, मी नागरोत्थान योजनेतील रस्त्यांची दोन मोठी कामे पूर्ण केली. सुरक्षा ठेव मिळवण्यासाठी अनेक वेळा पत्रे दिली, पण प्रत्येकवेळी एकच उत्तर आमच्याकडे पैसे नाहीत! आता मी उच्च न्यायालयात दावा दाखल करणार.

# लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघाकडून प्रा.बुरंगेंचा सत्कार

## बहुमोल योगदानाचे ठरले मानकरी

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि.२१ :** लोकस्वातंत्र्य पत्रकार संघटना अकोला यांचेकडून रविवारी दिनांक 20 जुलै रोजी जठारपेठ चौक स्थित हॉटेल जैन रेस्ट्रोमध्ये आयोजित 47 व्या मासिक विचार मेंथन मेळाव्यात संघटनेचे अमरावती कार्यकारी जिल्हा अध्यक्ष प्रा. हेमंत बुरंगे यांचा सत्कार करण्यात आला. त्यांचा हा सत्कार लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघ या समाजाभिमुख राष्ट्रीय संघटनेत संवेदनशील कर्तव्यदक्ष शिलेदार म्हणून देत असलेल्या बहुमोल योगदानामुळे करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र शासनाच्या साहित्य व संस्कृती मंडळाचे माजी सदस्य तथा महासंघाचे राष्ट्रीय पदाधिकारी कादंबरीकार पुष्पराज गावंडे, तर प्रमुख अतिथी म्हणून दमानी नेत्र रुग्णालयाचे संचालक सभापती शुक्ल, खामगावचे जेष्ठ पत्रकार जगदीश अग्रवाल, शल्यचिकित्सक डॉ. मनिष हर्षे, पत्रकामहासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष संजय मा. देशमुख, उपाध्यक्ष प्रदीप खाडे, सचिव राजेंद्र1 देशमुख आदी व्यासपीठावर उपस्थित होते.या



राष्ट्रीय कार्यक्रमाला प्रा.डॉ.संतोष हुशे,अंबादास तल्हार,सिध्देश्वर देशमुख, संदिप देशमुख, अरविंदराव देशमुख, डॉ.शंकरराव सांगळे, प्रा.राजाभाऊ देशमुख, डॉ.विनय दांदळे, जिल्हाध्यक्ष पंजाबराव वर,संजय देशमुख, कंझरेकर, अमरावतीहून रावसाहेब देशमुख प्रा.हेमंत बुरंगे,अमरावती जिल्हा अध्यक्ष संजय देशमुख, गावंडगांवकर, अशोककुमार पंड्या, के.व्ही. देशमुख, प्रविण बोपूलकर, (शब्दवेल, पनवेल) शामराव देशमुख, खामगावहून रामराव देशमुख, पुरूषोत्तम मोरखडे अरूण भटकर ( शेगाव) तथा रवि पाटणे,नरेन्द्र देशमुख, विजय देशमुख, सुरेश पाचकवडे, प्रविण हटकर, वसंतराव देशमुख,कैलास टकोरे, आशिष वानखडे पाटील व सौ.वानखडे, दिपाली बाहेकर, अनुराधा पवार,यशोदा गव्हाळे, पांडूरंग आगळे, फुलचंद मौर्य, गौरव अतकरे, अमित इंगळे,दम्माणी नेत्र रूग्णालय कर्मचारी,व अनेक पत्रकार उपस्थित होते.सौ.जया भारती आणि प्रा.देवबाबू लूले यांनी कार्यक्रमाचे बहारदार संचलन व आभारप्रदर्शन केले.

# पेंटालूनसमध्ये 'युनिकॉन स्पावर' धाड

## ६ तरुणी, ३ ग्राहक पोलिसांच्या ताब्यात

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. २१ :** स्पा सेंटर हे मसाज, सौंदर्य व आरोग्यसेवेची सुविधा असली, तरी त्याच नावाखाली सुरु असलेले अनैतिक प्रकार आता अमरावती सारख्या सांस्कृतिक शहरात उघडकीस येत आहेत. अमरावती ते बडनेरा मार्गावरील समर्थ हायस्कूल चौक स्थित पेंटालून्स मॉलमधील युनिकॉन स्पा सेंटरवर रविवारी सायंकाळी शहर गुन्हे शाखेच्या युनिट-२ ने छापा टाकत अशाब एका हायप्रोफाईल गैरकृत्याचा भांडाफोड केला. कारवाईत मुंबई, दिल्ली, औरंगाबाद येथून आलेल्या सहा तरुणी आणि तीन ग्राहक ताब्यात घेतले गेले. स्पा मालक व व्यवस्थापकाविरोधात गुन्हा आहे.

स्पा सेंटरचा मालक सोमेवर येधते (रा. मुंबई) याच्यावर कारवाई सुरू असून, व्यवस्थापक संजय भरतरि राजपूत (वय २४, रा. ललितपुर, उत्तर प्रदेश) याला ताब्यात घेण्यात आलं आहे. घटनास्थळी स्पेशल पंचनामा, डॉक्युमेंट स्कूटनी व पुराव्यांची नोंदणी केली गेली आहे. प्राथमिक तपासात महत्वाचे दस्तावेज, मोबाईल डिटेल्स आणि आर्थिक व्यबहाराचे ठसे पोलिसांच्या हाती लागल्याची माहिती सूत्रांकडून मिळालीगेल्या काही महिन्यांपासून अमरावतीतील नामांकित मॉल्स, भाडयाने घेतलेली स्पा सेंटर्स, आणि मसाजच्या नावाने चालणाऱ्या दुकानांमधून अनैतिक धंद्याचा अड्डा सुरु असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. या अगोदरही दोन मॉलमधील स्पा सेंटरवर अशाच कारवाया झाल्या असून, आता पेंटान्ससारख्या मोठ्या बँडच्या छायेखाली असा गोरखधंदा सुरू असल्याचं उग्रड झालं आहे.

कथी सांस्कृतिक वारशासाठी ओळखली जाणारी अमरावती, आज रेव्ह पार्टी, ड्रग्ज, सेक्स किट, अनैतिक धंदे यासाठी चर्चत आहे. काही दिवसांपूर्वी अल्पवयीन मुलांनी आयोजित केलेल्या रेव्ह पार्टीचा भांडाफोड आला होता, आणि आता पुन्हा हा स्पा प्रकरण या सगळ्यांवरुन स्पष्ट होतं की, अमरावतीत हायप्रोफाईल गुन्हेगारीला खतपाणी घालणारी यंत्रणा तयार होत आहे.

# दोन वाहनांना मध्यरात्री पेटवले !

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. २१ :** शहरातील गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सिद्धार्थ नगर परिसरात मध्यरात्रीच्या सुमारास घडलेली एक घटना चांगलीच धक्कादायक ठरली. घरासमोर पार्क करून ठेवलेली दोन वाहने अज्ञात व्यक्तीने पेटवून दिल्याने, इंगोले कुटुंबीयांना अक्षरश: धक्क्यात टाकणारा अनुभव आला. ही घटना 17 जुलैच्या रात्री घडली असून, संजय उत्तम इंगोले (वय 52) यांच्या तक्रारीवरून आदित्य वानखडे आणि अक्षय पाटील या दोन तरुणांविरोधात गाडगेनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. इंगोले यांनी रात्रीच्या वेळेस त्यांच्या घराच्या अंगणात एमएच २७ एजी १०३३ व एमएच २७ सीजे १२३६ क्रमांकाची दोन वाहने पार्क केली होती. अचानक धूर आणि आगीच्या ज्वाळा त्यांच्या लक्षात येताच त्यांनी आणि त्यांच्या कुटुंबीयांनी घराबाहेर धाव घेतली.

# तिवसानजीक दुचाकीला अपघात : दोन ठार; दोन गंभीर

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**तिवसा, दि. २१ :** नागपूर येथे ताजुद्दीन बाबांच्या दर्शनासाठी निघालेल्या भाविकांच्या दुचाकी वाहनाला तिवसा तालुक्यातील भारवाडीजवळ भीषण अपघात झाला. या अपघातात दोन जणांचा जागीच मृत्यू झाला असून, दोन लहान मुले गंभीर जखमी झाली आहेत.

जालना जिल्ह्यातील भोकरदन येथील दोन पुरुष दोन मुलांसह ताजुद्दीन बाबांच्या दर्शनासाठी नागपूरला निघाले होते. प्रवासादरम्यान झोपेची डुलकी आल्यामुळे दुचाकी थेट रस्त्याच्या दुभाजकावर आदळली. अपघात इतका



भीषण होता की, एका मृतव्यक्तीचा हात तुटून घटनास्थळीच पडला होता. अपघातात दोन जणांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला असून, जखमी मुलांवर डॉ. सावदेकरयांच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पोलिसांनी घटनेचा पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे. जखमीना उपचारासाठी रूग्णालयात दाखल केले.

# अमरावती-तिवसा महामार्गावर खड्डेच खड्डे...

## खड्डे वाचविण्यात वाहनचालकांची कसरत, प्रशासन मात्र निद्रावस्थेत!

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**तिवसा, दि.२१ :** अमरावती पासून तर वर्धा जिल्ह्यातील चिस्तूर पर्यंत ७० किलोमीटर असलेल्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक सहावरील डांबर उडून महामार्गावर हजारो खड्डे पडले आहे. ज्यामुळे वाहन चालकांना खड्डे वाचवितांना कमालीची कसरत करावी लागत असून यामुळे किरकोळ अपघात होण्याच्या घटना घडत आहे.

नागपूर-अमरावती राष्ट्रीय महामार्गावरील सद्यस्थिती अत्यंत धोकादायक झाली असून, रस्त्यावरील मोठाले खड्डे, नष्ट झालेली गतिरोधक यामुळे वाहनचालकांचे आणि पादचाऱ्यांचे प्राण धोक्यात आले आहेत. सततची वाहतूक असलेल्या या महामार्गावरून दररोज मोठ्या प्रमाणात ट्रक, बस, प्रवासी वाहने आणि टू-





व्हीलर वाहतूक होते.

यामुळे रस्त्याची सध्याची अवस्था ही नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने गंभीर ठरत आहे. राष्ट्रीय महामार्ग हा राष्ट्रीय राज्यमार्ग प्राधिकरणाच्या देखरेखीखाली असून आयआरबी कंपनीकडे या महामार्गाचे काम आहे. परंतु पावसाळ्यापूर्वी महामार्गावर दुरुस्तीचे काम न झाल्याने जागोजागी खड्डे पडले असून तातडीने महामार्गाची दुरुस्ती करावी अशी मागणी वाहनचालकांसह राष्ट्रवादी पार्टी शरद पवार गटाचे तालुका अध्यक्ष हेमंत बोबडे केली असून राहटगाव उड्डाणं पुलाच्या दोन्ही बाजूच्या रस्त्याचे रुंदीकरण करावे अशी मागणी शिवसेना शिंदे गटाचे उपजिल्हाप्रमुख सुनील केने, विष्णुपंत खंडारे यांनी निवेदनातून केली आहे.

**अमरावती-नागपूर महामार्गाची दुरवस्था; टोल वसुली मात्र जोरात!**

अमरावती-नागपूर राष्ट्रीय महामार्गाचे बांधकाम आयआरबी कंपनीने सुमारे १५ वर्षांपूर्वी पूर्ण केले. मात्र त्यानंतर आवश्यक तेवढी देखभाल न झाल्याने महामार्गाची अवस्था सध्या अतिशय गंभीर झाली आहे. रस्त्यात मोठे खड्डे पडल्याने अपघातांचे प्रमाण वाढले असून वाहनचालकांचे हाल होत आहेत.याउलट, रस्ता दुरुस्तीचे काम होत नसतानाही कंपनीने नांदगाव पेठ टोल नाक्यावरून टोल वसुली सुरूच ठेवली आहे. हा टोल नाका सर्वाधिक टोल वसूल करणारा ठरत असून वाहनचालकांची एकप्रकारे लूट चालवली जात असल्याची संतप्त प्रतिक्रिया उमटत आहे.

पावसाळ्यापूर्वी महामार्गाच्या दुरुस्तीचे काम करण्यात आले,आता जवळपास या महामार्गाला पंधरा वर्ष होत आहे. तरी ही नांदगाव पेठ ते मोझरीपर्यंत या दोन दिवसात आम्ही महामार्गावरील खड्डे बुजविण्याचे काम करतो आहे.

**-प्रवीण नागपुरे, अभियंता आयआरबी कंपनी.**

## थोडक्यात

### शहरातून तीन दुचाकी लंपास

अमरावती : शहरात वेगवेगळ्या ठिकाणांवरून अज्ञात चोरट्यांनी एकूण तीन दुचाकी चोरून नेल्या. याबाबत राजापेठ, कोतवाली व नागपुरी गेट पोलिसात अज्ञात दुचाकी चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. गोपाल नगर येथील हरिश्चंद्र मंगल कार्यालयात साक्षगंधाच्या कार्यक्रमाला गेलेले कैलाश सुरेश डिक्याव (४०, रा. बेलपुरा) यांची पार्कींगमध्ये लावलेली दुचाकी (एमएच २७-झेड २३४६) अज्ञाताने चोरून नेली. तिची अंदाजे किंमत १२ हजार रुपये आहे. याबाबत त्यांनी राजपेठ पोलिसात तक्रार दिली. दुसरी घटना कोतवाली पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या टाटयटन कंपनीच्या शोरूमसमोर पुलाखालील पार्कींगमध्ये घडली.

### वाहनांना आग; दोन संशयितांवर गुन्हा

अमरावती : नेहमीप्रमाणे रात्रीच्या वेळी घरासमोर फिर्यादी सर्वज्ञ उत्तम इंगोले (५२, रा. सिव्हिल लाईन, सिद्धार्थ नगर) यांनी त्यांची दोन वाहने नेहमीप्रमाणे उभी केली होती. दरम्यान झोपले असताना त्यांना अचानक घरासमोर आग दिसली. त्यांनी उठून पाहिले असता, त्यांना दोन्ही वाहने जळताना दिसली. त्यांनी आग विझवली. गाडगे नगर पोलिसात याबाबत तक्रार देत सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसलेल्या दोन ते तीन मुलांवर संशय व्यक्त केला. पोलिसांनी दोन युवकांवर गुन्हे दाखल करण्यात आले.

### वाहतुकीस अडथळा करणाऱ्यावर कारवाई

अमरावती : रहदारीस अडथळा निर्माण होईल अशा पद्धतीने रहाटगाव मार्गावरील एका हॉटेलसमोर रस्त्याच्या मधोमध ट्रक (एमएच ४३-ई ८००५) उभा होता. नांदगाव पेठ पोलिसांनी संभाव्य अपघाताची शक्यता लक्षात घेत ट्रक चालकावर गुन्हा दाखल केला असून पुढील तपास नांदगाव पेठ पोलीस करीत आहे.

### कृष्णकुंज विहारात सव्वा लाखांची घरफोडी

चांदूर बाजार : भाक्तीधाम जवळील कृष्णकुंज विहारात अज्ञात चोरट्याने बंद घर फोडून पुजेचे चांदीचे भांडे, सोन्याचे दागिने व रोख 7 हजार रुपये, असा एकूण 1 लाख 27 हजारांचा ऐवज चोरून नेला. याबाबत श्रीकांत सुधाकरराव भुस्कडे (38) यांनी तक्रार दिली. चांदूर बाजार पोलिसांनी घरफोडीची गुन्हा दाखल केला.

### टेंब्रुसोंडा आश्रम शाळेतून बॅटरी चोरली

चिखलदरा : तालुक्यातील टेंब्रुसोंडा येथील शासकीय आश्रम शाळेचे कुलूप तोडून अज्ञाताने ९ हजारांची बॅटरी चोरून नेली. याबाबत सुभाषा बाबू तोटे (४५) यांच्या तक्रारी वरून चिखलदरा पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंद केला.

### टँकरच्या धडकेत दुचाकीस्वार जखमी

अंजनगाव सुर्जी : फवारणीचे औषध घेवून घराकडे परतणाऱ्या युवकाच्या दुचाकीला (एमएच ३०-बीएस १६०९) दुधाचा टँकरने (आरजे २१-बीजी ६२२३) धडक दिली. ही घटना कारला बसस्थानकाजवळ घडली.

# भगतसिंग चौक झाला मृत्यूचा सापळा!

## वाहतुकीच्या गजबजलेल्या चौकात खोल खड्डुयांचे साम्राज्य, विद्यार्थ्यांसह नागरिक त्रस्त

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**धामणगाव रेल्वे, दि. २१ जुलै :** धामणगाव रेल्वेतील अत्यंत महत्वाचा आणि गजबजलेला भगतसिंग चौक सध्या नागरिकांच्या जिवावर बेतणाऱ्या समस्यांचे केंद्रबिंदू ठरत आहे. या चौकातील टर्निंग पॉईंटवर खोल आणि धोकादायक खड्डे निर्माण झाल्याने सर्वसामान्य नागरिकांसह विद्यार्थी, प्रवासी व वाहनचालक यांना दररोज जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

या चौकाच्या नजीकच धामणगाव रेल्वे स्थानक आणि बसस्थानक असल्यामुळे दिवसातून हजारो लोकांची वर्दळ येथे असते. विशेषत: आजूबाजूच्या खेड्यांमधून शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना या रस्त्यावरून रोज तारेवरची कसरत करावी लागत आहे. या खड्यांमुळे कधीही अपघात होण्याची शक्यता असून, एखादी दुर्दैवी घटना घडल्यास जबाबदार कोण, असा सवाल स्थानिक नागरिक उपस्थित करत आहेत.

महत्वाचे म्हणजे, भगतसिंग चौक ते माहेश्वरी भवन पर्यंतचा सिमेंटीकरण रस्ता हे धामणगाव शहराचे दोन भाग जोडणारा मुख्य दुवा आहे. याच रस्त्यावर पुढे प्रशासकीय कार्यालयेही असल्याने अधिकाऱ्यांची आणि नागरीकांची मोठी वर्दळ असते. मात्र, या रस्त्यावर ठिकठिकाणी मोठ्या भेगा पडल्या असून खड्डुयांचे प्रमाणही वाढले आहे. वाहनचालकांना या रस्त्याने जाताना अपघाताच्या धास्तीने प्रवास करावा लागत आहे.



नागरिकांचे म्हणणे आहे की, रस्त्याची ही बिकट अवस्था प्रशासनाला दिसत असतानाही त्याकडे सातत्याने दुर्लक्ष केले जात आहे. खड्डुयात वाहन अडकून अपघात झाला, तर त्याची जबाबदारी प्रशासनावरच राहील, अशी तीव्र भावना जनतेत आहे.स्थानिक आमदार प्रताप अडसड तसेच नगरपरिषद प्रशासन यांनीही या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जोर धरत आहे. भगतसिंग चौक आणि लगतच्या मुख्य रस्त्यांची त्वरित डागडुजी न झाल्यास, जनतेचा रोष उफाळून येण्याची शक्यता आहे.



# विकास विद्यालय पार्डी येथे सेवापूर्ती सोहळा

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अंजनगाव बारी, दि.२१ जुलै :** न्यु ग्रामीण विकास संस्था द्वारे संचालित विकास विद्यालय पार्डी( देवी) येथील प्राचार्य प्रदीप धर्माळे व शिक्षिका जयश्री देवतळे यांचा सेवापुर्ती सोहळा संपन्न झाला. यावेळी कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष मधुकरराव पिसे, उपाध्यक्ष सुरेशराव भेंडे, सचिव पांडुरंगजी बांडाबुचे , सदस्य मधुकरराव ढेंबरे , सदस्या रक्षणा सरदार , अॅड. रंजना भेंडे , मुख्याध्यापक संघाचे सचिव रवींद्र हगवणे तसेच गावातील ग्रामस्थ व जेष्ठ नागरिक उपस्थित होते.यावेळी प्रदिप धर्माळे यांनी विद्यालयातील 32 वर्ष दिलेल्या सेवेचा उजाळा करून त्यांचा सन्माना पूर्वक सत्कार करण्यात आला. सोबतच जयश्री देवतळे यांचा सुद्धा सत्कार करण्यात आला या कार्यक्रमांचे प्रास्तविक विद्यालयाचे नवनियुक्त मुख्याध्यापक संतोष परांजपे यांनी केले तर संचालन संघपाल सरदार व आभार प्रदर्शन संदीप टापरे यांनी केले यावेळी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# श्री रामदेव बाबा अमृत कथेचे आयोजन

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**धामणगाव रेल्वे, दि.२१ जुलै :** श्रावण महीण्याच्या पवित्र सणानिमित्त धामणगाव या अध्यात्मनगरीत इतिहासात पहिल्यांदाच करोडोंचे श्रद्धास्थान राजस्थान रामदेवरा ऋृषीच्याचे श्री रामदेवबाबा यांच्या जीवनावरील अमृत कथा महोत्सवाचे आयोजन श्री परशुराम महिला सेवा समिती व श्री परशुराम सेवा समिती, धामणगाव रेल्वे च्या वतीने दि.२५ ते २७ जुलै या तीन दिवसात करण्यात आलेले आहे ही कथा कोलकत्ता येथील श्री रामदेव बाबा जीवनावरील कथावाचक पूज्य संत श्री जयप्रकाशजी महाराज यांच्या वाणीतून होणार आहे. दररोज दुपारी २ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत आरोही रिसोर्ट, छत्रपती शिवाजी महाराज चौक



येथील कथेमध्ये पहिल्या दिवशी श्री रामदेव बाबांचा जन्मोत्सव दुसऱ्या दिवशी बाबांचा लिला उत्सव तसेच रविवार २७ जुलै ला बाबांचा कावला उत्सव होणार आहे धामणगाव शहरात पहिल्यांदाच होणाऱ्या या आध्यात्मिक,धार्मिक व रामदेव बाबांच्या जीवनावरील अमृत कथा महोत्सवास जिल्ह्यातील तसेच परिसरातील श्री रामदेव बाबा भक्त परिवारांनी सहपरिवार उपस्थित राहण्याचे आवाहन केले.

# मेळघाटातील झिल्पीचा युवक जंगलातून बेपत्ता!

## नातेवाईकांकडून पोलिसात बेपत्ता व वाघाने शिकार केली असल्याची तक्रार

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**धारणी, दि.२१ :** पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या झिल्पी गावातील ३१ वर्षीय युवक हा एका व्यापाऱ्याकडे त्याने विकत घेतलेले जनावरे पायदळ अकोट येथे पोहोचून देण्याचे काम करत होता ते जनावरे पोहोचून देण्यासाठी तो रविवारी घरून निघून गेल्याचे त्याने घरी सांगितले परंतु तो रविवार पासून घरी आला व्याघ्र प्रकल्पाच्या जंगल मार्गे त्याचा प्रवास असल्याने त्याची वाघाणे शिकार केली असल्याचा संशय नातेवाईकांनी व्यक्त करत तो घरून बेपत्ता असल्याची तक्रार धारणी पोलिसात दिली आहेधारणी पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या झिल्पी गावातील



रहिवासी रामसिंग रामचंद्र मावसकर वय 31 वर्ष हा युवक रविवारी एका व्यापाऱ्याकडे त्या व्यापाऱ्यांनी खरेदी केलेले जनावरे अकोट येथे पोहोचून देण्याचे काम रोजनदारीने करतो ती जनावरे व्याघ्र प्रकल्पाच्या जंगल मागनि पायदळ सुसर्दा राणीगाव, घुलघाट रेल्वे, गोलाई, झरी मार्गे, प्रवास करत अकोट येथे पोहोचून देण्यासाठी रविवारी घरून निघून जात असल्याची माहिती त्यांने दोन भाऊ व बहिणीला दिली घरी दिली परंतु तो युवक रविवार पासून अद्याप आठ दिवसाचा कालावधी लोटल्यानंतरही तो घरी न आल्यामुळे त्याचा भाऊ अमरलाल रामचंद मावसकर, फुलचंद रामचंद मावसकर, व बहिण सरस्वती बळीराम धांडे या तीनही भाऊबंदांनी त्याचा शोध सुरू केला शोध सुरू केला त्यादरम्यान त्यांनी धुळघाट रेल्वे गावापर्यंत त्याची माहिती घेण्यासाठी धाव घेतली असता धुळघाट रेल्वे येथील काही ग्रामस्थांनी त्यांना तुमच्या भावाची वाघाने शिकार केली असल्याची माहिती दिली त्या माहितीच्याआधारे त्याच्या बहिण आणि भावांनी मेळघाटचे माजी आमदार प्रभूदास भिलावेकर, प्रकाश मावसकर श्याम गंगराळे अंबर बनसोड जया ताई खंडारे व गावातील ग्रामस्थ यांच्या मदतीने धारणी पोलिसात तो मागील आठवड्यातील रविवार पासून बेपत्ता असल्याची व त्याची वाघाने शिकार केला असल्याचा संशय असल्याची पोलीस तक्रार शनिवारी सायंकाळी नोंदविली त्याचा शोध धारणी पोलीस, व वनविभागाचे पथक यांनी सुरू केला असून अध्याप पर्यंत त्याचा शोध कुठेही लागलेला नाही त्यामुळे नेमकी वाघाची शिकार की आणखी काय याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाला.

# सहाय्यक महसूल अधिकारी यांना बदनाम करण्याचा प्रयत्न!

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

## नागरिकांमध्ये प्रचंड चर्चा

**चांदूर बाजार, २१ :** तहसील कार्यालय, चांदूरबाजार येथे सहाय्यक महसूल अधिकारी म्हणून कार्यरत असलेले सचिन कन्नमवार यांच्याविरुद्ध काही खाजगी कर्मचाऱ्यांकडून हेतुपुरस्पर बदनाम करण्याचा डाव रचला जात असल्याची माहिती समोर आली आहे. कार्यालयात निवासी राहण्याच्या कारणावरून त्यांच्यावर तक्रारी दाखल केल्या जात असून त्यामागे वैयक्तिक द्वेष असल्याचे बोलले जात आहे. कन्नमवार हे तहसील कार्यालयात



२४ तास हजर राहून जबाबदारी पार पाडतात. अनेक शासकीय कार्यालयांमध्ये मुख्यालयी राहण्याच्या आदेशांचे पालन होत नाही, अशा पार्श्वभूमीवर श्री. कन्नमवार यांनी दाखवलेली तत्परता आणि जबाबदारी उल्लेखनीय आहे. तथापि, काही खाजगी कर्मचारी त्यांच्या या निष्ठावान कार्यपद्धतीमुळे नाराज असून सतत त्यांच्याविरुद्ध वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रारी करून, तिऱ्हायित व्यक्तींना हाताशी धरून, त्यांच्या विरोधात बातम्या प्रसिद्ध करीत असल्याचे सांगितले जात आहे.श्री. कन्नमवार यांची नियुक्ती तात्कालीन तहसीलदार रामदास शेळके यांनी केली होती. त्यांच्या अखत्यारीत रात्रपाळीसह इतर जबाबदाऱ्या देखील काटेकोरपणे पार पाडल्या जातात. या सर्व गोष्टींच्या पार्श्वभूमीवर त्यांच्याविरुद्ध पसरवल्या जाणाऱ्या अफवा आणि तक्रारींचे मूळ कारण वैयक्तिक द्वेष असल्याचे प्रशासनात चर्चिले जात आहे.या प्रकरणाची वस्तुस्थिती लक्षात घेऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांनी निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांमधून होत आहे. श्री. कन्नमवार यांची प्रामाणिक प्रतिमा डागाळू नये यासाठी प्रशासनाने योग्य ती पावले उचलण्याची गरज आहे.

# कमवा व शिकवा योजनेसाठी शेकडो इच्छुक

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि.२१ :** जिल्हा परिषदेच्या कमवा व शिका योजनेसाठी तब्बल दीडशेवर विद्यार्थ्यांनी इच्छा व्यक्त केली आहे. या सर्व विद्यार्थ्यांनी जि. प. ने सुचवलेल्या संकेतस्थळावर स्वत:ची नोंदणी केली असून त्याची छाननी एमकेसीएलद्वारे केली जात आहे. छाननीअंती संबंधित उमेदवारांच्या मुलाखती सोमवारपासून होतील. जि. प. प्रशासनाच्या सूचनेनुसार छाननीअंती एमकेसीएलमार्फत ३० विद्यार्थ्यांची यादी जिल्हा परिषद प्रशासनाला सादर केली जाणार आहे. यापैकी १५ विद्यार्थ्यांची अंतिम निवडया योजनेसाठी निवडल्या जाणाऱ्या विद्यार्थ्यांना पहिल्या वर्षी दरमहा ८ हजार रुपये शिष्यवृत्ती (मानधन) दिले जाणार असून, दुसऱ्या वर्षी दरमहा १० हजार तर तिसऱ्या वर्षी दरमहा १२ हजार रुपये मानधन दिले जाईल. या मानधनाची केली जाईल. सोमवार, २१ जुलैला सायंकाळी साडे पाच वाजता आणि मंगळवार, २२ जुलैला दुपारी १२.३० वाजता सीईओंच्या दालनात त्यांच्या मुलाखती घेतल्या जातील. जि. प.च्या कमवा व शिका योजनेत सहभाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अदायगी जिल्हा परिषदेच्या स्थानिक निधीतून केली जाणार आहे. त्यासाठीची तरतूदही या वर्षीच्या अर्थसंकल्पात करण्यात आली असून, येत्या शैक्षणिक सत्रात ही योजना सुरू केली जाणार आहे. स्टायपेंडसह शैक्षणिक पदवीही प्राप्त करता येणार आहे. पदवीचे शिक्षण इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठातून (इग्नू) पूर्ण केले जाणार असून, संबंधितांना बीबीए ही व्यवसाय प्रबंधन क्षेत्रातील पदवी प्राप्त करता येणार आहे.

# अमरावती-मुंबई विमानसेवेच्या भाडेवाढीवर खासदार वानखडेंचा आक्षेप!

## भाडेवाढीचा सामान्य प्रवाशांवर आर्थिक ताण | विमान वेळापत्रक सकाळ-संध्याकाळ करण्याचीही विनंती

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि.२१ :** अमरावती ते मुंबई या मार्गावर अलायन्स एअरच्या विमानसेवेच्या भाड्यांमध्ये अलीकडेच झालेल्या वाढीमुळे प्रवाशांवर आर्थिक भार वाढला आहे.

ही सेवा सर्वसामान्यांसाठी परवडणारी ठेवण्यासाठी अमरावतीचे खासदार बळवंत वानखडे यांनी केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री राम मोहन नायडू यांची भेट घेऊन तातडीने हस्तक्षेपाची



मागणी केली आहे.

खासदार वानखडे यांनी पत्राद्वारे नमूद केले की, अमरावती हे विदर्भातील औद्योगिक, शैक्षणिक आणि प्रशासकीय दृष्ट्या महत्त्वाचे केंद्र आहे. या मार्गावर मोठ्या प्रमाणावर व्यावसायिक, विद्यार्थी आणि शासकीय अधिकारी मुंबईला प्रवास करतात. भाड्यांतील वाढ ही सामान्य प्रवाशांच्या आवाक्याबाहेर गेली असून, तातडीने भाडेवाढीचा फेरविचार करून ती पूर्ववत करावी, अशी ठाम मागणी त्यांनी मंत्र्यांकडे केली आहे.सध्या अमरावती-मुंबई विमानसेवा दुपारी असल्याने प्रवाशांना एका दिवसात मुंबईतील आपली कामे आटपून परत येणे कठीण जाते. ही वेळ सकाळी अमरावतीवरून सुटणारी व संध्याकाळी मुंबईवरून परतणारी ठेवावी, जेणेकरून प्रवाशांना जास्त सोय होईल, अशीही विनंती खासदारांनी केली.

### केंद्रीय मंत्र्यांचे सकारात्मक आश्वासन

या बैठकीत केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री राम मोहन नायडू यांनी खासदार वानखडेंच्या मागणीला गांभीर्याने ऐकून घेतले. संबंधित अधिकाऱ्यांकडून तातडीने अहवाल मागवून प्रवाशांच्या हितासाठी आवश्यक ती पावले उचलली जातील, असे त्यांनी आश्वासन दिले आहे.

अजिंक्य भारत
# यवतमाळ जिल्हा
मंगळवार, दि. २२ जुलै २०२५



## थोडक्यात



### रजनीकांत बोरले यांचा भव्य लाडूतुला सोहळा

**पांढरकवडा :** येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत विक्रमी विजय मिळवलेले अपक्ष संचालक रजनीकांत बोरले यांचा रुंझा येथे भव्य लाडूतुला सोहळा पार पडला. दोन राष्ट्रीय पक्षांना पराभूत केल्याबद्दल, माजी सभापती जान मोहम्मद जिवाणी यांनी हा अनोखा गौरव सोहळा आयोजित केला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शंकर बढे आणि जान मोहम्मद जिवाणी होते. खासदार संजय देशमुख अनुपस्थित असल्याने, त्यांचे प्रतिनिधी म्हणून तिरुपती कंदकुर्तिवार उपस्थित होते. बाजार समिती निवडणुकीत भाजप आणि काँग्रेसच्या पॅनेलला पराभूत करून, बोरले हे एकमेव अपक्ष उमेदवार म्हणून निवडून आले होते. त्यांच्या या विजयाचा जल्लोष करण्यासाठी, जिवाणी यांनी १०० किलो लाडू आणि स्नेहभोजनाचे आयोजन केले. ढोल-ताशांच्या गजरात, बोरले यांची ७८ किलो लाडवांनी तुला करण्यात आली. यावेळी शंकर बढे, जान जिवाणी, संतोष हजारे, तिरुपती कंदकुर्तिवार यांनी बोरले यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार केला. "अपक्ष म्हणून निवडून येणे, हा एक चमत्कारच आहे," असे गौरवोद्गार माजी संचालक इलियास सिद्दिकी यांनी काढले. या कार्यक्रमाला पंचायत समितीचे माजी सभापती पंकज तोडसाम, अतुल राठोड, वासुदेव राठोड यांच्यासह शेकडो नागरिक, कार्यकर्ते आणि मित्रपरिवार उपस्थित होता.



### गौनिवास प्रकल्पाचे भूमिपूजन संपन्न

**यवतमाळ :** येथील आठवडी बाजार परिसरातील 'गौनिवास' प्रकल्पाचे भूमिपूजन नुकतेच उत्साहात संपन्न झाले. गौनिवास बहुउद्देशीय संस्थेच्या या उपक्रमामुळे, परिसरातील जनावरांना सुरक्षित आश्रय मिळणार असून, गोरक्षणाच्या कार्याला मोठे बळ मिळाले आहे. प्राध्यापक प्रवीण प्रजापती यांच्या हस्ते या प्रकल्पाचे भूमिपूजन झाले. त्यांनी या प्रकल्पासाठी वॉल कंपाऊंड मंजूर करून दिल्याबद्दल, संस्थेचे अध्यक्ष विक्की शर्मा यांनी त्यांचे आभार मानले. या कार्यक्रमाला पोलीस निरीक्षक नरेश रणधीर, सामाजिक कार्यकर्ते मनीष दुबे, नंदकिशोर तिवारी, किशोर चांडोले, अनुप चमेडिया, राम शर्मा, बंटी शर्मा, दुर्गेश तवाडे, महादेव भांडेकर यांच्यासह अनेक मान्यवर आणि संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. संस्थेचे उपाध्यक्ष अभिषेक तिवारी आणि सचिव प्रशांत सलमाखे यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. या प्रकल्पामुळे गोरक्षणासाठीची बांधिलकी अधिक बळकट होणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.

### सुवर्णमहोत्सवी सोहळ्यात यवतमाळ केंद्राचा गौरव

**यवतमाळ :** जयपूर येथे झालेल्या महावीर इंटरनॅशनलच्या सुवर्णमहोत्सवी सोहळ्यात, यवतमाळ केंद्राला त्यांच्या 'महाराष्ट्र देशा' या नृत्य सादरीकरणासाठी पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. या ऐतिहासिक सोहळ्यात देश-विदेशातील ३५० केंद्रांनी सहभाग घेतला होता. महावीर इंटरनॅशनलच्या ५० व्या वर्धापनदिनानिमित्त बिर्ला सभागृहात हा कार्यक्रम झाला. यात यवतमाळ केंद्राच्या सदस्यांनी सादर केलेल्या 'महाराष्ट्र देशा' या नृत्याने उपस्थितांची मने जिंकली. या अप्रतिम सादरीकरणासाठी शोभा दोडेवार, आरती कामघंटीवार, तृप्ती सामृतवार, ललिता घोडे यांच्यासह संपूर्ण चमूचा सत्कार करण्यात आला. "जयपूर येथे मिळालेला हा सन्मान प्रेरणादायी असून, आम्ही अधिक जोमाने सामाजिक काम करू," असे मत केंद्राचे अध्यक्ष प्रवीण निमोदिया यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी यवतमाळ केंद्रातून सचिव शोभा दोडेवार आणि कोषाध्यक्ष डॉक्टर शेखर बंड यांच्या नेतृत्वात १६ सदस्य सहभागी झाले होते.

### यवतमाळ, आर्णी, दिग्रसमध्ये आज रोजगार मेळावे

**यवतमाळ :** जिल्ह्यातील बेरोजगार युवक-युवतींना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी, उद्या, मंगळवारी (दि. २२) यवतमाळ, आर्णी आणि दिग्रस येथे भव्य रोजगार मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले आहे. यात ४५० पेक्षा जास्त रिक्त पदांसाठी भरती होणार आहे. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रातर्फे मुख्य मेळावा यवतमाळच्या जाजू महाविद्यालयात होणार आहे. यात रेमंड, एस. के. सेफ्टी विंग्स, मॅक व्हेईकल, हिमालया कार्स यांसारख्या नामांकित कंपन्या सहभागी होणार आहेत. तसेच, आर्णी येथील राजकमल भारती महाविद्यालय आणि दिग्रस येथील बापुरावजी बुटले महाविद्यालयातही करिअर मार्गदर्शन व रोजगार मेळावे होणार आहेत. १२ वी पास, आयटीआय, पदविका आणि पदवीधर उमेदवार या मेळाव्यांचा लाभ घेऊ शकतात. इच्छुकांनी ऑनलाईन अर्ज करून, आवश्यक कागदपत्रांसह मुलाखतीसाठी उपस्थित राहावे, असे आवाहन सहाय्यक आयुक्त पी. बी. जाधव यांनी केले आहे.

# खनिज निधीची उधळपट्टी

## बाधित गावे विकासापासून वंचित; आमदार देरकरांचा विधानसभेत आवाज

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि.२१:** खाणबाधित गावांच्या विकासासाठी असलेला 'खनिज विकास निधी' इतरत्र उधळला जात आहे,' असा गंभीर आरोप वणीचे आमदार संजय देरकर यांनी विधानसभेत केला. या गैरवापराबद्दल त्यांनी थेट यवतमाळच्या खनिकर्म अधिकाऱ्याला जबाबदार धरले असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. यामुळे, जिल्हा प्रशासनाच्या कारभारावर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

राज्याच्या पावसाळी अधिवेशनात, लक्षवेधी सूचनेद्वारे बोलताना आमदार देरकर यांनी हा मुद्दा उपस्थित केला. ते म्हणाले, 'वणी तालुका हा खनिजांचे आगार असून, येथील खाणींमधून शासनाला कोट्यवधींचा महसूल मिळतो. नियमांनुसार, या महसुलाचा मोठा हिस्सा, खाणींमुळे बाधित झालेल्या गावांच्या विकासावरच खर्च झाला पाहिजे. मात्र, येथील खनिकर्म अधिकारी (जोशी) हे 'उंटावरून शेळ्या हाकत असून, त्यांनी या निधीच्या वापरात अडथळे निर्माण केले आहेत, असा थेट आरोप त्यांनी केला. यामुळे, खाणबाधित गावांमध्ये पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण आणि इतर मूलभूत सुविधांची कामे पूर्णपणे रखडली आहेत. ज्या नागरिकांना या निधीचा पहिला हक्क आहे, तेच विकासापासून वंचित राहत आहेत, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून, दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी आणि हा निधी केवळ बाधित गावांवरच खर्च करावा,' अशी मागणी त्यांनी केली. यावेळी, सभागृहात उपस्थित असलेल्या पालकमंत्र्यावर यावर लक्ष घालण्याचे आश्वासन दिल्याचे समजते.

### काय आहे 'खनिज विकास निधी?'

**जिल्ह्यात होणाऱ्या खाणकामामुळे, स्थानिक पर्यावरणाची आणि नागरिकांच्या आरोग्याची हानी होते. त्याची भरपाई म्हणून, खाण कंपन्यांकडून मिळणाऱ्या रॉयल्टीच्या ठराविक टक्के रक्कम 'खनिज विकास निधी'मध्ये जमा केली जाते. या निधीचा वापर, खाणबाधित क्षेत्रातील नागरिकांना पाणी, आरोग्य, शिक्षण आणि इतर मूलभूत सुविधा पुरवण्यासाठी करणे कायद्याने बंधनकारक आहे. मात्र, यवतमाळमध्ये याच नियमांचे उल्लंघन होत असल्याचा आरोप आहे.**

### 'या' विकासकामांना लागला आहे 'ब्रेक'

**या निधीतून अनेक महत्त्वपूर्ण कामे प्रस्तावित आहेत. यात, विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी, कामगारांना सुरक्षा साहित्य देणे, तलावांचे खोलीकरण करणे, ग्रामीण रुग्णालयात प्रयोगशाळा उभारणे आणि बाधित गावांमध्ये नळ योजना सुरू करणे यांसारख्या कामांचा समावेश आहे. मात्र, खनिकर्म अधिकाऱ्यांच्या कथित अडथळ्यांमुळे, ही सर्वच कामे रखडली असून, बाधित गावे विकासाच्या प्रतीक्षेत आहेत. यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप आहे.**

# राळेगाव मतदारसंघात नवीन उद्योग उभारणार

## उद्योजक दिलीप सोनटक्के यांचे आश्वासन



**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**राळेगाव, दि.२१:** राळेगाव मतदारसंघातील बेरोजगार तरुणांसाठी लवकरच एक नवीन उद्योग उभारण्यात येईल, असे आश्वासन प्रसिद्ध उद्योजक दिलीप सोनटक्के यांनी दिले आहे. सामाजिक कार्यकर्त्यांच्या शिष्टमंडळाने त्यांची भेट घेऊन, मतदारसंघात उद्योग आणण्याची विनंती केली होती.

मूळचे वर्धा जिल्ह्यातील विरूळ येथील असलेले आणि सध्या अमेरिकेत स्थायिक असलेले उद्योजक दिलीप सोनटक्के यांची सामाजिक कार्यकर्ते अॅड. अल्पेश देशमुख, भाजप कार्यकर्ते संदीप पेंदोर आणि राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष बाळू धुमाळ यांनी नुकतीच भेट घेतली. त्यांनी मतदारसंघातील बेरोजगारीचा प्रश्न मांडून, येथे उद्योग सुरू करण्याची विनंती केली. या विनंतीला मान देत, सोनटक्के यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. 'मी लवकरच राळेगावला भेट देऊन, येथे एक मोठा उद्योग निर्माण करीन,' असे आश्वासन त्यांनी दिले. त्यांच्या या आश्वासनामुळेतालुक्यातील युवकांसाठी रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होणार आहेत. ही मतदारसंघासाठी 'सुवर्णभेट'असल्याची भावना शिष्टमंळाने व्यक्त केली.

# घरकुल, रस्ते, पाणी, नाल्यांचा प्रश्न गंभीर

## गुलाबसिंग रुडे नगरातील समस्या सोडविण्यासाठी शिवसेना कटिबद्ध



**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**उमरखेड, दि.२१:** येथील गुलाबसिंग रुडे नगरातील रहिवाशांनी घरकुल, रस्ते, पाणी यांसारख्या मूलभूत समस्यांचा पाढा शिवसेना पदाधिकाऱ्यांसमोर मांडला. शिवसेनेने या सर्व समस्या सोडवण्यासाठी कटिबद्ध असल्याचे आश्वासन दिल्याने, नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

या बंजाराबहुल वस्तीतील नागरिकांना अद्याप घरकुलांचा लाभ मिळालेला नाही. तसेच, रस्ते, नाल्या आणि पाण्याचीही मोठी समस्या आहे. अनेक वृद्ध महिलांनी कागदपत्रांची पूर्तता करूनही, त्यांची निराधार योजना बंद झाल्याचे त्यांना सांगण्यात आले. या सर्व समस्या नागरिकांनी शिवसेनेच्या शिष्टमंडळाला सांगितल्या. 'या सर्व समस्या आम्ही स्थानिक आणि जिल्हास्तरावर मांडून, त्या सोडवण्यासाठी पूर्ण प्रयत्न करू,' असे आश्वासन शहराध्यक्ष अॅड. संजीवकुमार जाधव यांनी दिले. यावेळी माजी उपजिल्हाप्रमुख कैलास कदम, महिला शहराध्यक्ष सपना चौधरी, बसवेश्वर क्षीरसागर, राजू गायकवाड, दामोदर इंगोले आदी पदाधिकारी उपस्थित होत.

# महाराजस्व अभियानांतर्गत सावळी सदोबा येथे गुरुवारी 'समाधान शिबिर'

## आमदार राजू तोडसाम यांच्यासह प्रमुख अधिकारी राहणार उपस्थित

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**आर्णी, दि. २१ :** शासकीय योजनांचा लाभ आणि विविध प्रशासकीय कामांसाठी नागरिकांची होणारी फरफट थांबवण्यासाठी, महाराष्ट्र शासनाच्या 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानां'तर्गत, आर्णी तालुक्यातील सावळी सदोबा येथे, गुरुवार, २४ जुलै रोजी भव्य 'समाधान शिबिरा'चे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ११ वाजता, येथील साई मंगल कार्यालयात हे शिबिर होणार असल्याची माहिती तहसील कार्यालयाने दिली आहे.

या शिबिरात महसूल, शिक्षण, आरोग्य, महावितरण, पशुसंवर्धन, महिला व बालकल्याण, कृषी आणि सिंचन यांसारख्या सर्व प्रमुख विभागांचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत. ते नागरिकांच्या तक्रारी आणि अडचणी ऐकून घेऊन, त्या जागेवरच सोडवण्यासाठी प्रयत्न करतील. घरकुल योजना, नवीन विहिरींची मंजुरी, आधार कार्ड अपडेट, रेशन कार्ड, श्रावणबाळ आणि संजय गांधी निराधार योजनेतील अडचणी, तसेच लेक लाडकी आणि लाडकी बहीण योजनेतील समस्यांवर या शिबिरात विशेष भर दिला जाणार आहे. सावळी सर्कलअंतर्गत येणाऱ्या गावांतील नागरिकांनी, आपल्या समस्या लेखी स्वरूपात गावातील तलाठी, ग्रामसेवक किंवा थेट तहसील कार्यालयात आगाऊ जमा कराव्यात, जेणेकरून शिबिराच्या दिवशी त्यांना थेट उत्तर आणि तोडगा मिळू शकेल, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. या महत्वपूर्ण शिबिराला आर्णी-केळापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजू तोडसाम, तहसीलदार वैशाख वाहूर वाघ, गटविकास अधिकारी, तसेच जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि इतर सर्व विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित राहणार आहेत. नागरिकांनी या संधीचा लाभ घेऊन, आपल्या समस्या सोडवाव्यात, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# विभक्त होणाऱ्या जोडप्याची पुन्हा जुळली रेशीमगाठ

## न्यायमूर्ती जोशी यांच्याहस्ते शुभेच्छा



**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. २१ :** जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या 'विशेष मध्यस्थी मोहिमे'मुळे, विभक्त होण्याच्या उंबरठ्यावर असलेल्या एका जोडप्याचा संसार पुन्हा जुळला आहे. न्यायालयाच्या या उपक्रमामुळे तुटणारे घर वाचल्याने, सर्वत्र कौतुक होत आहे.

जिल्ह्यात १ जुलै ते ३० सप्टेंबर दरम्यान ही विशेष मध्यस्थी मोहीम राबवली जात आहे. याच मोहिमेंतर्गत, एका जोडप्याचे प्रकरण मध्यस्थीसाठी आले होते. प्रशिक्षित मध्यस्थ चेतन गांधी यांनी दोघांचेही म्हणणे ऐकून घेऊन, त्यांच्यात यशस्वीपणे समेट घडवून आणला. भविष्याचा आणि मुलांचा विचार करून, या जोडप्याने पुन्हा एकत्र नांदण्याचा निर्णय घेतला. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या न्यायमूर्ती वृषाली जोशी यांनी या जोडप्याला भेटवस्तू देऊन शुभेच्छा दिल्या.

# ग्राहक हक्कांसाठी आर्णीत नवी कार्यकारिणी

## लक्ष्मीकांत राठी अध्यक्षपदी तर अजय छल्लाणी यांच्याकडे सचिवपदाची धुरा

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**




**आर्णी, दि. २१ :** अखिल भारतीय ग्राहक पंचायतच्या आर्णी तालुका शाखेची नवीन कार्यकारिणी नुकतीच गठित करण्यात आली असून, अध्यक्षपदी लक्ष्मीकांत राठी तर सचिवपदी अजय छल्लाणी यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. ग्राहक पंचायतीचे जिल्हाध्यक्ष अनंत भिसे यांच्या अध्यक्षतेखाली आणि विदर्भ प्रांत अध्यक्ष डॉ. नारायणराव मेहरे यांच्या प्रमुख उपस्थितीत ही निवड प्रक्रिया पार पडली.

शिवाजी नगर येथील लक्ष्मीकांत राठी यांच्या निवासस्थानी झालेल्या या बैठकीत, ग्राहकांच्या हक्कांसाठी आणि त्यांच्यावरील अन्यायाविरोधात लढा तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. यावेळी, सन २०२५ ते २०२८ या कालावधीसाठी तालुका कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. या नवीन कार्यकारिणीत जिल्हा प्रतिनिधी म्हणून डॉ. निवृत्ती पिस्तुलकर, उपाध्यक्षपदी गजाननराव घोडेराव व राजेश माहेश्वरी, सहसचिवपदी अजाबराव बुटले व श्रीकृष्ण जावळकर आणि कोषाध्यक्षपदी प्रवीण मंदुलवार यांची निवड झाली. तसेच, महिला प्रमुख म्हणून ज्योती राठी, कार्यालय प्रमुख रवी गुघाणे, प्रसिद्धी प्रमुख राजेश कुशवाह, पर्यावरण प्रमुख जयंत डोल्हारकर, रोजगार प्रमुख विलास वातिले, आयटी सेल प्रमुख नवनीत दाभाडकर आणि विधी सल्लागार म्हणून अॅड. कन्हैयालाल परदेशी व अॅड. प्रमोद चौधरी यांची नियुक्ती करण्यात आली. कार्यकारिणी सदस्य म्हणून पवन पणपालीया, विजय वऱ्हाडपांडे, चित्रा माहुरे, संध्या पिस्तुलकर आणि सुनंदा जावळकर यांचा समावेश आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष अनंत भिसे आणि विदर्भ अध्यक्ष डॉ. नारायणराव मेहरे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन लक्ष्मीकांत राठी यांनी केले.

# सोयाबीन, कापसावर 'मिलीपीडस' किडीचा हल्ला

## दुबार पेरणीच्या संकटाने शेतकरी धास्तावले, कृषी विभागाकडून उपाययोजना जाहीर

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. २१ :** खरीप पेरणीनंतर झालेल्या पावसामुळे, यवतमाळ जिल्ह्यातील सोयाबीन, कापूस आणि तूर या पिकांवर 'मिलीपीडस' (पैसा कीड) या किडीचा मोठा प्रादुर्भाव दिसून येत आहे. ही कीड कोवळ्या रोपांना कुरतडून नष्ट करत असल्याने, शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढवले आहे. या पार्श्वभूमीवर, कृषी विभागाने तातडीने उपाययोजना जाहीर केल्या आहेत.



मागील हंगामातही या किडीचा प्रादुर्भाव दिसून आला होता. ही एक निशाचर कीड असून, ती सडलेला पालापाचोळा आणि काडीकचरा यावर जगते. मात्र, जमिनीत ओलावा वाढल्यास तिची संख्या प्रचंड वाढते आणि ती मुख्य पिकांवर हल्ला करते. ही कीड रोपांना जमिनीलगत कुरतडत असल्याने, पिकांची वाढ खुंटते आणि रोपांची संख्या कमी होते, ज्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते. या गंभीर परिस्थितीची दखल घेत, यवतमाळचे उपविभागीय कृषी अधिकारी जे.आर. राठोड यांनी शेतकऱ्यांना या किडीचे वेळीच व्यवस्थापन करण्याचे आवाहन केले आहे. त्यांनी सांगितले की, "शेतातील स्वच्छता आणि वेळीच कोळपणी केल्यास या किडीवर नियंत्रण मिळवता येते." "प्रादुर्भाव जास्त असल्यास, रासायनिक उपाययोजना कराव्यात," असा सल्लाही त्यांनी दिला आहे. या संकटातून बाहेर पडण्यासाठी, शेतकरी आता कृषी विभागाच्या मार्गदर्शनाची आणि मदतीची अपेक्षा करत आहेत.

### 'पैसा' कीड आणि तिचे जीवनचक्र

**मिलीपीडस, म्हणजेच 'पैसा' किंवा 'वाणी' कीड, ही एक निशाचर कीड आहे. ती साधारणपणे सडलेल्या काडीकचऱ्यावर जगते, पण संख्या वाढल्यास पिकांवर हल्ला करते. एक मादी जमिनीत सुमारे ३०० अंडी घालते आणि या किडीचे आयुष्य ५ ते ७ वर्षांपर्यंत असू शकते. जमिनीत ओलावा आणि सेंद्रिय पदार्थ जास्त असल्यास, तिचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढतो, ज्यामुळे ती पिकांसाठी अत्यंत धोकादायक ठरते.**

### कृषी विभागाचा नियंत्रणाचा सल्ला

**या किडीच्या नियंत्रणासाठी, शेतकऱ्यांनी शेतातील पालापाचोळा नष्ट करून, बांध स्वच्छ ठेवावेत. रात्रीच्या वेळी, गवताचे ढीग ठेवून, त्याखाली जमा झालेल्या किडी सकाळी नष्ट कराव्यात. प्रादुर्भाव जास्त असल्यास, क्लोरपायरीफॉस २० ईसी या कीटकनाशकाची ३७.५ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून, सायंकाळच्या वेळी रोपांभोवती फवारणी (ड्रेचिंग) करावी. यामुळे, किडीवर प्रभावी नियंत्रण मिळवता येते.**

### वसतिगृहासाठी ऑनलाईन प्रवेश सुरू

**यवतमाळ, दि. २१ :** दिग्रस तालुक्यातील आदिवासी मुलांचे शासकीय वसतीगृह दिग्रस येथे या शैक्षणिक वर्षासाठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रीया सुरु झाली आहे. ईच्छूक विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. वसतीगृहाची क्षमता ७५ विद्यार्थी असून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता विद्यार्थी अनुसूचीत जमातीचा असणे आवश्यक आहे. वर्ग ८ वा, वर्ग ११ वी व वरिष्ठ महाविद्यालय विद्यार्थ्यांना वसतीगृहात नि:शुल्क उत्तम राहण्याची व भोजनाची व्यवस्था, निर्वाह भत्ता व ईतर सुविधा पुरविण्यात येते. शासनाने ठरवुन दिलेल्या निकषाप्रमाणे डीबीटीद्वारे रक्कम विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात येतील, प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज करावे, असे आदिवासी मुलांचे शासकीय वसतीगृहाचे गृहपाल यांनी कळविले आहे.

# शिवसेना-रिपब्लिकन सेनेची युती

## राज्यात नवी राजकीय समीकरणे; यवतमाळ जिल्ह्यातही युतीचा प्रभाव

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**उमरखेड, दि. २१:** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर, राज्यात नव्या राजकीय समीकरणांची नांदी झाली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेना आणि रिपब्लिकन सेना यांनी युती करण्याचा निर्णय घेतला असून, ते सर्व निवडणुका एकत्र लढवणार आहेत. यामुळे, यवतमाळ जिल्ह्यात पालकमंत्री संजय राठोड आणि रिपब्लिकन सेनेचे जिल्हाध्यक्ष सुनील पाटील चिंचोलकर एकत्र आल्याने, राजकीय चित्र बदलण्याची चिन्हे आहेत.

या युतीची अधिकृत घोषणा मुंबईत १६ जुलै रोजी एका संयुक्त पत्रकार परिषदेत करण्यात आली. या युतीचा मुख्य उद्देश, मराठी आणि दलित मतांचे एकत्रीकरण करून, आगामी महानगरपालिका, जिल्हा परिषद आणि नगरपरिषद निवडणुकांमध्ये विजय मिळविणे हा आहे.

यवतमाळ जिल्ह्यात या युतीचा मोठा प्रभाव पडण्याची शक्यता आहे. पालकमंत्री संजय राठोड यांचा सामाजिक कार्यामुळे जिल्ह्यात मोठा जनसंपर्क आहे, तर दुसरीकडे सुनील पाटील चिंचोलकर यांनी दलितांच्या न्याय-हक्कांसाठी केलेल्या आंदोलनांमुळे, त्यांच्यामागे समाजाची मोठी ताकद आहे. हे दोन नेते एकत्र आल्याने, जिल्ह्यातील राजकीय गणिते नक्कीच बदलणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे. या युतीच्या घोषणेनंतर, उमरखेड येथील माहेश्वरी चौकात शिवसेना आणि रिपब्लिकन सेनेच्या कार्यकर्त्यांनी एकत्र येत, फटाके फोडून आणि घोषणाबाजी करत मोठा जल्लोष साजरा केला. यावेळी शिवसेनेचे जिल्हा सहसंपर्कप्रमुख चितांगराव कदम, रिपब्लिकन सेनेचे जिल्हाध्यक्ष सुनील पाटील चिंचोलकर, तालुकाध्यक्ष गौतम नवसागरे, शहराध्यक्ष शुद्धोधन दिवेकर, तालुका उपाध्यक्ष भीमराव खंदारे, राजू आगीरे, गजानन भोयर, भावराव भोयर, राहुल नवसागरे, नंदू इटकरे, संदीप राऊत, देवराज गोडबोले, साहेबराव कदम, माधव मेळेगावकर, कुंदन कदम, हजान नवसागरे, प्रकाश पोपुलवाड, विष्णू काळबांडे तसेच शिवसेना शहरप्रमुख ॲड. संजीवकुमार जाधव, माजी उपजिल्हाप्रममुख कैलास कदम, उपशहरप्रमुख बसवेश्वर क्षीरसागर, प्रवीण मिराशे, संदीप ठाकरे, गजू सोळंके, राजू गायकवाड, वसंता देशमुख, दामोदर इंगोले, सचिन दवणे, देवबन गोस्वामी तसेच दोन्ही पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने याप्रसंगी उपस्थित होते.

# आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा उच्च न्यायालयाने केला रद्द

## १४ जणांना दिलासा; नागपूर खंडपीठाचा महत्त्वपूर्ण निर्णय

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

यवतमाळ, दि.२१: आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या गुन्ह्यात, केवळ सर्वसामान्य स्वरूपाचे आरोप पुरेसे नाहीत, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा देत, मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने १४ जणांविरोधातील पोलिसांनी नोंदविलेला गुन्हा (एफआयआर) रद्द केला आहे. या निर्णयामुळे, यवतमाळ आणि वाशीम जिल्ह्यातील या १४ जणांना मोठा दिलासा मिळाला आहे. त्यांच्यावर बडनेरा (रेल्वे) जि. अमरावती पोलिसांत गुन्हा दाखल होता.

या प्रकरणी, नागपूर खंडपीठाचे न्यायमूर्ती अनिल किलोर आणि न्यायमूर्ती एम. एम. नेरळीकर यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. बडनेरा रेल्वे पोलिसांनी, २४ मार्च २०२५ रोजी, एकूण ३४ जणांवर भारतीय न्याय संहितेच्या कलम १०८ (आत्महत्येस प्रवृत्त करणे) अंतर्गत गुन्हा दाखल केला होता. याविरोधात, दुर्गेश कुंटे, सरिता देशमुख यांच्यासह १४ जणांनी, हा गुन्हा रद्द करण्यासाठी उच्च न्यायालयात फौजदारी अर्ज दाखल केला होता. याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. रोहण देव व ॲड. अक्षय नाईक यांनी बाजू मांडली. न्यायालयाने आपल्या निर्णयात म्हटले आहे की, 'तक्रारीमधील आरोप हे अत्यंत सर्वसामान्य स्वरूपाचे असून, त्यात कोणत्याही ठोस किंवा विशिष्ट घटनेचा उल्लेख नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या विविध निकालांचा दाखला देत, न्यायालयाने स्पष्ट केले की, 'आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा सिद्ध होण्यासाठी, आरोपीने पीडित व्यक्तीला जाणीवपूर्वक उकसवल्याचे किंवा आत्महत्येस प्रवृत्त केल्याचे पुरावे असणे आवश्यक आहे.' या प्रकरणात, असे कोणतेही पुरावे प्रथमदर्शनी दिसत नसल्याने, हा गुन्हा रद्द करत असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

- केवळत्रास देणे म्हणजे आत्महत्येस प्रवृत्त करणे नव्हे
- सर्वोच्च न्यायालयाच्या निकालांचा दिला दाखला
- बडनेरा रेल्वे पोलिसांत दाखल होता गुन्हा

### 'उकसवल्या'शिवाय गुन्हा सिद्ध होत नाही



**या निकालातून, न्यायालयाने आत्महत्येस प्रवृत्त करण्याच्या कायद्याचा अर्थ पुन्हा एकदा स्पष्ट केला आहे. 'केवळ त्रास देणे किंवा शिवीगाळ करणे, हे आत्महत्येस प्रवृत्त करणे ठरत नाही.' 'आरोपीने पीडित व्यक्तीला आत्महत्या करण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय उरणार नाही, अशी परिस्थिती निर्माण केली, हे सिद्ध होणे आवश्यक असते,' असे सर्वोच्च न्यायालयाचे अनेक निकाल आहेत. या प्रकरणात, असे पुरावे नसल्याने, न्यायालयाने सदर 'एफआयआर' रद्द केला आहे.**

### 'या' चौदा जणांना मिळाला मोठा दिलासा

**या प्रकरणात, ज्या चौदा जणांविरोधातील 'एफआयआर' रद्द करण्यात आला आहे, त्यात दुर्गेश कुंटे, सरिता देशमुख, ऋचा गढीकर, चंद्रकांत तोलवानी, सतीश देशपांडे, सोमेश्वर राठोड, मनीष वाघमारे, विनोद चव्हाण, महेश महाजन, विराट घुडे, ज्ञानेश्वर गटकर, देवेंद्र भोयर, मोनाली सालेम आणि दिनेश दाणी यांचा समावेश आहे. हे सर्वजण यवतमाळ आणि वाशीम जिल्ह्यातील रहिवासी आहेत.**

## थोडक्यात



### अपघातात मजूर ठार

**नेर (परसोपंत) :** तालुक्यातील रेणापूर फाट्याजवळ भरधाव पिकअप वाहनाचा टायर फुटून झालेल्या अपघातात एका मजुराचा मृत्यू झाला. या घटनेत वाहनातील इतर मजूरही जखमी झाले असून, चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना रविवारी, २० जुलै रोजी रेणापूर फाट्याजवळील सिमेंट कारखान्यासमोर घडली. टाटा पिकअप (एमएच ११ एजी ३९४७) पलटी झाल्याने हा अपघात झाला. यात गोलू उर्फ पुंडलिक मोहन चव्हाण याचा मृत्यू झाला, तर इतर मजूर जखमी झाले. वाहनाचा चालक अरबाज अली अमजद अली हा भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणे गाडी चालवत असल्याने टायर फुटून अपघात घडला. याप्रकरणी मृतकाचे वडील मोहन थावरू चव्हाण यांनी नेर पोलिसांत तक्रार दिली. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी चालक अरबाज अली याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

### दोघांना बेदम मारहाण



**मुकुटबन :** येथे पाईप फोडल्याची तक्रार दिल्याचा राग मनात धरून एका व्यक्तीने महिलेसह तिच्या नातीला मारहाण केली. याप्रकरणी मुकूटबन पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सुमित्रा पांडुरंग कोरांगे यांनी याप्रकरणी पोलिसांत तक्रार दिली. तक्रारीनुसार, आरोपी अरुण तुकाराम कोरांगे याने 'माझ्याविरुद्ध तक्रार का दिली' असे म्हणत त्यांच्यासोबत वाद घातला. त्याने शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली आणि कंदुसने सुमित्रा यांच्या डोक्यावर मारून त्यांना जखमी केले. भांडण सोडवण्यासाठी मध्यस्थी करणाऱ्या त्यांच्या नातीलाही आरोपीने मारहाण केली. या तक्रारीच्या आधारे मुकूटबन पोलिसांनी अरुण कोरांगे याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला असून, पुढील तपास सुरू केला आहे.

# महिला अर्बन पतसंस्था आर्थिक संकटात

## ठेवीदारांचा कार्यालयाला घेराव; पाच कोटींच्या तुटीमुळे व्यवहार ठप्प

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**नेर, (परसोपंत), दि.२१:** येथील महिला अर्बन को-ऑप. सहकारी क्रेडिट सोसायटी, सुमारे पाच कोटी रुपयांच्या आर्थिक तुटीमुळे गंभीर संकटात सापडली आहे. १६ जुलैपासून संस्थेतील सर्व आर्थिक व्यवहार ठप्प झाल्याने, संतप्त झालेल्या शेकडो ठेवीदारांनी आज, सोमवारी, (द.२१) सकाळी संस्थेच्या कार्यालयाला घेराव घातला आणि नंतर पोलिस ठाण्यात धाव घेतली. या प्रकारामुळेतालुक्यात मोठी खळबळ उडाली आहे.

आज सकाळी शाखा व्यवस्थापक अरविंद चव्हाण कार्यालयात येताच, ठेवीदारांनी त्यांना घेराव घालून आपल्या पैशांची मागणी केली. यानंतर, संतप्त जमाव पोलिस ठाण्यात आणि नंतर संस्थेच्या अध्यक्षांच्या घराकडे गेला, मात्र त्यांचे घर बंद आढळले. संस्थेच्या अध्यक्षा गेल्या काही महिन्यांपासून पुण्यात वास्तव्यास असल्याचे समजते. संचालक मंडळाचे संस्थेच्या कारभाराकडे झालेले दुर्लक्ष, कर्जाची वसुली न होणे आणि मासिक बैठकांना अनुपस्थिती, यामुळेच ही परिस्थिती ओढवल्याचा गंभीर आरोप ठेवीदारांनी केला आहे. शाखा व्यवस्थापक अरविंद चव्हाण यांनीही, 'अध्यक्ष आणि संचालक मंडळाने वारंवार विनंती करूनही लक्ष दिले नाही,' असे सांगत या आरोपांना दुजोरा दिला. या ठेवीदारांमध्ये महिला, छोटे व्यावसायिक आणि पेन्शनधारकांची संख्या सर्वाधिक असल्याने, ते मोठ्या आर्थिक कोंडीत सापडले आहेत. मध्यंतरी, चव्हाण यांनी स्वतःचे घर गहाण ठेवून संस्थेत पैसे गुंतवले होते, पण तेही अपुरे ठरले. याप्रकरणी सहकार विभागाने तातडीने लक्ष घालून, आम्हाला आमचे पैसे परत मिळवून द्यावेत, अशी मागणी ठेवीदार करत आहेत.

# वणीत उद्या महारक्तदान शिबिर

**वणी, दि. २१ :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त, भारतीय जनता पार्टीतर्फे वणीत 'सेवा ते संघटन' अभियानांतर्गत मंगळवारी, २२ जुलै रोजी महारक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम होत आहे. येथील वसंत जिनिंग हॉलमध्ये सकाळी ९ ते दुपारी ३ या वेळेत हे शिबिर चालेल. 'रक्तदान हे जीवनदान असून, एका रक्तदात्यामुळे अनेकांचे प्राण वाचू शकतात,' ही सामाजिक भावना लक्षात घेऊन या शिबिराचे आयोजन केले आहे. तालुक्यातील सर्व नागरिकांनी या राष्ट्रीय कार्यात सहभागी होऊन रक्तदान करावे, असे आवाहन भाजपा वणीतर्फे करण्यात आले आहे. या शिबिराला विविध सामाजिक व राजकीय क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार असून, आयोजकांनी शिबिराची जय्यत तयारी केली आहे.

# अनेक तरुणांचा युवासेनेत प्रवेश

## ना. संजय राठोड यांची उपस्थिती; जिल्ह्यात युवासेनेला नवे बळ

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि.२१:** विधानसभेत मिळालेल्या यशानंतर तरुणांचा शिवसेनेकडे ओढा वाढला आहे. यवतमाळ शहरासह जिल्ह्यातील अनेक तरुणांनी पालकमंत्री, तसेच शिवसेनेचे नेते संजय राठोड यांच्या उपस्थितीत युवासेनेत प्रवेश केला.

यवतमाळ येथे विश्रामगृह येथे काल मोठया संख्येत पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी युवासेनेत जाहीर प्रवेश केला. हा भव्य पक्षप्रवेश सोहळा ना. संजय राठोड यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. लोकसभा अध्यक्ष विशाल गणात्रा यांच्या नेतृत्वात अभिजित देशमुख (मोहाडेकर) यवतमाळ युवासेना शहरप्रमुख, विकास कोल्हे, पुसद विधानसभा अध्यक्ष, लखन राठोड यांच्या विशेष पुढाकारातून हा कार्यक्रम झाला. या वेळी शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख हरिहर लिंगणवार, जिल्हा संपर्कप्रमुख श्रीधर मोहोड, लोकसभा समन्वयक विश्वास नांदेकर, माजी जिल्हाप्रमुख पराग पिंगळे, जिल्हाप्रमुख यशवंत पवार, गजानन डोमाळे, राजूदास जाधव, बी.एन. चव्हाण, राजू राठोड, तसेच युवासेना जिल्हा प्रमुख महेश पवार व अन्य वरिष्ठ पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमात यवतमाळ शहर, पुसद विधानसभा व आजूबाजूच्या गावांतील युवकांनी युवासेनेत प्रवेश केला. यामध्ये अभिजित देशमुख यांच्या माध्यमातून अमित हेडाऊ, अनुराज साखरकर, नीतेश पटेल, अलोक बोरकर, समेप चौधरी यांसह अनेक युवकांचा समावेश होता. विकास कोल्हे तसेच रोशन पवार कॉलेज कक्षप्रमुख शहर युवा सेना यांच्या माध्यमातून यवतमाळ येथील तेजस शेंडगे, निनाद सुरेश, प्रज्वल थूल, विशाल कोल्हे, दीप कोरडे, शुभम कोथोरकर, हिमांशू चव्हाण, भावेश कामडी, प्रदीप वंचलवार, प्रवेश पवार, हर्षल राठोड, सूरज ताजणे, भूषण गेदम, आकाश राठोड, दुर्गेश चव्हाण, प्रणय निचले, अश्लेष सोरटे, रूपेश पवार, प्रेम गायकवाड, फैजान शेख, अभय जाधव, याज्ञेश पवार यांनी प्रवेश केला. या सामूहिक प्रवेशामुळे यवतमाळ जिल्ह्यात युवासेनेला नवे बळ मिळाले असून आगामी काळात संघटन अधिक मजबूत होईल, असा विश्वास पालकमंत्री संजय राठोड यांनी व्यक्त केला.

# टोल वाचविण्यासाठी शहरातून केली जाते अवैध जड वाहतूक

## वणीत वाहतूक पोलिसांचे दुर्लक्ष

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ सागर मुने



**वणी, दि.२१:** वणी शहरात दिवसा जड वाहतुकीला बंदी असतानाही, टोल वाचवण्यासाठी शहराच्या मुख्य रस्त्यांवरून बिनधास्तपणे जड वाहने धावत आहेत. या गंभीर प्रकाराकडे वाहतूक पोलिसांचे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याने, वाहनचालकांची मुजोरी वाढली असून, ते आता थेट पत्रकारांनाही अरेरावी करत धमक्या देत आहेत.

सोमवारी, दि. २१ जुलै रोजी सायंकाळी सहाच्या सुमारास, शहरातील सर्वोदय चौकातून (एम.एच. ३४/ बी.जी. ९४५२) या क्रमांकाचा आयव्हा ट्रक जात होता. एका पत्रकाराने त्याचा फोटो काढला असता, ट्रक चालकाने त्यांच्याशी अरेरावी केली आणि 'आमचे कोणी काही करू शकत नाही, पोलिसही काही करत नाहीत,' अशी धमकीवजा भाषा वापरली. हाच ट्रक पुढे ऋषी मेडिकलच्या शेडला आणि एका दुचाकीला धडक देऊन निघून गेला, ज्यामुळे काही काळ वाहतूक कोंडी झाली होती. सुदैवाने, या घटनेत मोठा अपघात टळला. शहरात जिल्हा वाहतूक पोलिसांचे कार्यालय असूनही, त्यांचे कर्मचारी शहराबाहेर केवळ दुचाकीस्वारांवर कारवाई करून आपले 'टार्गेट' पूर्ण करत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. टिळक चौक ते सर्वोदय चौक आणि दीपक टॉकीजपर्यंतच्या मार्गावर या अवैध वाहतुकीमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. वाहतूक पोलिसांच्या या निष्क्रियतेमुळे आणि चालकांच्या वाढत्या दादागिरीमुळे, शहरात कधीही मोठा अपघात होऊ शकतो, अशी भीती व्यक्त होत आहे. प्रशासनाने यावर तातडीने कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

# नर्सिंग कर्मचाऱ्यांच्या संपाने आरोग्यसेवा विस्कळित

**यवतमाळ, दि. २१ :** आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटनेने पुकारलेल्या बेमुदत संपाचा आज पाचवा दिवस असून, यामुळे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील आरोग्यसेवा पूर्णपणे विस्कळित झाली आहे. अनेक शस्त्रक्रिया रद्द कराव्या लागल्याने रुग्णांचे मोठे हाल होत आहेत. शासनाच्या दुर्लक्षामुळे, दि. १८ जुलैपासून परिचारिका संपावर गेल्या आहेत. वेतनत्रुटी दूर कराव्यात, केंद्र शासनाप्रमाणे नर्सिंग व गणवेश भत्ता द्यावा या त्यांच्या मागण्या आहेत. संपामुळे रुग्णालयातील अनेक शस्त्रक्रिया स्थगित झाल्या आहेत. काही रुग्णांना तर इतर रुग्णालयांत हलविण्याची वेळ आली आहे. जोपर्यंत आमच्या मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत हा संप मागे घेतला जाणार नाही,' असा इशारा संघटनेच्या जिल्हाध्यक्ष संगीता राठोड, जिल्हा सचिव सिद्धार्थ मेश्राम आणि कार्याध्यक्ष अतुल राऊत यांनी दिला आहे. त्यांच्यासोबत संघटनेचे अनेक पदाधिकारी व सदस्य या आंदोलनात सहभागी झाले आहेत.

# श्री पाळेश्वर मंदिरात श्रावणमास महोत्सव

## शुक्रवारपासून श्रावण महिन्यात भरगच्च धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**दिग्रस, दि.२१:** धावंडा नदी तीरावरील दिग्रसकरांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री पाळेश्वर महादेव मंदिर येथे शुक्रवारी, दि. २५ जुलै ते रविवार, दि. २४ ऑगस्टपर्यंत दरवर्षीप्रमाणे याही वर्षी श्रावण मास उत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

श्रावण मास महिनाभर दररोज सकाळी ७ वाजता श्री पाळेश्वर महादेवास अभिषेक, पूजा व आरती, दररोज रात्री ८ वाजता श्री आप्पास्वामी भजनी मंडळाच्या संचलनात महाआरती होणार आहे. गुरुवार, दि. ३१ जुलैला श्री तुलसीदास जयंतीनिमित्त श्री छत्रपती रामायण मंडळातर्फे अखंड संगीतमय रामायण होणार असून शुक्रवार, दि. १ ऑगस्ट दुपारी १२ वाजता आरती व प्रसादानंतर कार्यक्रमाची सांगता होईल. सोमवार, दि. ११ ऑगस्ट ते रविवार, दि. १७ ऑगस्ट सप्ताहभर दररोज सकाळी ८ ते १० वाजेपर्यंत ह. भ. प. श्री ज्ञानेश्वर सुरजुसे महाराज (मुद्रा प्राणायाम व चक्र साधना प्रशिक्षक) ह्यांचे रसाळ वाणीतून श्री शिवलीलामृत पोथीचे सामूहिक पारायण संपन्न होईल. ह्या वर्षीचे शिवलीलामृत पारायणाचे यजमान सौ. सीमा व श्री सुधीर बालाजी येरावार हे राहतील. शिवलीलामृत पारायणास बसणाऱ्यांनी आपली नावे मंदिराचे पुजारी मोहन गिरे महाराज यांचेकडे नोंदवावी, असे आवाहन मंदिर विश्वस्त समितीकडून करण्यात आले आहे. श्रावणमासातील प्रत्येक श्रावण सोमवारला महाआरती व मंदिरावरील विद्युत रोषणाई आरतीचे यजमान कु. अवनी आणि महेश श्रीकृष्ण जाजडा, मंगला रमेशशेठ करवा, रचिता निरज दुद्दलवार, रामकला जयनारायण जयस्वाल, ओम सुरेश मर्दाने, पूजा विनायक दुधे, रवी शंकरराव व्यंकटवार यांच्यातर्फे करण्यात आली आहे.

### महाआरती व महाप्रसादाने होणार सांगता

**रविवार, दि. २४ ऑगस्टला सकाळी १० वाजता महाआरती व प्रसाद वाटपाने श्रावणमास महोत्सवाची सांगता होणार आहे. तरी महाआरतीसह शिवलीलामृत पोथीचे सामूहिक पारायण व आयोजित सर्व कार्यक्रमांचा लाभ सर्व भाविकांनी घेण्याचे आवाहन श्री पाळेश्वर महादेव मंदिराच्या विश्वस्त मंडळाने केले आहे.**

# सर्वपक्षीय 'चक्काजाम' आंदोलन २४ जुलैला

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २१ :** शेतकरी कर्जमाफीच्या मागणीसाठी, बच्चू कडू यांच्या आंदोलनाला पाठिंबा देत, जिल्ह्यातील विविध राजकीय पक्षांनी एकत्र येऊन २४ जुलै रोजी 'चक्काजाम' आंदोलनाची घोषणा केली आहे. सरकारने शेतकऱ्यांची फसवणूक केल्याचा आरोप करत, हा लढा तीव्र करण्याचा निर्धार पत्रकार परिषदेत व्यक्त करण्यात आला.

प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हाध्यक्ष बिपीन चौधरी यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. 'पावसाळी अधिवेशन संपले, बच्चू कडू यांनी '७/१२ कोरा' यात्रा काढली, पण शेतकरीविरोधी सरकारने कोणतीही दखल घेतली नाही,' असे ते म्हणाले. या आंदोलनात शेतकऱ्यांना तात्काळ कर्जमाफी द्यावी, सक्तीची कर्जवसुली थांबवावी, मनरेगाचा विस्तार करून मजुरी वाढवावी आणि तरुणांना रोजगार द्यावा, या प्रमुख मागण्या आहेत. या 'चक्काजाम' आंदोलनात प्रहार, संभाजी ब्रिगेड, मनसे, शिवसेना (उबाठा), काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), गोंडवाना गणतंत्र पार्टी, एमआयएम आणि 'आप' यांसह अनेक पक्ष सहभागी होणार आहेत. चौधरी यांनी जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना आणि कष्टकऱ्यांना आवाहन केले की, 'आपली बैलगाडी, ट्रॅक्टर आणि शेतीची अवजारे घेऊन मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभागी व्हा आणि सरकारला जागे करा.'